माणूस
शनिवार
२२ एप्रिल १९७८
७५ पैसे

# म्हणूनच 'ककूज नेस्ट'सारखे चित्रपट सामाजिक दृष्टया अर्थपूर्ण ठरतात

'वन हू फ्ल्यू ओव्हर द ककूज नेस्ट' हा मिलोज फोरमन ह्या अमेरिकन दिग्दर्शकाचा एक उत्कृष्ट चित्रपट. प्रसंगी तो सुखावतो आणि शेवटी मनाला खिन्न करून सोडतो. तो हसवतो आणि विचारप्रवृत्तही करतो. खरं तर मॅकमर्फी नावाच्या शहाण्यामाणसाची ही शोकांतिका; पण ही केवळ मॅकमर्फी ह्या गुन्हेगार, पण भल्या, उमद्या माणसाची शोकांतिका रहात नाही, तर ती आजच्या समाजात जगणाऱ्या प्रत्येकाचीच शोकांतिका होऊन जाते.

'वन हू फ्ल्यू ओव्हर द ककूज नेस्ट' ही एक विलक्षण प्रभावी चित्रपटकथा. बरंच काही दाखविणारी, त्याहून अधिक काही सांगणारी. एका नेहमीच्याच विषयाची ही एक नवी समर्थ मांडणी. सामाजिक आशयाकडेच अपरिहार्यपणे घेऊन जाणारी. असा चित्रपट पाहिल्यावर खरं तर ह्या समाजाचं आपणाला काही कळेनासंच होतं. ह्याच समाजातून काही जण ध्येयाचं वेड घेऊन हौतात्म्य पत्करतात तर इतर काही विज्ञानाचं वेड घेऊन मानवी जीवनाला प्रगतीच्या, प्रसंगी अधोगतीच्या, मार्गानं पुढे नेत राहतात; तर कितीकजण तत्त्वज्ञानाचं वेड घेऊन पारमार्थिक प्रगतीच्या वाटा शोधतात. अर्थात ह्या साऱ्यांचंच वेड वेगळ्या अव्यवहारी वळणाचं असतं. पण सर्वसामान्यपणे, ह्याच समाजानं व्यावहारिकदृष्टया वेडया ठरविलेल्या व्यक्ती बऱ्याच वेळा शहाण्यासारख्या वावरताना, वागताना दिसतात. याउलट शहाणपणाची शेखी मिरवून समाजाचं नियंत्रण-नेतृत्व करणाऱ्या शक्ती मात्र कित्येकदा समाजातल्या शहाण्यांनाच वेडं ठरवून, त्यांचा अमानुषपणे छळ करणाइतक्या मनोविकृत झालेल्या आढळतात. त्यामुळेच मॅकमर्फीसारखी, कधी काळची गुन्हेगार का असेनात, मोठ्या मनाची माणसं समाजमनातल्या विसंगतींचे, विकृततेचे निर्घृण बळी ठरतात. अशा समाजाच्या ह्या विसंगत मनोरचनेचं वास्तववादी चित्रण करणारे 'ककूज नेस्ट' सारखे चित्रपट म्हणूनच सामाजिकदृष्टया अर्थपूर्ण ठरतात.

**—अशोक प्रभाकर डांगे**

एक चित्रपट । दोन परीक्षणे । पृष्ठ २१

## साप्ताहिक माणूस

वर्ष सतरावे-अंक सत्तेचाळीस
२२ एप्रिल १९७८
मूल्य पंचाहत्तर पैसे

संपादक
श्री. ग. माजगावकर
साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे
¤
वार्षिक वर्गणी :
**चाळीस रुपये**
¤
प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.
¤
राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.
¤
**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव पेठ,
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०
¤
दूरध्वनी : ४४३४५९
¤


# वाढदिवस आणि हरिजन बसाओ

निशिकांत भालेराव, नवी दिल्ली

जनता पक्षाच्या सार्वजनिक कार्यक्रमांविषयी दिल्लीतील जनतेचे मत काय असावे ? अवघ्या एक वर्षाच्या काळात सामान्य लोकांना जनता पक्ष हा कॉंग्रेसची सुधारलेली आवृत्ती वाटते आहे. दिल्लीतील जनसंपर्क विषयाच्या काही विद्यार्थ्यांनी एक पहाणी केली होती. आणि तिचा विषय जनता पक्षाचा साधेपणा व मंत्र्यांचे सार्वजनिक कार्यक्रम (Public Appearance) असा होता. उच्च वर्णीय, मध्यमवर्गीय व सर्वहारावर्ग अशा तिन्ही वर्गांनी आपली नाराजी अशा कार्यक्रमांविषयी व्यक्त केलेली आहे. म्हणजे साधेपणा आहे पण त्याची जाहिरात करण्यात जास्त चैनबाजी होतेय, असे ४०% लोकांचे मत आहे, तर ६०% लोकांच्या मते कॉंग्रेसच्या राजवटीत मंत्र्यांचे वाढदिवस, जन्मदिवस जोरात, जाहीररीत्या साजरे होत. आता जनता-राजवटीत सुद्धा मंत्र्यांचे जन्मदिवस साजरे होतातच. शिवाय वरून त्या दिवसाला किसान दिन, जन-जागृतीदिन, दारुबंदीदिन असे नाव दिले जाते. अर्थात हे सर्व-सामान्य लोकांचे प्रातिनिधिक परंतु खरे मत आहे असे म्हणावयाची पाळी आली आहे.

मागील वर्षाच्या डिसेंबरमध्ये गृहमंत्री चौ चरणसिंग ह्यांचा जन्मदिवस 'किसानदिन' म्हणून साजरा झाला. गृहमंत्र्यांचा हा वाढदिवस इतका प्रचंड प्रमाणावर साजरा करण्यात आला की व्यक्ति-मत्त्वाचे स्तोम व देव्हारे जनता पक्ष निर्माण करणार ह्याविषयी शंकाच उरली नव्हती. २-३ लाख लोक आपल्या इच्छेने व पैशाने राजधानीसारख्या शहरात कसे येऊ शकतात हे कोडे दिल्लीकरांना कधीच सतावत नाही. कारण सोपे आहे. मागील ३० वर्षांचा अनुभव !

४ वर्षांनी एकदाच आपला वाढदिवस येतो हे श्री. मोरारजी-भाईंना माहीत नसले तरी जनतेला मात्र माहीत होते. आता गृह-मंत्र्यांचा किसानदिन साजरा होतो तर पंतप्रधानांचा चार वर्षांनी एकदाच येणारा जन्मदिवस का जाहीररीत्या साजरा करू नये, हा प्रश्न तार्किकदृष्ट्या ठीकच आहे म्हणा. मोरारजीभाईंच्या वाढ-दिवसाच्या ३-४ दिवसांपूर्वीपासूनच मोरारजीभाईंच्या छायाचित्राचे पोस्टर्स दिल्लीत सर्वत्र झळकलेले होते. शिवाय जनतेच्या उत्फुल्ल प्रेमाने अनेक संस्थांनी काढलेले रंगीबेरंगी पोस्टर्स वेगळेच. शिवाय वाढदिवसाच्या दिवशी सकाळी आर्यसमाजमंदिरात प्रार्थना वगैरे. पण चौ. चरणसिंगांच्या वाढदिवसापेक्षा हा साधाच म्हणावयाला पाहिजे.

वाढदिवसांचे हे चक्कर आठवण्याचे कारण एकच. ते म्हणजे केंद्रीय रक्षामंत्री बाबू जगजीवनराम ह्यांचा जन्मदिवस ५ एप्रिल रोजी जनजागृतीदिन म्हणून साजरा करण्यात आला. केंद्रीय मंत्र्यांचा वाढदिवस सार्वजनिकरीत्या साजरा होण्याची ही तिसरी वेळ! साधेपणाच्या गोष्टी सत्तेत नसताना ठीक असतात असा ग्रह सामान्य लोकांनी करून घेतला तर चुकले काय? उद्या जॉर्जभाईंचा वाढदिवस कामगारकल्याणदिन म्हणून त्यांच्या चाहत्यांनी साजरा केला तर त्यांचा सुद्धा नाइलाज होणारच म्हणा. एकूण साधेपणा हा साधा नसतोच!

## ५ एप्रिल

काही दिवसांपूर्वी बाबूजींच्याविषयी एक गोष्ट एकली. जनता पक्षाच्या निर्णयप्रक्रियेत माझी इज्जत फक्त १०% राहिली आहे अशी त्यांनी एका खासदाराजवळ व्यथा व्यक्त केली होती. जेवढी आमची संख्या तेवढीच किंमत असे साधे गणित जगजीवनरामजींना का मांडावे लागते ह्याचे कारण नव्याने सांगण्याची गरज नाही. बाबूजी नाराज आहेत म्हणून त्यांच्या वाढदिवसाच्या दिवशी मी त्यांना भेटायचे ठरविले. ४–५ दिवसांपूर्वीपासूनच 'राष्ट्रनेता बाबू जगजीवनराम ७१ वा जन्मदिवस' समारोहाचे पोस्टर्स सर्वत्र झळकलेले दिसत होते. त्यामुळे तर अजूनच उत्सुकता वाढली. सरळ निघालो त्यांच्या कृष्ण मेनन मार्गावरील कोठीकडे. बाबूजींची कोठी तशी प्रशस्त आहे. प्रवेशद्वाराजवळच दोन बंदूकधारी उगाच संशयाने प्रत्येकाकडे पहात आहेत असे वाटले. म्हणून चेहऱ्यावर शक्यतो प्रेमळ हावभाव आणण्याचा प्रयत्न केला; परंतु उपयोग झाला नाही. सुरक्षा सैनिकांनी अडविलेच! बाबूजी को बधाई देना है असे म्हणून आत सटकलो. बाहेरच मोठा मंडप घालण्यात आला होता. मंत्री, अधिकारी व चाहत्यांच्या गाड्यांनी आवार गजबजून गेले होते. बाहेरच्या वेटिंगरूममध्ये ३००–४०० लोक हातात हार–तुरे घेऊन उभे होते. बहुतेक लोक बाबूजींचे अनेक वर्षांपासूनचे चाहते. प्रत्येक जण दर्शनास उत्सुक झालेला दिसत होता. १ तास होऊन गेला. बाबूजी घरात आहेत का नाहीत हे सुद्धा समजेना. तेवढ्यात एक लहान मुलांची बस आली. बाबूजी जिंदाबाद! वगैरेच्या त्या लहान मुलांच्या तालबद्ध घोषणा ऐकताच मला आज १४ नोव्हें. तर नाही ना? अशी शंका आली. त्या लहान पोरांनी हिरवळीवर दंगामस्ती करायला सुरुवात केली तेव्हा मात्र सुरक्षा-अधिकाऱ्यांनी त्यांची दखल घेतली. त्या लहान पोरांच्यामुळे बाबूजी बाहेर आले. भराभर त्यांना हार घालण्यात आले. शिवाय प्रत्येकाची फोटो काढून घेण्याची हौस फोटोग्राफर्स मंडळी फेडीत होतीच. हार घालून प्रत्येजकण बाबूजींना नमस्कार करीत होता.(मागे काही दिवसांपूर्वी पँथरच्या एका कार्यकर्त्याने असे सांगितले होते की तुम्ही बाबूजींच्याकडे काही काम घेऊन गेलात तर वाकून नमस्कार केल्याशिवाय ते तुमचे म्हणणे ऐकून घेत नाहीत– अर्थात ही अफवा असावी असे तेव्हा मी गृहीत धरले होते.) घोषणा वगैरे झाल्या. अनेक चाहत्यांनी मिठाईचे पुडे आणले होते. त्यांचे वाटप झालेच म्हणा. गडबडीत बाबूजी निघून गेले.

संध्याकाळी दिल्ली नागरिक परिषदेतर्फे बाबूजींना जाहीर बधाई देण्याचा कार्यक्रम असल्याचे कळले. शिवाय तामिळनाडूचे मुख्यमंत्री कम हिरो एम. जी. रामचंद्रन प्रमुख पाहुणे आहेत हें समजल्यावर तर अधिकच उत्सुकता वाढली. विठ्ठलभाई पटेल हाउसच्या प्रांगणात एक भव्य सुशोभित मंडप घातलेला होता. प्रवेशद्वारापासूनच बाबूजींच्या पोस्टर्सच्या पताका फडफडत होत्या. पटेल हाउसच्या जवळच 'बाबूजीके जीवनपर फोटो प्रदर्शनी' चालू असते. कार्यक्रमाला वेळ असतो म्हणून प्रदर्शनात घुसलो. बाबूजींचे अनेक नेत्यांबरोबरचे फोटो त्यात असतात. कॉंग्रेस फॉर डेमॉक्रेसीच्या स्थापनादिनाची छायाचित्रे बऱ्याच ठिकाणी लटकविलेली आढळतात. ६ वाजतात. स्टेजच्या जवळपास नेत्यांची धावाधाव सुरू असते. ३–४ हजारांचा समुदाय उपस्थित असतो. स्टेजवर 'बाबू जगजीवनराम जन्मदिवस समारोह' असा फलक लावलेला. 'अजून थोडा वेळ आपण आपल्या लाडक्या नेत्यांची वाट पहा!' अशी घोषणा होताच मंडळी पांगायला सुरुवात होते. प्रांगणाच्या एका कोपऱ्यात खासदार श्यामसुंदरलाल काही गोष्टी समजावून सांगत असतात. 'निर्भय सेवक दल' नावाची एक दलितवर्गांसाठी आपण संघटना बांधली, तिचे महत्त्व ते १५–२० तरुणांना पटवून देतात. एक छोटा शेर ते वारंवार दोहरत असतात–

खुदा ने आज तक उस कौम की हालत नहीं बदली
नहीं एहसास जिसको खुद अपनी हालत के बदलनेका

अर्थात काही पोरं त्यांना उगाच हरभऱ्याच्या झाडावर चढवून पुन्हा पुन्हा शेर वदवून घेतात. टाइम-पास म्हणून हा खेळ मला सुद्धा मजेशीर वाटतो. तेवढ्यात एक गृहस्थ येतात व बळजबरीने हातात पत्रक कोंबतात. भारतीय दलितवर्गसंघाचे ते पत्रक असते. वेळ असतोच म्हणून त्या गृहस्थांना मी थांबवितो व थोडी माहिती विचारतो. दलितवर्गसंघाचे ते एक कार्यकर्ते असतात. नाव श्री. जगदीश प्रसाद. खास बाबूजींच्या जन्मदिवसाकरिता म्हणून बिहारमधून आलेले.

भारतीय दलितवर्गसंघाविषयी तुम्ही काही माहिती सांगू शकाल का? असा प्रश्न त्यांना विचारताच ते हात पकडून मला खाली बसवितात व आपल्या खास बिहारी हिंदीमध्ये माहिती सांगायला सुरुवात करतात. दलितवर्गसंघाचे संस्थापक माननीय बाबूजी आहेत असे म्हणून ते माझी चक्क विकेट घेतात. १९३६ साली दलितवर्गांची एकमेव संघटना म्हणून हिची स्थापना करण्यात आली. ज्या ज्या वेळेस सामाजिक व राजकीय विचारांच्या जाळ्यात दलितवर्गांना फसविण्याचा डाव खेळला गेला तेव्हा भा. द. वर्गसंघाने खऱ्या अर्थाने ह्या वर्गाला दिशा दाखविली आहे. आज देशात पुन्हा दलितवर्गांना असुरक्षितता वाटत आहे. त्यांच्या मनात असुरक्षिततेची भावना निर्माण केली जात आहे. म्हणूनच ह्या आमच्या संस्थेचे महत्त्व आजच्या घडीला आहे. सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे संघाची कोणत्याही राजकीय पक्षाशी बांधिलकी नाही. सर्वहारावर्गांच्या प्रगतीसाठी जे राजकीय पक्ष काम करतात त्या सर्वांना सहकार्य करण्याचे दलितवर्गसंघाचे धोरण आहे. संस्थेचे प्रमुख ध्येय व कार्य दलितवर्गातील दुफळी सांधून सामाजिक व राजकीय चेतना जागृत करणे हे आहे. म्हणून तर बाबूजींचा जन्मदिवस जन-जागृती-दिन म्हणून आम्ही साजरा करीत आहोत.

## मिस्किल रामधनजी

ही बातचीत चालू असतानाच बाबूजींच्या नावाचा जयघोष होतो, 'बाबुजी आ गये मैं चलता हूँ!' असे म्हणून हे गृहस्थ जातात. एका सर्वसामान्य कार्यकर्त्याला संस्थेविषयी एवढी समज आहे हे पाहून मला आनंद होतो.

तिकडे कार्यक्रमाला सुरुवात होते. बाबूजी स्टेजवर यायच्या आतच हजारो हार त्यांच्यावर अगदी फेकण्यात येतात. काठी टेकत टेकत ७१ वर्षांचे बाबूजी स्टेजवर येताच सर्व जण उभे राहून त्यांना बधाई देतात. दहा मिनिटे नुसता हारतुऱ्यांचा गोंधळ चालतो. काही जण फोटोसाठी मुद्दाम मागे व आजूबाजूला उभे राहतात. स्टेजवर इतकी गर्दी झालेली असते की, रेल्वे राज्यमंत्री श्री. शिवनारायण जेव्हा येतात तेव्हा त्यांना जागाच मिळत नाही. शेवटी रामधन त्यांना मांडीवर येऊन बसण्याची खूण करतात तेव्हा सर्व जण हसतात. शाही इमाम अब्दुल्ला बुखारींच्याकडे तर कोणी लक्षच देत नाही. १५-२० मिनिटे स्टेजवर असलाच गोंधळ चालतो. प्रेक्षक व जनता चुळबुळ करायला लागतात. शेवटी खासदार रामधन माईक हातात घेतात व संयोजनसमितीच्या डी. एन. तिवारींना बोलण्याचा आग्रह करतात. बहुगुणाजी व एम. जी. आर. ह्यांच्यामध्ये बसलेले तिवारीजी थोडेसे बावचळतात व नाइलाजाने माईक हातात घेतात. हे तिवारीसाहेब दिसायला हुबेहुब चौ. चरणसिंगांसारखे दिसतात. माईकच्या कर्कश आवाजात तिवारीजी म्हणतात, 'बाबुजी कृषिमंत्री होण्याच्या अगोदर भारताची धान्यस्थिती हलाखीची होती; परंतु बाबुजींना ज्या दिवशी कृषिमंत्री करण्यात आले त्याच दिवशी खूप पाऊस पडला व भारताने धान्योत्पादनात रेकॉर्ड स्थापन केले. बाबूजींनी जनता पक्षात प्रवेश केला, जनता-राज्य आले. 'सफलता बाबूजींके कदम हमेशा छूती है,' असे म्हणून ते प्रचंड टाळ्या घेतात व बसतात. बिचाऱ्या रामचंद्रना तर काहीच समजत नसावे. त्यांचे सेक्रेटरी प्रत्येक वाक्याचे इंग्रजीत भाषांतर करून कानात सांगत असतो. रामधन हे फार मिष्कील असावेत असा माझा समज आहे. कारण प्रत्येक वक्त्याचा उत्साह व एकूण संख्या पाहून ते प्रत्येकाला विनंती करतात की, फक्त प्रत्येकाने बधाई द्यावी. बाबूजींच्या विषयीचे प्रेम व्यक्त करण्यास इतर अनेक प्रसंग येणार आहेत. तेव्हा फक्त बधाई द्यावी, असे म्हणून रामधनजी म्हणतात, 'आता मी भूतपूर्व रेल्वेमंत्री रफी अहमद कुरेशी ह्यांना बोलण्याची संधी देतो.' त्यांच्या 'भूतपूर्व रेल्वेमंत्री' ह्या खोचक शब्दांचे कुरेशी हसतहसत स्वागत करतात; पण आपल्या उर्दूप्रचुर हिंदीमधून ते बाबूजींना म्हणतात, 'तुम्ही अचूक वेळी निर्णय घेऊन वातावरण बदलून टाकता. आज सारी जनता तुमच्याकडे पुन्हा असाच निर्णय घ्या अशी मागणी करते आहे.' कुरेशीसाहेबांच्या ह्या उद्गारांवर प्रेक्षक हुर्रे, हुर्रे करून दाद देतात. बिचारे कुरेशी 'हर सालके दिन हो पचास हजार' हा गुळगुळीत झालेला शेर सुनवून आपली बधाई देतात. त्यांच्या भाषणानंतर लगेच रामधनजी उठतात व आता सध्याच्या राज्य-रेल्वेमंत्र्यांचे विचार ऐका म्हणून शिवनारायणजींना उठवून उभे करतात. श्री. शिवनारायण ज्या पद्धतीने असंबद्ध बडबड करतात त्यामुळे त्यांचे हसे होते. 'बाबूजीने जब join किया वो एक drastic step था. उन्होंने जग को जीवन दिया है। हमको उन्होंने रेल्वेमंत्री बनाया इसलिये हमने रेल्वेका चक्का जाम नहीं होने दिया. बाबूजीके जीवन का चक्का भी हम घुमाते रहेंगे. Thus he who will join hands with us will go ahead.' असे काही तरी इंग्रजीत डायलॉग मारतात. प्रेक्षक टाळ्या मारतात. शिवनारायणजींना परत स्फुरण चढते व ते म्हणतात, 'मैंने राणा प्रताप के हल्दीघाटमें तलवार चलायी है, मोरारजीभाई को कानमें मंत्र दिया था, वो विमानअपघात से बच गये!' रेल्वेमंत्र्यांची गाडी रुळावरून बाजूला जातेय हे लक्षात येताच रामधन त्यांना लाल सिग्नल दाखवतात. ते खाली बसतात. त्यानंतर ५ मिनिटे नुसता हास्यकल्लोळ चालतो. 'वा! क्या आदमी है भाई! प्रभो, रेल्वे-मंत्रालय को बचाओ' असे उद्गारसुद्धा ऐकायला मिळतात. रामधनजी प्रसंगाचे गांभीर्य ओळखून म्हणतात, 'शिवनारायणजींचा स्वभाव मुळात विनोदी आहे. त्यांच्यासारखे व्यक्तिमत्त्व प्रत्येक पक्षात असतेच म्हणा. आता जनहो, तुम्हीच भूतपूर्व रेल्वेमंत्री चांगले का आताचे मंत्री चांगले हे ठरवा!' रामधनजींनी आपल्यावर कडी केलीय हे शिवनारायणजींच्या फार उशिरा ध्यानात येते. रामधनजींना आपण मानले.

खासदार सुमन, श्री. बहुगुणा, नानाजी देशमुख आपआपल्या स्टाइलमध्ये बाबूजींना बधाई देतात. शेवटी एम. जी. आर. तामीळमध्ये बोलतात. त्याचे भाषांतर इंग्रजीत त्यांचे सेक्रेटरी सांगतात व इंग्रजीचे हिंदी भाषांतर बहुगुणाजी शेवटी करून सांगतात. प्रेक्षक कंटाळतात. बाबूजी भारावलेले असूनही बरेच चांगले व थोडक्यात बोलतात. 'जगजीवनराम हमारे नेता! बाबूजी झिंदाबाद' अशा घोषणा देत एका केंद्रीय मंत्र्याचा घरगुती वाढदिवस जाहीररीत्या साजरा होऊन संपतो. बाबूजी खरे तर decaste झालेले आहेत असे असूनही त्यांच्यावर सर्वजण दलितवर्गाचे नेते म्हणून का शिक्का मारतात हे मात्र मला समजत नाही.

कार्यक्रम संपल्यावर बोटक्लबवर पोहचतो. गेल्या ५-६ दिवसांपासून तिथे हरिजन सेवक संघातर्फे स्वतंत्र हरिजन मंत्रालयाच्या स्थापनेसाठी उपोषण चालू असते. १०-१२ स्त्रिया व ३०-४० कार्यकर्ते– ज्यात बरेच जनता पक्षाचे कार्यकर्ते असतात. ही सर्व मंडळी उपोषणाला बसली होती. एकीकडे वाढदिवस साजरे होत आहेत तर दुसरीकडे दलितवर्गाच्या उन्नतीसाठी उपोषण व आंदोलन. हरिजन मंत्रालय ही भानगड आहे तरी काय? हे नवीन फॅड तर नाही ना? अशी शंका दिल्लीकर आज उघडपणे बोलून दाखवीत आहेत.

रात्रीचे आठ वाजलेले आहेत. मंडपात बरेच कार्यकर्ते बसलेले. मंडपाच्या आजूबाजूला बॅनर्स लावलेले असतात. त्यावर एकच घोषणा. हरिजन बसाओ, मंत्रालय बनाओ! एक उपोषणार्थी संतापलेला असतो. त्याचे म्हणणे बाबूजींनी आज इथे येऊन आमची विचारपूस करायला पाहिजे होती. शेवटी ते आमचे नेते आहेत. स्त्रियांचे चेहरे थकलेले असतात. सर्व उपोषणार्थी हरिजन सेवक संघाचे कार्यकर्ते अशी ओळख करून देतात. मी २-३ जणांना विचारतो, 'तुम्ही स्वतंत्र मंत्रालयाची मागणी कोणत्या भूमिकेतून करत आहात, त्यामागचे तुमचे समर्थन काय?' कोणीच उत्तर देत नाहीत. कारण त्यांचे सेक्रेटरीसाहेब बाहेर गेलेले आहेत व तेच प्रेसवाल्यांना माहिती सांगत असतात. मी प्रेसवाला नाहीय असे पटवून देण्यात १५-२०

मिनिटे जातात. तेवढयात एकजण हातात पुस्तकांचा गठ्ठा घेऊन येतो व प्रत्येकाला वाटतो. 'हरिजन मंत्रालय ही क्यों?' अशी लहानसी पुस्तिका असते. लेखक डॉ. सोहनपाल सुमनाक्षर. हरिश्चंद्र कर्तार नावाचा एक उपोषणार्थी 'मी तुम्हाला माहिती सांगतो. बसा!' असे म्हणून मला कोपऱ्यात घेऊन जातो. रात्रीचे ९ वाजलेले. प्रत्येकजण भरपेट डिनर घेऊन निवांतपणे झोपायच्या तयारीत तर आम्ही उपोषणार्थी हरिश्चंद्र ह्यांच्याबरोबर बातचीत करतोय.

## पुनर्वास मंत्रालयाचे कार्य

हरिश्चंद्रजी एकदम इतिहासात घेऊन जातात. १९४७ मध्ये पाकिस्तानची निर्मिती झाल्यावर लाखो पंजाबी व हिंदू नागरिक शरणार्थी म्हणून भारतात आले. ह्या लोकांच्याकडे तेव्हा काहीच नव्हते. त्यांच्या पुनर्वसनाची जबाबदारी भारत सरकारकडेच होती. म्हणूनच सरकारने प्रथम 'पुनर्वास मंत्रालय' स्थापन केले होते. ह्या मंत्रालयाचे काम प्रामुख्याने शरणार्थींच्या निवाऱ्याची, अन्नपाण्याची, व सुरक्षिततेची व्यवस्था करणे असे होते. कालांतराने सर्व शरणार्थी भारताचे नागरिक बनले. प्रत्येकांना घरे मिळाली व ते स्थाईक झाले. एवढेच नव्हे तर भारतीय नागरिकांपेक्षा हे शरणार्थी लवकर श्रीमंत झाले. त्यांनी संपत्तीसुद्धा मिळवली. हे सारे एकाच गोष्टीमुळे झाले. अत्यंत कार्यक्षम अशा 'पुनर्वास मंत्रालया'मुळे. पुढे शरणार्थींची समस्या संपल्यावर हे मंत्रालय आपोआपच बंद झाले.

आज भारतातील हरिजनांच्या समस्या, प्रश्न त्या शरणार्थींच्या मानाने जास्तच गंभीर आहेत. हजारो वर्षांपासूनच्या आमच्या समस्यांकडे ह्या पुनर्वास मंत्रालयाच्या आधारावर सरकारने विचार का केला नाही? मला तर असे वाटते की, सरकार फक्त आम्हाला झुलवीत ठेवत आहे. कॉंग्रेसने ३० वर्षांत तेच केले. जनता पक्षाने निदान ह्या दिशेने विचार करावा म्हणून आमचे हे स्वतंत्र हरिजन मंत्रालयासाठी उपोषण चालू आहे.

पण अशा स्वतंत्र मंत्रालयाने प्रश्न सुटणार आहे का? शिवाय हरिजन हा शब्द गांधीजींनी ज्या अर्थाने वापरला तो सर्वच अनुसूचित जातींना मानवणारा नाहीय. मग दलित मंत्रालय असे नाव का नको? आणि शेवटी social welfare मंत्रालय आहेच की ह्या मागण्यांचा विचार करण्यासाठी, असे अनेक प्रश्न मी विचारून टाकतो.

अर्थात तुम्ही हरिजन म्हणा किंवा दलित मंत्रालय म्हणा, It makes no difference, उलट दलित हा शब्द सर्वसमावेशक आहे. त्याला जातीचे मर्यादपण नाही. मात्र सामाजिक कल्याण मंत्रालय काय उजेड पाडते हे आपल्याला माहीत आहेच. आमचा त्यावर विश्वास नाही, असे थोडक्यात उत्तर मिळते.

हरिश्चंद्रजी रंगात आलेले असतात. अधिक मोकळेपणाने ते गप्पा मारतात. ह्या मंत्रालयाची मागणी करण्याची पाळी आमच्यावर यावी हे दुर्दैव आहे. स्वातंत्र्यानंतर अधिकारावर आलेल्या सरकारने डॉ. आंबेडकरांनी घडविलेल्या घटनेतील दलितवर्गाच्या हक्कासाठी १/४ तरी प्रयत्न केले आहेत का? सामाजिक, आर्थिक, राजकीय जीवनमान उंचावण्यासाठी अनुसूचित जातींसाठी घटनेत ठरलेल्याप्रमाणे 'कोटा' पूर्ण केला आहे का? अत्याचार थांबले आहेत का? भाईसाब, इसका जबाब एकही है, सरकारने कुछ नहीं किया। ३० वर्षांत दलितांच्या प्रगतीसाठी योजना करण्यात आल्याच्या गप्पा मात्र आम्ही ऐकल्या. आर्थिक प्रश्न सोडविण्यासाठी, रोजगारीच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी, सामाजिक विषमता दूर करण्यासाठी एकही योजना बनविण्यात आलेली नाही. दलितवर्गाची हालत अजूनही खराब झाली. हरिजन सेवक संघ, दलितवर्ग संघ, गिरिजनं सेवा संघ अशा अनेक संस्था निर्माण झाल्या. सरकारने करोडो रुपये ह्या संस्थांना दिले; पण त्याचा उपयोग झाला नाही. सरकारने आदिवासी दलितवर्गाच्या प्रगतीसाठी म्हणून नाममात्र अशा Sheduled Coste Commissioner ची नेमणूक करण्यात आली; पण ह्या कमिशनरला काहीच अधिकार दिले नाहीत. दरवर्षी नेमाने लोकसभेला रिपोर्ट सादर करण्यापलीकडे ह्या कमिशनरांना काही उद्योग नाही. त्यामुळे दलितवर्गाच्या समस्यांचे निराकरण झालेले नाही.

## अछूतिस्थान निर्माण होईल!

'आता तुम्हाला जनता सरकारविषयी काय सांगायचे म्हणा!' असे आडवळणे घेऊन हरिश्चंद्रजी पुन्हा पिळायला सुरवात करतात. तुम्हाला माहीत आहे, आज या बाबूजींचा वाढदिवस साजरा होतोय. त्यांच्याच आवाहनावरून आम्ही ७७ च्या निवडणुकीत जनता पक्षाला निवडून दिले. त्याचे फळ काय मिळाले? तर बेलछी धर्मपुरा येथील अत्याचार! दलितवर्गात सामाजिक व राजकीय चैतन्य जागृत होतेय अशी लक्षणे दिसताच सामंतवादी सवर्णांचे नव्या पद्धतीने दमनचक्र चालूच आहे; पण हे फार काळ चालू शकणार नाही. कारण जगातील स्वातंत्र्यलढे हे दमनचक्रातून निर्माण झालेले आहेत. आज दलितांवर होत असलेले अत्याचार डॉ. आंबेडकरांच्या देखत घडले असते तर त्यांनी समाजाला आगीने पेटवून जनआंदोलन छेडले असते. मग ह्या देशात रक्तरंजित क्रांती झाली असती व एक नवा देश निर्माण झाला असता. हरिजनांचा स्वतंत्र देश—अछूतिस्थान! पण ह्या देशातील २० करोड दलितांना देशाचे तुकडे होऊ नयेत असे वाटते; पण हे दमनचक्र असेच चालू राहिले तर १/३ लोकसंख्येसाठी वेगळा देश मात्र निर्माण करण्याशिवाय मार्ग नाही; पण जनता सरकार हे होऊ देणार नाही असा आमचा अजूनही विश्वास आहे!

'आता फक्त शेवटचा मुद्दा ऐकून घ्या!' असे म्हणत मी निघालो असताना सुद्धा ते बसवून घेतात. इतर उपोषणार्थी थकून झोपायला सुरुवात करतात. तो मैं क्या कह रहा था...हां! ह्या सर्व समस्यांचे, प्रश्नांचे निराकरण एका गोष्टीमुळे होऊ शकते आणि ते म्हणजे हरिजन मंत्रालयाची स्थापना! हे मंत्रालय हरिजनांच्या संविधानिक, आर्थिक, सामाजिक, राजकीय प्रश्नांची सोडवणूक करण्याचे काम करील. हरिजनांवरील अत्याचाराच्या संदर्भात सुद्धा हे मंत्रालय लढेल, उद्योगधंद्यांसाठी पैसे पाहिजे असतील तर हे मंत्रालय पुरवठा करील, एवढेच नव्हे तर रोजगार, घरबांधणीत सुद्धा मदत करील. मात्र ह्यासाठी संविधानिक अधिकार व कक्षा असलेले मंत्रालय सरकारने निर्माण केले पाहिजे तरच हरिजन-कल्याणाच्या योजना प्रभावीपणे राबविता येतील. म्हणूनच आमची घोषणा आहे. हरिजन

बसाओ–मंत्रालय बनाओ !

शेवटी तब्बल ३ घंटयांनंतर माझी मुक्तता होते. हरिश्चंद्रजीं-सारखेंच इतर प्रामाणिक कार्यकर्ते ५ व्या दिवशी सुद्धा उपोषणाचा निर्धार ठामपणे व्यक्त करतात. जाताजाता 'हरिजन मंत्रालय ही क्यो ?' ही पुस्तिका चाळून बघतो. बहुधा हरिश्चंद्रजींनी ह्या पुस्तिकेतूनच माहिती सांगितली की काय अशी शंका येते.

एकीकडे सार्वजनिक समारंभातून जनतानेत्यांची भाषणबाजी चालू आहे, दर आठवडयाला काही तरी नवा स्टंट सुरू होतो, वाढदिवस साजरे होत आहेत. ह्या सर्व गोष्टींवर दिल्लीतील 'नवभारत टाइम्स'च्या वाचकांच्या पत्रव्यवहारात एका वाचकाने आपली काव्यात्म प्रतिक्रिया नोंदविली आहे.

दूसरी आजादी का उबाल
खूब तेजी से उठा है
उबल रहे है कालेज
खौल रही है युनिवर्सिटियाँ ?
सब कुछ मानव की आदत है
कैसे रोक लगायी जा सकती है ?
नशाबंदी बहुत जरुरी है
भले ही रोटी न मिले
कोई नियम बंधन कैसा ?
हम गुलाब काट कर क्या
काँटे बो रहे हैं ?
क्या सचमुच ही हम सब
निर्भय हो रहे हैं ?

सामान्य माणसांच्या ह्या प्रतिक्रियेची दखल राज्यकर्ते घेणार आहेत की नाहीत ?

□


चवदार तळे सत्याग्रह, मनुस्मृतिदहन या घटनांची सविस्तर माहिती

**महाडचा मुक्तिसंग्राम**

लेखक

प्रा. रा. म. बिवलकर । प्रा. झुंबरलाल कांबळे

किंमत वीस रुपये

प्रस्तावना : प्रा. नरहर कुरुंदकर

पुरस्कार : श्री. भय्यासाहेब आंबेडकर

राजहंस प्रकाशन । १०२५ सदाशिव पेठ । नागनाथ पाराजवळ । पुणे ३०

# निर्दोष निवडणुका

## दोन अहवालातील शिफारशी

वा. दा. रानडे

निवडणूकपद्धतीत सुधारणा करण्याचे आश्वासन जनता पक्षाने १९७७ च्या लोकसभा निवडणुकीच्या वेळी दिले होते त्यानुसार निवडणूक कायदा दुरुस्ती विधेयक तयार करण्यात येत आहे. निवडणूक कमिशनने यासंबंधात आपल्या शिफारशी गेल्या महिन्यात सरकारला सादर केल्या. तारकुंडे समितीनेही आपला अहवाल नुकताच प्रसिद्ध केला. या दोन अहवालांतील काही शिफारशी परस्परविरोधी आहेत. त्यांपैकी कोणती भूमिका बरोबर, तसेच सध्याच्या निवडणूकपद्धतीतील दोष दूर करण्याच्या दृष्टीने या शिफारशी पुरेशा आहेत काय या दृष्टिकोनातून त्यांचा विचार येथे करीत आहे.

राजकीय पक्षांची निश्चित व्याख्या करण्यात यावी म्हणजे एकच नाव व चिन्ह यावर दोन पक्षांनी दावा सांगितल्याने निर्माण होणारा गोंधळ नाहीसा होईल असे निवडणूक कमिशनने सुचविले आहे; पण केवळ व्याख्या केल्याने हा गोंधळ कसा नाहीसा होईल? पक्षात फूट पडल्यानंतर त्यातला मूळचा पक्ष कोणता यावर कितीही वाद चालो, दोन्ही पक्षांचे अस्तित्व मान्य करायला हवे. फुटीनंतर पूर्वीची खूण त्यातल्या कोणत्याही पक्षास न देण्याचे धोरणच योग्य.

निवडणुकांतील भ्रष्टाचाराला आळा कसा घालावयाचा हा खुल्या निवडणुकांच्या दृष्टीने सर्वांत महत्त्वाचा प्रश्न आहे. उमेदवार ज्या राजकीय पक्षाचा असेल तो पक्ष तर त्याचा प्रचार करतोच, पण त्याशिवाय त्याचे मित्रमंडळ त्याच्या प्रचारासाठी मंडळ किंवा संघ स्थापतात. या मंडळांनी अनधिकाराने केलेला खर्च तसेच उमेदवार आणि त्याच्या राजकीय पक्षाने सादर केलेले खर्चाचे खोटे हिशेब हा भ्रष्टाचार समजण्यात यावा अशी निवडणूक कमिशनची शिफारस आहे, पण अनधिकाराने केलेला खर्च आणि खोटे हिशेब या गोष्टी कोर्टात सिद्ध करता आल्या तरच तो गुन्हा ठरणार, कायद्याच्या कचाट्यात आपण सापडणार नाही अशी दक्षता घेऊन कित्येकदा असे खर्च केले जातात. उमेदवाराच्या मित्रमंडळास त्याच्या प्रचारासाठी खर्च करण्याचा अधिकार कसा नाकारता येईल? पण त्याचेही रीतसर हिशेब ठेवले पाहिजेत आणि उमेदवाराच्या निवडणूक खर्चाचाच तो भाग समजून कायद्याने घालून दिलेल्या मर्यादेतच तो असला पाहिजे अशी स्पष्ट तरतूद कायद्यात करण्यात यावी. कायद्याने घातलेल्या मर्यादेतच आपण खर्च केला असे सर्व उमेदवार आपल्या हिशेबात दाखवीत असले तरी प्रत्यक्षात या मर्यादा त्यांनी पाळलेल्या नसतात हे उघड गुपित आहे. तेव्हा या भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी खर्चाची मर्यादा दुपटीने वाढवावी अशी शिफारस निवडणूक कमिशनने केली आहे; पण राजकीय पक्षाने केलेल्या खर्चाचाही त्यात समावेश करावा अशी अट घातली आहे. उमेदवाराच्या वैयक्तिक निवडणूक खर्चाचीही स्पष्ट व्याख्या करण्यात यावी असे निवडणूक कमिशनने सुचविले आहे. कंपन्यांनी राजकीय पक्षांना देणग्या देण्यास पूर्ण बंदी करावी अशीही कमिशनची शिफारस आहे.

निवडणुकांवरील भरमसाट खर्चाला आळा घालावयाचा असेल तर सरकारनेच या खर्चाचा काही वाटा उचलला पाहिजे यावर तारकुंडे समितीने आपल्या अहवालात भर दिला आहे. मतदाराचा मतदारयादीतील क्रमांक, मतदान केंद्र-क्रमांक वगैरे तपशील असलेल्या मतदारचिठ्या सध्या उमेदवारांचेच प्रचारक घरोघर पोचवितात. सरकारनेच या चिठ्या प्रत्येक मतदाराकडे पोस्टाने पाठवाव्या असे तारकुंडे समितीने सुचविले आहे. मतदारयादीच्या सहा प्रती प्रत्येक उमेदवारास मोफत पुरवाव्या. पस्तीसशे शब्दांपर्यंत प्रचारसाहित्य उमेदवारास सरकारी खर्चाने छापून पुरवावे. मतदारसंघातील एकूण मतदारांच्या २५ टक्के एवढ्या त्याच्या प्रती असाव्यात. याशिवाय प्रत्येक लोकसभा उमेदवारास दहा हजार आणि विधानसभा उमेदवारास अडीचशे पोस्टर्स सरकारी खर्चाने छापून मिळावीत. लोकसभा उमेदवारास ३६०० लिटर डिझेल आणि विधानसभा उमेदवारास ६०० लिटर डिझेलची सरकारी कुपने मिळावीत. आकाशवाणीवर पाच मिनिटे भाषणासाठी वेळ दिला जावा. सरकारी किंवा स्थानिक संस्थांच्या नियंत्रणाखालील शाळांची सभागृहे सभांसाठी अल्पखर्चात मिळावीत, अशा सूचना तारकुंडे समितीने केल्या आहेत. ज्या उमेदवारांना निवडणुकांचा वाढता खर्च करणे शक्य नाही त्यांना काही प्रमाणात मदत या सवलतींमुळे होईल यात शंका नाही; पण पैसेवाले उमेदवार या सवलतींचा तर फायदा घेतीलच शिवाय जादा खर्चही करतील. निवडणूकखर्चावर कायद्याने बंधने असली तरी त्यातून पळवाटा कशा काढावयाच्या याचे तंत्र अशा उमेदवारांना चांगले अवगत असते. त्यांच्या गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी आणि त्याबाबतच्या तक्रारींची दाद लावून घेण्यासाठी मतदारांच्या दक्षतासमित्या हव्यात. तारकुंडे समितीने तशी शिफारस केलेली नाही; पण तिचा विचार व्हावा.

निवडणूकखर्च सरकार करणार आहे ना? मग उभे रहायला काय हरकत आहे? विजयी झालो तर सरकारी खर्चाने खासदार-आमदार होता येईल; पडलो तर सरकारचा पैसा जाईल असा विचार करून उमेदवार अधिक संख्येने उभे राहण्याचा संभवही नाकारता येणार नाही. हे टाळण्याचा एक उपाय म्हणून अनामत रक्कम वाढविण्याची सूचना तारकुंडे समितीने केली आहे. अनामत रक्कम लोकसभा उमेदवारासाठी दहा हजार रुपये व विधानसभा उमेदवारासाठी तीन हजार रुपये ठेवण्याची सूचना समितीने केली आहे. ज्यांना सरकारी मदत घ्यावयाची नाही त्यांच्यासाठी अनामत रक्कम लोकसभा उमेदवाराकरिता २५०० रुपये व विधानसभा उमेदवाराकरिता १००० रुपये अशी समितीने सुचविली आहे; पण सरकारी सवलती घेण्याचे कोणी नाकारील असे वाटत नाही. अनामत रक्कम हा निवडणूकखर्चाचा भाग समजावयाचा की नाही हेही कायद्यात स्पष्ट करायला हवे. ही रक्कम एकूण मतदानाच्या एकषष्ठांशापेक्षा जास्त मते मिळाली तरच परत मिळते, कमी मिळाली तर जप्त होते; पण त्यासाठी तरतूद

पृष्ठ २० वर

# चक्रम्चक्री ( ३३ )

दीर्घस्मृति विश्वनाथ

# तरुणाईचा संप्रदाय

परवा पर्वतीवर गेलो होतो, तेव्हा एक गंमत झाली !

काय गंमत झाली ?

सहज फुटाणे घेतले, तेव्हा फुटाण्याच्या पुडीच्या कागदावरचा मजकूर वाचला. हसता हसता पुरेवाट झाली.

अरे, मग मला दाखवायला का आणला नाही ?

हा काय वाचूनच दाखवतो.

दाखवा, दाखवा !

ऐका 'बीरवाडीच्या बहाद्दर बहिणी' अशा मथळ्याखालचा मजकूर आहे. येथील म्हाळसादेवी बालिका विद्यालयात परवा जो भन्नाट प्रकार घडला त्याने गावकरी चक्रावून गेले आहेत. किस्सा घडला तो असा. अकराचा सुमार. विद्यालयाच्या प्रार्थनेची रेकॉर्ड लागणार. पाच-सात मुली हेडबाईंच्या खोलीत शिरतात. 'बाई, प्रार्थनेपूर्वी आम्हाला गोपीनाथ वडार यांना श्रद्धांजली वाहायची आहे!' मुलींची बिनधास डिमांड! 'गोपीनाथ वडार कोण ?' बाईंचा चक्रावलेला सवाल. 'काय भंकस लावताय, बाई ! गोपीनाथची माहिती नसलेल्या हेडबाईंच्या शाळेत बसायचे की नाही याचा आम्हाला विचार करावा लागेल !' एका नाकेलीचा सडेतोड शेरा. 'अग, पण मला खरंच गोपीनाथ माहिती नाही.' बाईंची खजिल कबुली. 'शी: पच्का!' असे म्हणत मुली शाळेतून बाहेर पडल्या आणि अर्ध्या तासात भकास बाकांना शिकविण्याची पाळी शिक्षकांवर आली. ही बातमी कळताच खास मोटारीतून मी बीरवाडीला पोचलो. तेथल्या नाक्यावरच्या उडप्याकडे कुरकुरीत दोसा आणि टेस्टी वडासांबार खाऊन जाधवांच्या वस्तीवर गेलो. या तडफदार पोरींच्या पुढारी शैलू आणि शकुन् तेथे राहतात. 'गुड आफ्टरनून दोस्त !' असे विश् करताच सावळ्या रंगाची न् हसऱ्या डोळ्यांची शैलजा जाधव भुरभुरणारे केस मागे सारीत मला म्हणाली... 'काय, आहे की नाही मासलेवाईक उतारा ?'

तुम्ही ओळखलंच असेल, कशाचे पान आहे ते ?

'हं: ! ते काय कोणीही सांगेल. सध्या 'धावत्या जगाचं धावतं साप्ताहिक' म्हणून धापा टाकतंय् त्या नियतकालिकाच्या 'तरुण-तरुणींचे आवडते साप्ताहिक' या पूर्वावतारातल्या अंकाचं पान असणार हे. म्हणजे ५ वर्षं तरी झाली असतील !'

'नेमकं ओळखलंत.'

'अहो, पण असे या साप्ताहिकाचे अवतार होणार आहेत तरी किती ?'

आपल्याला कशाला काळजी ? कारखान्यात काम करणाऱ्या ओथंबल्या गालांच्या एक्झिक्यूटिव्हजना नि त्यांच्या बायका-बछड्यांना भाषेच्या द्वारे कुरवाळण्यासाठी अलीकडे अशा नियतकालिकांचा उपयोग होत असतो. कारखान्यांतून घरी आल्यावर बो किंवा टाय उतरवून बूट काढताना नजर फिरविण्यासाठी ही प्रकाशनं हाताशी बरी असतात. आता साबणाच्या सुबक पेटीसारख्या घरांतून रहाणाऱ्या साबणाइतक्याच मऊ, गुळगुळीत, ओशट आणि सुगंधी माणसांना कुरवाळण्यासाठीच जी मासिकं, साप्ताहिकं निघतात, ती त्या साबणी जगात खपेल ते साबणाच्या बुडबुड्यांसारख्या भाषेत पुरविणार हे उघड आहे. पाच-सहा वर्षांमागे युवक आंदोलनांची चलती होती. तो अमेरिकन छापाचा इम्पोर्टेड माल होता. त्यामुळे सध्याचे धापावलेले साप्ताहिक तुम्ही आता वाचलेत तसले तरुणाईच्या स्तुतीचे बुडबुडे काढीत होते !'

नाही, हे सगळे ठीक आहे; पण म्हणून असला तद्दन फालतू मजकूर ? बीरवाडी ती काय, गोपीनाथ तरी कोण, उडप्याच्या हॉटेलातला वडा-दोसा कोठून आला-कशाला कशाला मेळ तरी आहे का ?

तुम्ही आता जे बोललात ना, ते केवळ मघा वाचलेल्या मजकुरापुरतंच खरं आहे, असं नसून आणीबाणीपूर्वी महाराष्ट्रात युवा-आंदोलनांना या मासिका-साप्ताहिकांनी जे बाजारी स्वरूप आणलं होतं त्याच्या संदर्भातही खरं आहे. आता तुम्ही वाचलेला उतारा कसा आहे ?

साबणाच्या फेसाचा बुडबुडा फुगवल्यासारखा आहे. मजकूर नुसता फुगत जातो. 'भन्नाट प्रकार' आणि 'चक्रावून गेले' इथून फुंकर भरायला सुरवात होते 'शी: पच्का' इथे फुगा फुंकणीपासून सुटल्यासारखे वाटते. शेवटी वार्ताहर जेव्हा 'हसऱ्या डोळ्यांची नि सावळ्या रंगाची' या कौतुकात शिरतो तेव्हा हा फुगवटा टच्कन फुटतो.

वा, वा ! काय समर्पक वर्णन केलेत. नेमके हेच वर्णन त्या काळातल्या साऱ्या युवक आंदोलनाला 'सेम टू सेम' लावून दाखविता येईल. साबण थोडा, फेस जास्त आणि फुंकर न पेलवण्याइतकी. अहो, हे आंदोलन प्रत्यक्षापेक्षा नियतकालिकातूनच जास्त रंगत होतं आणि जे काही प्रत्यक्ष कार्य होत होते त्यातलं अस्सल किती आणि नक्कल किती हे ठरवणंही कठीण होतं.

### तरुणाईचा प्रसाद

हां, विश्वनाथ, जरा जपून बोला. तुमचे म्हणणं काय की, पासष्ट सालापासून पंचाहत्तरपर्यंतच्या दहा वर्षांत युवक क्रांती दल, अ. भा. वि. प., युवक कॉंग्रेस वगैरेंच्या नावावर मोजली गेलेली निरनिराळी आंदोलनं ही खोटी, नियतकालिकांनी फुगवलेली, अमेरिका आणि पाश्चात्य देशांतून झालेल्या युवा चळवळींचं अनुकरण करण्यासाठी घडविली गेलेली आणि सत्त्वहीन होती ? अहो, तरुणांच्या विधायक शक्तीचे आणि अन्यायाविरुद्ध लढण्याच्या ईर्षेचे असे प्रभावी दर्शन या आंदोलनांनी घडविले की, शुचिष्मंत दाभोळकरांसारखा स्थिरबुद्धी विचारवंत-

देखील भारावून गेला. बाबा आमटे यांनी तरुणांच्या या कर्तृत्वाला अनुलक्षूनच 'तरुणाई' हा शब्दप्रयोग केला. दहा वर्षे गाजवणाऱ्या तरुणाईने काहीच दिले नाही हे म्हणणे उजू ठरणार नाही.

हा तुमचा झपाटा आधी आवरता घ्या बघू. असे पहा की, ६५–७५ या दहा वर्षांत मराठी समाज काही स्थिर नव्हता. त्यात बरे-वाईट काही ना काही घडलेच. जे काही घडले त्यातला फार मोठा वाटा तरुणांचाच असणार. हे सर्व केवळ ६५–७५ या दशकाच्याच बाबतीत खरे आहे असे नाही. कोणत्याही काळातल्या घडामोडींबाबत हे म्हणता येईल. म्हणजे समाजातल्या बदलात मोठा वाटा कायमच तरुणांचा आहे; पण आपण त्याला तरुणांचे कर्तृत्व असे न म्हणता समाजाचे कर्तृत्व असे म्हणत असतो. कारण, तरुणांना आपण समाजातून वेगळे काढत नाही. ६५–७५ या काळात मात्र काही विचारवंत आणि नियतकालिके यांनी असा विचार मांडला की, तरुणांचे तरुण म्हणून स्वतंत्र आणि वैशिष्ट्यपूर्ण कर्तृत्व आहे. असे वैशिष्ट्यपूर्ण कर्तृत्व म्हणजेच तरुणाईचा प्रसाद. वाद आहे तो तरुणांना समाजापासून असे निराळे काढण्याविषयी. तरुणांच्या तारुण्यविशिष्ट कर्तृत्वाचा ६५–७५ या दशकांतला जमाखर्च काय आहे, हा प्रश्न आहे.

तरुणांचे तारुण्य-विशिष्ट कर्तृत्व म्हणजे काय ?

मार्क्सने असा विचार मांडला होता की औद्योगिक क्रांतीपासून उत्पादनसाधनांची मालकी काही थोड्या भांडवलदारांच्या हाती एकत्रित झाल्याने समाजातल्या इतर घटकांची पिळवणूक होत आहे. ही पिळवणूक बंद व्हायची असेल तर उत्पादनसाधने सामाजिक मालकीची झाली पाहिजेत. ही क्रांती घडवून आणण्यासाठी क्रांतीचे अग्रदूतत्व घेतलेला वर्ग समाजात हवा. असा वर्ग म्हणजे कामगारवर्ग. कारण भांडवलदारांनी समाजाची जी जखडबंदी केलेली आहे त्यात कामगारवर्गाचे कोणतेच हितसंबंध गुंतलेले नाहीत. या विचारावर भिस्त ठेवून पाश्चात्य जगातले क्रांतीची प्रतीक्षा करणारे विचारवंत स्वस्थ होते; परंतु, हा विचार मांडल्यानंतर शंभर–सव्वाशे वर्षे झाली तरी क्रांतीचा पायरव काही ऐकू येईना; इतकेच नव्हे तर जेथे मार्क्सवादी क्रांती झाली असे मानले जात होते त्या रशियातील राजवटीविषयीही या मंडळींचा भ्रम–निरास झाला. तेव्हा क्रांतीच्या अग्रभागी रहाण्याची कामगारवर्गाची इच्छा नाही; प्रस्थापित जखडबंदीत त्या वर्गाचेही हितसंबंध गुंतलेले आहेत, भांडवलशाही अर्थव्यवस्था कामगारवर्गाला सामावून घेऊ शकते असा निष्कर्ष निघाला आणि आता क्रांती कशी होणार हा गहन प्रश्न क्रांतीसाठी आसुसलेल्या विचारवंतांना भेडसावू लागला.

मग ?

मग काय, शोधलं की सापडते. त्या वेळी व्हिएटनामच्या युद्धासाठी अमेरिकेत सक्तीची सैन्यभरती चालू होती. विद्यापीठातल्या विद्यार्थ्यांचा या सैन्यभरतीला विरोध होता. त्या विरुद्ध विद्यापीठे ताब्यात घेणे, निदर्शने करणे, मूक मिरवणुका काढणे अशा चळवळी हे तरुण विद्यार्थी करत होते. या चळवळीतून काही तुरळक चांगल्या गोष्टीही निघत होत्या; म्हणजे काळ्या विद्यार्थ्यांविषयी अधिक आस्था गोरे विद्यार्थी दाखवीत होते, काळ्यांच्या सांस्कृतिक प्रगतीचा अभ्यास विद्यापीठातून सुरू व्हावा असा आग्रह धरीत होते. याखेरीज कित्येक तरुण सामाजिक परिस्थितीला कंटाळून चरस, गांजा, भांग यांच्या आधीन होत होते किंवा वैराग्य पत्करून हिप्पी बनत होते. तरुणांच्या चळवळींच्या या विविध अंगांतून क्रांतीचे स्फुल्लिंग प्रज्वलित होत असल्याचा भास मार्क्यूज; रैश वगैरे विद्वानांना झाला आणि क्रांतीचे दूत म्हणून तरुण पिढीकडे ते पाहू लागले. तरुणाईच्या संप्रदायाची बैठक या विचारात आहे.

हां, म्हणजे वरकड तरुण आणि त्यांचे चाळे यांना तरुणाई म्हणत नाहीत तर ! क्रांतीचे अग्रदूतत्व पत्करण्यासाठी सज्ज झालेला सळसळत्या रक्ताच्या नवयुवकांचा समूह म्हणजे तरुणाई आणि या ध्येयवेड्या तरुणांनी केलेले क्रांतिकार्य म्हणजे त्या तरुणाईचा प्रसाद !

थांबा, असे वाहून जाऊ नका. आपण आता जे म्हटले त्याचा अर्थ ध्यानात घ्या. तरुणाईचा प्रसाद म्हणजे क्रांतिदूत बनलेल्या तरुणांनी उत्पादन-साधनांच्या मालकीसंबंधात बदल घडवून आणण्यासाठी केलेले प्रयत्न असा जर आपण अर्थ करणार असू तर ६५–७५ या काळात नियतकालिकांच्या स्तंभांतून तरुणाईची जी पूजा महाराष्ट्रात करण्यात आली तिचे काय फळ मिळाले याचा विचार करावा लागेल. विद्यापीठांचे कुलगुरु बदलणे, फी-वाढ रद्द करवून घेणे, मेडिकल कॉलेजेसमधील कॅपिटेशन-फी संपविणे वगैरे चळवळी बहुधा दुर्लक्षाव्या लागतील. कारण त्यातून अभिप्रेत क्रांतिकार्य जवळपास साधतच नाही. जमिनीची मालकी आणि कारखानदारी बदलावी अशी चळवळ करण्याइतपत बळ या युवक-चळवळींना आलेही नाही. एक तर जिथे शेतजमीन आहे अशा खेडेगावात तरुणाई पोचलीच नाही आणि कारखान्यांच्या मालकीचा प्रश्न काढावा तर कारखानदारांची मालकी असलेल्या नियतकालिकांतूनच या चळवळींना प्रसिद्धी मिळणार. कार्यापेक्षा प्रसिद्धीची हौस केव्हाही जास्तच.

पण मग युवकचळवळींनी साधले काय ?

तेच तर मी पहिल्यापासून विचारतो आहे. तरुणांनी क्रांतीचे अग्रदूत व्हावे, सामाजिक जखडबंदीच्या बाहेर पडून तीवर प्रहार करावेत ही तात्त्विक भाषा ठीक आहे; पण तिचा व्यवहारातला अर्थ कोणी सांगितलाच नाही. नाही म्हणायला दलितांविषयीची एक शब्दबंबाळ कणव मात्र या चळवळीत दिसत असे.

पण हल्ली या तरुणाई-संप्रदायाचा गवगवा का ऐकू येत नाही ?

कारण, जग धावते आहे. व्हिएटनामची लढाई सरली तशी अमेरिकेतली युवक-चळवळही लोप पावली. त्याबरोबर अमेरिकेत उडणाऱ्या वावड्यांकडे लक्ष ठेवून साबणी बुडबुडे काढणाऱ्या आपल्या येथल्या साबणी जगातल्या मंडळींनी नवी खेळणी हाती घेतली. क्रांतिदूत मंडळी राजकारणाच्या बाजारात उतरली. स्वस्त प्रसिद्धी आता त्या क्षेत्रात मिळते. त्यामुळे पिढीतले अंतर, एलिअनेशन, शास्त्राला द्यायचा माणुसकीचा डोळा हे बुडबुडे विरून गेले.

काहीही असले तरी जवळपास दहा वर्षे एक विशिष्ट विचार तरुणांच्या जगात वावरला. काही थोडे लोक समजून म्हणा, गैरसमजाने म्हणा त्या विचाराने झपाटले गेले. फॅशन म्हणून किंवा मुलांचे लाड करायचे म्हणून अगर युवकांच्या ध्येयवादाकडे आकर्षिले जाऊन वृत्तपत्रांनी आणि नियतकालिकांनी या चळवळींना नको तितकी प्रसिद्धी दिली. तेव्हा या तरुणाई-संप्रदायाने साधले काय याचा अधिक विस्तृत हिशेब मांडला जायला हवा की नको ?

इतिहास–संशोधक मंडळाच्या त्रैमासिकात एखादे संशोधक हा विचार करतीलही. धावत्या जगामागे फेस गाळत जाणारी नियतकालिके थोडीच तसा हिशेब करणार आहेत ? □

# अवती-भवती

शरद कृष्णन्

## □ आक्रमक विरोधी पक्ष–इंदिरा कॉंग्रेस

कोणाला आवडो न आवडो; पण एक गोष्ट वादातीतपणे सिद्ध झाली आहे की, प्रमुख विरोधी पक्ष म्हणून इंदिरा कॉंग्रेसने स्थान प्राप्त करून घेतले असून आपल्या आक्रमक धोरणाने प्रतिदिनी त्याची शक्ती वाढत आहे. आय् एम् दी अपोझिशन असे इंदिराजी म्हणतात त्याला खरोखरच अर्थ प्राप्त झाला आहे. आईचे सामर्थ्य वाढू लागताच चिरंजीव संजय आपल्या मूळ स्वभावाचे दर्शन घडवू लागला आहे. न्यायालयामध्ये सरकारी वकिलाला शिवीगाळ करण्या-इतका त्याचा उद्धटपणा वाढला असून शहा आयोगाचे आवारही त्याच्या जयजयकाराने निनादून निघत आहे. कर्नाल पोटनिवडणुकी-मध्ये बाईंच्या नावावर मतांचा पाऊस पडला. सव्वादोन लाख मतांच्या फरकाने जिंकलेली जागा केवळ अठरा हजारांच्या निसटत्या फरकाने जिंकून जनता पक्षाने उत्तरेतही लोकप्रियतेच्या बदलत्या वाऱ्याची हवा अनुभवली आहे. अधिकृत कॉंग्रेसचे अधिकृत उमेदवार शशिभूषण केवळ दोन हजार मते घेऊ शकले, याचा अर्थच असा की, दादा म्हणतात त्याप्रमाणे ही अधिकृत कॉंग्रेस जुन्या कॉंग्रेस 'ओ'च्या वाटेने निघाली आहे. अधिकृत कॉंग्रेसचा किल्ला प्राणपणाने लढविण्या-खेरीज चव्हाणांना पर्याय नाही म्हणून अन्यथा मीलनातून वसंतराव नाइकांचा हात धरून ही बलहीन कॉंग्रेस केव्हाच इंदिरावासी झाली असती. सी. सुब्रह्मण्यम्, स्वर्णसिंग, के. डी. मालवीय ही सारी मंडळी कणा नसलेल्या अवस्थेत, इंदिरा कॉंग्रेसकडे तोंड करून उभी आहेत. एखादी जोराची वावटळ आली तर ही मंडळी भुर्रकन उडून जातील. मग उरलेल्या अधिकृत कॉंग्रेसचा कोसळता तंबू नेट लावून खडा ठेवण्याची जबाबदारी साहेबांवरच येऊन पडेल. अधिकृत कॉंग्रेसच्या लोकसभेमधील गटाचे नेतेही तेच आणि कॉंग्रेसचे अध्यक्षही तेच अशी अवस्था होईल. ती टाळायची असली तर चव्हाण-समर्थकांनी हिंमतीने आक्रमक धोरण स्वीकारले पाहिजे. नपेक्षा अस्तित्वात असूनही नगण्य पक्ष म्हणून सत्वहीन जिणे जगण्याची पाळी या पक्षावर आल्याखेरीज राहणार नाही. तिरपुडे–अंतुले यांनी मनमानी टीका करावी, नाव घेऊन यशवंतरावांचा पिच्छा पुरवावा आणि दादांनी बिचकत बिचकत तिरपुडे यांनी यशवंतरावांवर टीका करण्याचे थांबवावे असे सुचवावे यातच पराभूत मनोवृत्तीचे दर्शन घडते. दादांची माणसे दिवसाढवळ्या पळविली जात आहेत आणि दादा काही करू शकत नाहीत. हतबल होऊन म्हणतात, 'हे बरे नव्हे!' हे कशाचे लक्षण समजायचे? आत्मविश्वास गमविलेला हा पक्ष देशाच्या मोठ्या भागातून हुसकला गेल्यावर लोकसभेतही त्याची प्रतिक्रिया उमटणार असे वाटले होते. अपेक्षेइतक्या लवकर पळापळ झाली नसली, तरी दोन कॉंग्रेसमधील रस्सीखेच सध्या तरी इंदिरा कॉंग्रेसने जिंकली आहे. प्रारंभी अधिकृत कॉंग्रेसकडे असलेले आणि नंतर इंदिरा कॉंग्रेसला जाऊन मिळालेले स्टीफन आता विरोधी पक्षनेते बनले असून यशवंतराव चव्हाण केवळ एका गटाचे नेतृत्व करणारे खासदार उरले आहेत. त्यांच्यामागे आज तरी ६८ खासदार उभे आहेत. आसाम, केरळ आणि महाराष्ट्र या तीन राज्यांमधील बहुसंख्य कॉंग्रेस खासदार अजूनही त्यांच्याबरोबर आहेत, तर गुजराथ आणि तामिळनाडू येथील निम्मे खासदार त्यांच्याबरोबर आहेत. या पक्षाने निवडणुकीमधील यशाद्वारा आपले सामर्थ्य सिद्ध केले नाही तर ही गळती वाढतच जाणार असे दिसते. देशाचे राजकारण अर्थ-पूर्ण व्हावे आणि लोकशाहीला धोका प्राप्त होऊ नये असे वाटणाऱ्या सर्व मंडळींना हा पक्ष जगलाच पाहिजे असे वाटते; पण नुसत्या सदिच्छांवर पक्ष जगत असता तर समाजवादी–प्रजासमाजवादी लोहिया–जमान्यातच सत्तेवर आले असते! झिजत जाणारा हा पक्ष जगविण्याची ऐतिहासिक कामगिरी यशवंतरावांवर येऊन पडली आहे. ते ती कशी पार पाडतात ते बघायचे. पक्ष लहान म्हणून घाबरून जाण्याचे कारण नाही; पण आज पक्ष लहान असला तरी तो मजबूत राहील व आस्ते आस्ते आपले बळ वाढवील याची जबाबदारी त्यांना घ्यावी लागेल. ब्रिटनमधला लिबरल पक्ष काही फार मोठा पक्ष नाही; परंतु फाटाफुटीचा शाप त्याला नसल्याने छोटा असला तरी त्या पक्षाला स्थान आहे आणि चुरशीच्या वेळी तर ब्रिटिश पार्लमेंटमधील त्याच्या ताकदीला असाधारण महत्त्व आहे. एके काळी सामर्थ्यशाली असलेल्या या पक्षाचे सामर्थ्य दुसऱ्या महायुद्धानंतर कमी होत गेले आणि त्यानंतरच्या काळात तर ६३५सदस्य असलेल्या सभागृहामध्ये या पक्षाला जास्तीत जास्त १३ जागा मिळाल्या. तरीही एकीकरणाच्या दडपणाला भीक न घालता हा छोटा पक्ष आपले अस्तित्व टिकवून आहे. आजही या पक्षाला नगण्य म्हणणारी मंडळी आहेत; परंतु आजचे ब्रिटनमधील कॅलहेम यांचश मजूरपक्षाचे मंत्रिमंडळ तो पक्ष अल्पमतात असूनही लिबरल पक्षाच्या पाठिंब्यावर टिकून आहे. पक्ष लहान आहे म्हणून घाबरून जाण्याचे अथवा हतबल होऊन एकीकरणाचा झेंडा फडकवीत पक्ष बाईंच्या दावणीला नेऊन बांधण्याचे कारण नाही. सत्तेवाचून जिवंत राहण्याचे सामर्थ्य दाखविले तरच या पक्षाला जगता येईल. इंदिराजी आक्रमक भूमिका स्वीकारून केलेली असंख्य पापे नाकारून अथवा पचवून वेगाने उभ्या राहताना दिसत आहेत. गेल्याच आठवड्या-मध्ये लुधियानामध्ये त्यांनी पन्नास हजारांची सभा घेतली. त्यांच्या सभेला लोक जातात. त्यांना मिळणारा प्रतिसाद रोज वाढत असताना चव्हाणांच्या आणीबाणीच्या काळातील

पृष्ठ १८ वर

दिल्ली वार्तापत्र....४

# कर्नालच्या छायेत जनता पक्ष

सदाशिव पेठकर

"जनता सरकारने गेल्या वर्षभरात काहीच केले नाही, आपल्या राजवटीचे पहिले वर्ष त्याने लहानसहान गोष्टींतच वाया घालविले असे जे म्हटले जाते ते मला मुळीच मान्य नाही. याचा अर्थ सर्व आघाड्यांवर सब कुछ ठीक आहे असे म्हणणे चुकीचे ठरेल; परंतु त्याचबरोबर जनता सरकार दिशाहीन आहे, त्याने निश्चित स्वरूपाचे आर्थिक वा औद्योगिक धोरण स्वीकारलेले नाही या इंदिरा गांधी यांच्या आक्षेपात काहीच तथ्य नाही', जनता पक्षाचे अध्यक्ष चंद्रशेखर सांगत होते.

नुकतीच संसदीय जनता पक्षाची दोन दिवस चाललेली बैठक संपली होती आणि ती बरीच वादळी ठरली होती. क्रिमिनल प्रोसीजर कोडमध्ये दुरुस्त्या करणारे विधेयक केंद्रीय गृहमंत्री चरणसिंग यांनी लोकसभेच्या हिवाळी अधिवेशनात मांडलें होते. मुख्यत: या विधेयकावर पक्षसदस्यांचे मत अजमाविण्यासाठी पंतप्रधानांनी ही बैठक बोलाविली होती. इंदिरा गांधी यांनी अंतर्गत सुरक्षितता कायद्याचा स्वत:ची सत्ता स्थिरपद करण्यासाठी बेमुर्वतखोर वापर केल्यामुळे हा कायदा रद्द करण्याचे आश्वासन जनता पक्षाने आपल्या निवडणूक जाहीरनाम्यात दिले होते. तो कायदा रद्द करण्यापूर्वी समाजद्रोही प्रवृत्तींना प्रतिबंधक स्थानबद्धतेत ठेवणे सरकारला शक्य व्हावे याकरिता प्रचलित फौजदारी कायद्यात काही बदल करणे आवश्यक आहे असे चरणसिंगांना वाटले आणि त्या बदलांना अनुरूप असे विधेयक त्यांनी लोकसभेत मांडले होते. सरकारला प्रतिबंधक स्थानबद्धतेचा गैरवापर करता येऊ नये या दृष्टीने या दुरुस्त विधेयकात आवश्यक त्या सर्व तरतुदी केलेल्या असल्या तरी कोणालाही प्रतिबंधक स्थानबद्धतेमध्ये ठेवणे सरकारला शक्य होता कामा नये असे बऱ्याच जनता पक्षीय संसदसदस्यांचे मत होते. ते त्यांनी चरणसिंगांच्या कानांवरही घातले होते.

संसदीय जनता पक्षाच्या बैठकीत याच मताचा पुनरुच्चार करण्यात आला. लोकांच्या नागरी स्वातंत्र्याचा किंचितही संकोच होता कामा नये या आपल्या प्रमुख आश्वासनाशी हे विधेयक विसंगत आहे असे बहुतेक वक्त्यांनी स्पष्ट शब्दांमध्ये सांगितले. या चर्चेचा परिणाम असा झाला की, आपण हे विधेयक मागे घेत आहोत असे चरणसिंगांना जाहीर करावे लागले.

पक्षांतर्गत लोकशाहीचा पुकारा अलीकडे स्वर्णसिंग काँग्रेसचे नेते करू लागले आहेत; परंतु या निकोप लोकशाहीचा आढळ झाला तो संसदीय जनता पक्षाच्या बैठकीमध्ये. प्रत्यक्ष पंतप्रधानांशीही अनेक सदस्यांच्या शाब्दिक चकमकी झडल्या; परंतु कोणीही गोलमाल शब्दांचा आधार घेतला नाही. एकापाठोपाठ एक सदस्य सरकारने मांडलेल्या विधेयकावर जोरदार टीकास्त्र चालवीत होते. त्यांपैकी एकालाही खाली बसावयास मोरारजी देसाई यांनी सांगितले नाही. आपल्या सरकारच्या धोरणावर होणारी टीका ते शांतपणे ऐकत होते.

मात्र आपल्या सौजन्याचा एखादा सदस्य गैरफायदा घेत आहे असे जेव्हा मोरारजीभाईंना जाणवते तेव्हा त्याला ते फटकारायलाही कमी करीत नाहीत, याचा अनुभव बोलभांड राम जेठमलानी यांना आला. प्रत्येक सदस्याला आपले मत मांडण्यासाठी दहा मिनिटे देण्यात आली होती. ती वेळ संपून गेल्यावरही जेठमलानी बोलतच राहिले. मोरारजीभाईंनी त्यांना भाषण आटोपते घेण्यास सांगितले. तरीही जेठमलानी यांचे भाषण चालूच होते. आणखी काही मिनिटे गेल्यावर मोरारजीभाईंनी जेठमलानी यांना खाली बसावयास सांगितले. जेठमलानी त्यांच्याकडे प्रश्नार्थक मुद्रेने पाहू लागले तेव्हा मोरारजीभाई म्हणाले की, 'तुमचे भाषण सतरा मिनिटे झाले आहे. तुम्हाला काय म्हणायचे आहे ते आम्हाला कळलेले आहे. म्हणून तुम्ही खाली बसावे हे बरे!'

*त्यावर जेठमलानी म्हणाले, 'अशा तऱ्हेने नियम पुढे करून आम्हाला थांबविण्यात आले तर हे सरकार सतरा दिवसही टिकणार नाही!'*

हा असा एखादा अपवादात्मक प्रसंग सोडला तर कोणतीही कटुता निर्माण न होता संसदीय जनता पक्षाची ती बैठक आटोपली.

परंतु चंद्रशेखर यांच्याशी बोलताना विषय निघाला होता तो वेगळाच. दोनच दिवस अगोदर केंद्रीय आरोग्यमंत्री राजनारायण यांनी लखनौमधील वृत्तपत्र-प्रतिनिधींशी बोलताना चंद्रशेखर यांच्या नेतृत्वावर हल्ला चढविला होता. आंध्रप्रदेश आणि कर्नाटक या दोन राज्यांमधील विधानसभांच्या निवडणुकीत जनता पक्षाला अपेक्षित विजय मिळाला नाही यासंबंधी ऊहापोह करताना राजनारायण यांनी चंद्रशेखर यांचे अपरिणामकारक नेतृत्वच या अपयशाला जबाबदार आहे असे म्हटले होते.

म्हणून प्रतिबंधक स्थानबद्धता विधेयकावरील चर्चेसाठी बोलाविण्यात आलेल्या संसदीय पक्षाच्या बैठकीमध्ये राजनारायण यांना त्या मुलाखतीबद्दल जाब विचारण्यात आला पाहिजे अशी मागणी

करणारे पत्र पन्नास सदस्यांनी मोरारजीभाईंकडे धाडले होते.

चंद्रशेखर यांनी राजनारायण यांच्या मतासंबंधी कोणतीच प्रतिक्रिया व्यक्त केली नाही. ते एवढेच म्हणाले की, 'अपयशाला मी एकटाच जबाबदार आहे असे जर अन्य नेत्यांना वाटत असेल तर मी अध्यक्षपद सोडायला तयार आहे!'

'हे तुमचे स्वतःसंबंधी झाले; पण राजनारायण यांनी त्या मुलाखतीत जगजीवनराम आणि हेमवतीनंदन बहुगुण यांच्यासंबंधीही टीकाटिप्पणी केली आहे. एखादा मंत्री जर आपल्या इतर सहकाऱ्यांसंबंधी जाहीरपणे असे बोलू लागला तर त्यामुळे पक्षाची प्रतिमा निश्चितच खराब होते. जनता पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांमध्ये एकमत नाही, निरनिराळ्या दिशांनी त्यांची वाटचाल सुरू आहे असे जे लोकांना वाटते, अनुभवाला येते ते खरे आहे की नाही?'

राजनारायण यांच्या वक्तव्यामुळे चंद्रशेखर दुखावले जाणे स्वाभाविक होते; परंतु अशा तऱ्हेच्या वैयक्तिक चर्चेमध्ये रस घेणे त्यांना उचित वाटले नाही. ते एवढेच मोघम शब्दांत म्हणाले, 'काही लोकांच्या मनामध्ये अजून जुने हिशोब आहेत हे नाकारता येणार नाही. मात्र त्यामुळे पक्षाच्या ऐक्यावर आघात होईल असे मला वाटत नाही. त्याचबरोबर पक्षसंघटना मजबूत रीतीने कशी बांधली जाईल याचा तातडीने विचार व्हावयास हवा-

## नानाजी सांगतात...

चंद्रशेखर यांनी पक्षसंघटनेच्या बांधणीसंबंधी कितीही अगत्य व्यक्त केले असले तरी गेल्या वर्षभरात त्या कार्याकडे संपूर्ण दुर्लक्षच झाले असे नव्हे तर ते कार्य सर्वस्वी उपेक्षितच राहिलेले आहे. जनता पक्षाच्या पाच सरचिटणिसांपैकी नानाजी देशमुख कुशल संघटक म्हणून ओळखले जातात. जनता पक्षाच्या उभारणीत त्यांचा वाटा मोठा आहे. इतकेच नव्हे तर पक्षकार्याला वेळ मिळावा म्हणून ते केंद्रीय मंत्रिमंडळातही गेले नाहीत. मूळच्या कार्यक्रमानुसार गेल्या ३१ मार्चपर्यंत सदस्यनोंदणी पुरी होऊन संघटनात्मक निवडणुका व्हावयास हव्या होत्या. पण अजूनही त्या आघाडीवर संपूर्ण शांतता आहे. सत्ता मिळाल्यानंतर पक्षबांधणीच्या मूलभूत कार्याकडे दुर्लक्ष झाले ही वस्तुस्थिती नानाजी देशमुखही मान्य करतात. हे सारेच वर्ष अतिशय धामधुमीचे गेले आणि त्यामुळे पक्षाची पद्धतशीर उभारणी करता आली नाही अशी त्यांची त्यामागची कारणमीमांसा आहे. ते सांगतात, 'लोकसभेची निवडणूक होऊन आमचा पक्ष सत्तेवर येत आहे न येत आहे तोच आम्हाला उत्तर भारतातील नऊ विधानसभांच्या निवडणुकांकडे लक्ष द्यावे लागले. त्या निवडणुका पार पडल्यानंतर राष्ट्रपतिपदाची निवडणूक झाली. ती अविरोध झाली हे खरे; पण त्यातही नाही म्हटले तरी काही दिवस गेलेच. त्यानंतर दोन महिन्यांपूर्वी पाच राज्यांतील विधानसभा निवडणुका झाल्या. दक्षिणेकडील आव्हान अधिकच अवघड होते. कारण लोकसभेच्या निवडणुकीच्या वेळी आंध्रमधून एक आणि कर्नाटकमधून दोन अशा अवघ्या तीनच जागा मिळालेल्या होत्या. त्या मानाने या दोन राज्यांतील विधानसभा निवडणुकांमध्ये आमच्या पक्षाने अधिक यश मिळविले. ते निश्चितच अपुरे आहे असमाधानकारक आहे; परंतु वर्षापूर्वी जेथे काहीच काम नव्हते तेथे थोडे तरी स्थान मिळालेले आहे. त्याला व्यापक रूप देण्यासाठी आम्हाला खूपच झटले पाहिजे. नाही तर आमचा पक्ष हा केवळ उत्तर भारतीय पक्ष आहे हा टीकाकारांचा आक्षेप खरा मानावा लागेल. उत्तर विरुद्ध दक्षिण असा वाद काही पक्ष मुद्दामच पेटवू पहात आहेत. तशा तऱ्हेची विभागणी होणे देशाच्या हिताच्या दृष्टीने धोकादायक ठरेल आणि म्हणून आमचा पक्ष दाक्षिणात्य राज्यांमध्ये बलिष्ठ करणे हा यापुढे आमच्या संघटनात्मक कार्याचा मुख्य उद्देश राहील.'

## वर्षभरातला अनुभव

पक्षाध्यक्ष चंद्रशेखर काय किंवा सरचिटणीस नानाजी देशमुख काय, पक्षाच्या संघटनात्मक स्वरूपाकडे अधिक लक्ष देण्याची आवश्यकता प्रतिपादन करीत असले तरी हे कसे काय साध्य होणार यासंबंधी अनेकांना शंका वाटते. यात जनता पक्षासंबंधी सहानुभूती बाळगणाऱ्यांचाही समावेश आहे. कारण निवडणूक तोंडाशी आली की, तिकीट मिळविण्यासाठी जनता पक्षाच्या कचेरीपाशी झुंबड उडते, निवडणूक अटीतटीने लढविलीही जाते; परंतु नंतर मात्र पक्ष-कचेरी ओस पडते असा जवळजवळ प्रत्येक राज्यातील गेल्या वर्षभरामधला अनुभव आहे.

याचे एक प्रमुख कारण असे की, जनता पक्षात समाविष्ट झालेल्या पाच पक्षांच्या कार्यकर्त्यांच्या मनामध्ये अजूनही आपल्या मूळ पक्षाविषयीच अधिक ममत्व आढळते. या पाच पक्षांपैकी संघटना काँग्रेसपाशी कार्यकर्ते असे नव्हतेच. त्यामुळे जनता पक्ष केंद्रामध्ये अधिकारावर आल्यानंतर सुरू झालेल्या रस्सीखेचीपासून त्या पक्षाचे नेते अलिप्त आहेत. जगजीवनरामांची लोकशाहीवादी काँग्रेस मात्र काहीशी रुष्ट आहे. तिच्यापाशीही कार्यकर्ते नाहीत; परंतु जगजीवनबाबूंची महत्त्वाकांक्षा सिद्धीला गेली नाही म्हणून त्यांचे समर्थक जनता पक्षावर उघड टीका करीत असतात. पंतप्रधानपदासाठी मोरारजी देसाई की जगजीवनराम असा वाद निर्माण झाला तेव्हा चरणसिंगांनी जगजीवनराम यांचा मार्ग रोखून धरला. पंतप्रधानपदाकरिता जगजीवनराम यांच्या नावाचा विचार होणार असेल तर आपलाही झाला पाहिजे असा चरणसिंगांनी आग्रह धरला. आपले नाव मंजूर होणार नाही हे चरणसिंगांना ठाऊक होते. आपण आपले नाव पुढे केले की, मोरारजी देसाई यांच्या बाजूने कौल दिला जाईल हे चरणसिंग ओळखून होते. त्याप्रमाणे घडलेही; परंतु त्याचा पुढे परिणाम असा झाला की, मोरारजी देसाई यांच्या मंत्रिमंडळात दाखल होऊनही चरणसिंग आणि जगजीवनराम यांच्यात दिलजमाई होऊ शकली नाही. मंत्रिमंडळाच्या बैठकीतही ते दोघे परस्परांशी बोलत नसत. चरणसिंग आणि जगजीवनराम यांच्यातील हे वैमनस्य विकोपाला गेले नाही याचे कारण एकच. ते म्हणजे मोरारजी देसाई यांनी त्यांपैकी कोणाचीही बाजू घेतली नाही. वैयक्तिक पातळीवर रुसवेफुगवे आणि हेवेदावे असूनही मंत्रिमंडळाच्या सुरळीत कारभाराचे श्रेय जॉर्ज फर्नांडिसही मोरारजींनाच देतात. त्यांची तक्रार एकच आहे: मोरारजीभाई निर्णय करायला विलंब लावतात. सहसा कोणालाही दुखवायचे नाही, सगळ्यांना सांभाळून घ्यायचे असे अनुभवी कुटुंबप्रमुखाप्रमाणे मोरारजीभाईंनी ठरविले असल्यामुळे त्यांच्या कारभाराला संथ गती येणे क्रमप्राप्तच ठरते.

वैचारिक दृष्ट्या जॉर्ज फर्नांडिस यांना मोरारजी देसाई किंवा चरणसिंग जवळचे नाहीत. उलट हरिजनांचे नेतृत्व करणारे जगजीवन-

राम पंतप्रधान झाले असते तर जॉर्ज फर्नांडिस यांनी त्या घटनेचे स्वागत केले असते; परंतु एकदा तो वाद निकालात निघाल्यानंतर जगजीवनबाबूंनी त्याभोवतीच घोटाळत राहावे हे फर्नांडिस यांना चुकीचे वाटते. शिवाय इंदिरा गांधी यांच्या मंत्रिमंडळामध्ये आणीबाणीच्या काळातही राहणाऱ्या जगजीवनरामांपेक्षा, एकोणीस महिने विजनवासात काढणारे मोरारजीभाई पंतप्रधान होणे हे न्यायोचित झाले हे आपले मतही फर्नांडिस लपवून ठेवीत नाहीत.

राजनारायण यांच्याप्रमाणे फर्नांडिस यांनीही सुरुवातीला मंत्रिमंडळात यायला नकार दिला होता; परंतु एकदा मंत्रिपद स्वीकारल्यानंतर आपल्याकडे सोपविण्यात आलेल्या खात्याचे कामकाज चोखपणे करण्यावर फर्नांडिस यांनी लक्ष केन्द्रित केले आहे. त्यामुळे जनता पक्षातील अंतर्गत भांडणापासून ते अलिप्त राहिले आहेत. राजनारायण यांची तऱ्हा मात्र वेगळीच आहे. त्यांना राजकारण बोलल्यावाचून चैनच पडत नाहीत. आणीबाणीमध्ये जगजीवनराम आणि हेमवतीनंदन बहुगुण इंदिरा गांधी यांच्यासमवेत होते हे सर्वांना ठाऊक आहे. तरीही लखनौमधल्या आपल्या मुलाखतीत राजनारायण यांनी पुन्हा एकदा त्या गोष्टीचा उल्लेख केला. हा उल्लेख राजनारायण यांनी सहज केला असे जगजीवनरामांना वाटत नाही. राजनारायण जे काही बोलतात त्यामागे चरणसिंग यांची चिथावणी असते असे मानले जाते. जगजीवनराम आणि चरणसिंग यांच्यातील या तणावाला हरिजन विरुद्ध जाट असे स्वरूप येते आणि त्याची झळ सगळ्या जनता पक्षाला सहन करावी लागते.

### भडक वक्तव्ये

हरिजनांवरील अत्याचाराचे प्रमाण जनता पक्षाच्या राजवटीत एकदम वाढले आहे असे नाही; परंतु जनता पक्ष अधिकारावर आल्यापासून अशा निर्घृण अत्याचारांकडे एक अतिशय जटिल सामाजिक समस्या म्हणून पाहण्याऐवजी जनता पक्षाला बदनाम करण्याचे हुकमी साधन म्हणून इंदिरा गांधी या घटनांचा वापर करू लागल्या आणि त्यात त्यांना यशही मिळाले याचे कारण चरणसिंग आणि जगजीवनराम यांच्यातील वितुष्ट हेच आहे. कारण हा प्रश्न जेव्हा लोकसभेत चर्चेसाठी येतो तेव्हा जनता पक्षाचे सदस्यही चरणसिंगांवर झोड उठवितात. अशा घटनांबाबतची बेफिकिरीने उत्तरे देण्याची चरणसिंगांची पद्धत तर अनेकांना संतापजनक वाटते; हरिजनांसंबंधीच्या चर्चेमुळे चरणसिंग कोंडीत सापडतात याचे जगजीवनरामांच्या समर्थकांना समाधान होते. याचे एक बोलके उदाहरण म्हणजे रामधन. ते स्वतः हरिजन असल्यामुळे आपल्या दुर्दैवी बांधवांवर होणाऱ्या अन्यायामुळे त्यांचा संताप उफाळून आला तर ते समजण्यासारखे आहे; परंतु रामधन तेवढ्यावरच थांबत नाहीत. हा प्रश्न आपण संयुक्त राष्ट्रसंघाकडे नेऊ असे बजावावयासही ते कमी करीत नाहीत. हे असे भडक वक्तव्य करण्यामागे रामधन यांचा एकच हेतू असतो. त्यांना चरणसिंगविरोधी वातावरण तापत ठेवायचे असते. या आगीत स्वतः चरणसिंग आणि जगजीवनराम मुलाखती देऊन तेल ओतीत असतात. आपण काँग्रेसमधून बाहेर पडलो म्हणूनच गेल्या वर्षीच्या मार्चच्या निवडणुकीत जनता लाट निर्माण झाली हा जगजीवनराम यांचा दावा खरा आहे; परंतु त्याचा मोबदला किती मागायचा याचाही त्यांनी विचार करावयास हवा. जगजीवनराम यांच्यासंबंधी आपुलकीची भावना असणाऱ्यांनाही त्यांचा चरणसिंग-विरोध अतिव्याप्त वाटतो.

### जुने समज–गैरसमज

जगजीवनराम आणि चरणसिंग यांच्यातील वैयक्तिक तणाव जनता पक्षाची प्रतिमा विस्कळित करायला जसा कारणीभूत ठरला आहे त्याचप्रमाणे समाजवादी आणि जनसंघ हे घटक पक्ष अद्याप जुन्या समज–गैरसमजातून बाहेर पडलेले नाहीत याचाही पक्षावर अनिष्ट परिणाम होत आहे. समाजवाद्यांना ही गोष्ट नाकारता येणार नाही की, गेल्या जूनमधल्या उत्तर भारतातील निवडणुकांमध्ये जनता पक्षाला भरघोस यश मिळाले त्यात चरणसिंगांच्या भारतीय लोकदलाप्रमाणे जनसंघाचा वाटाही मोठा आहे. पश्चिम उत्तरप्रदेश, उत्तर राजस्थान आणि हरियाना या तीन राज्यांमधील जाट समाज भारतीय लोकदलाच्या पाठीशी उभा राहिला आणि म्हणूनच या राज्यातील ग्रामीण विभागामध्ये जनता पक्षाचे उमेदवार विजयी होऊ शकले. नागरी भागापुरते हे कार्य जनसंघाने पार पाडले. डाव्या विचारसरणीच्या पढिक विद्वानांचे बुद्धिजीवी वर्गासंबंधी काहीही मत असो, राजकीय सत्तेचा कोणताही लाभ मिळणार नाही हे माहीत असूनही हा वर्ग राजकारणामध्ये, केवळ वैचारिक पातळीवर का होईना भाग घेत असतो. जनसंघाचे कार्य या वर्गात खूपच खोलवर रुतले आहे. त्या पक्षाचे कार्यकर्ते एका विशिष्ट शिस्तीने आणि सेवाभावाने कार्य करीत असतात. जेथे या पक्षाला आपली संघटना पुरेशा भक्कम प्रमाणामध्ये बांधता आलेली नाही तेथेच जनता पक्षाला पराभव पत्करावा लागला आहे. गेल्या जूनमधल्या निवडणुकीत पश्चिम बंगाल आणि तामिळनाडू या दोन राज्यांमध्ये जनता पक्षाच्या पदरी जे घोर अपयश पडले त्याला कारण हिंदी भाषिक प्रदेशामध्ये जनसंघाने आपले जसे स्थान निर्माण केलेले आहे तसे त्याला त्या दोन राज्यांत निर्माण करता आलेले नव्हते. अलीकडे झालेल्या आंध्रप्रदेश आणि कर्नाटक येथील निवडणुकीचा जमाखर्चही या दृष्टिकोनातून मांडला की वास्तव परिस्थितीचे बरेचसे स्पष्ट चित्र डोळ्यांसमोर उभे राहते. जनसंघाच्या या संचित सामर्थ्याचा जनता पक्षाला कसा उपयोग करून घेता येईल याचा विचार करण्याऐवजी समाजवादी पक्षाचे काही कार्यकर्ते आणि वरिष्ठ नेतेही जनसंघीय मुख्यमंत्र्यांना निष्प्रभ करण्यासाठी प्रतिपक्षांशी सहकार्य करू लागले तर त्यामुळे ते जनता पक्षाचेच नुकसान करतील. जनसंघाप्रमाणे समाजवाद्यांचा भारतीय लोकदलावरही राग आहे आणि त्यामुळे या दोन्ही पक्षांचे मुख्यमंत्री ज्या राज्यात कारभार करीत आहेत तेथील सरकारविरोधी कारवायांना एक तर समाजवाद्यांचा अप्रत्यक्ष पाठिंबा तरी असतो किंवा काही वेळा त्यात त्यांचा सहभागही असतो. उत्तरप्रदेश आणि बिहार येथील दंगलीबाबत किंवा मध्यप्रदेशाच्या मुख्यमंत्र्यांबाबत जनता पक्षाच्या कोणत्या गोटातून पत्रके निघत असतात याचा मागोवा घेतला म्हणजे या दुखण्याचे मूळ ध्यानात येते. जिल्हापातळीपासून केंद्रीय स्तरापर्यंतच्या पक्षसंघटनेच्या निवडणुका पुढे ढकलण्यामागेही अशीच काही तरी अन्तस्थ भीती असली पाहिजे. असे जोपर्यंत परस्परांसंबंधी अविश्वासाचे वातावरण आहे तोपर्यंत जनता पक्षाला नवा जोम आणि नवे सामर्थ्य लाभण्याचा संभव फारच कमी राहील.

कर्नालच्या पोटनिवडणुकीने जनता पक्षाला हाच धोक्याचा कंदील दाखविलेला आहे.

गेल्या वर्षीच्या मार्चमधील निवडणुकीच्या वेळी याच मतदारसंघातून जनता पक्षाचे भागवतदयाळ शर्मा पावणेतीन लाख मतांच्या आधिक्याने निवडून आले होते. या वेळी ही जागा आपण टिकवून धरू शकलो एवढेच समाधान जनता पक्षाला लाभले आहे. या पक्षाचे मोहिंदरसिंग लाथेर यांना अवघी अठरा हजार मते अधिक मिळाली. तेथे मतदान जवळजवळ चार लाखांच्या घरात झालेले होते हे लक्षात घेता लाथेर कसेबसे विजयी झाले इतकेच. या अत्यंत निसटत्या विजयामुळे जनता पक्षाच्या उत्तरेकडील प्रभावासंबंधी जे काही सांगितले जात होते त्या परिस्थितीत खूपच बदल झालेला आहे हेच दिसून आले आहे.

आणीबाणीच्या काळात इंदिरा गांधी, बन्सीलाल आणि संजय गांधी यांनी सुलतानी हुकुमशाहीचे आणि अमानुष अत्याचारांचे जे आवर्त निर्माण केले होते त्याची झळ दक्षिणेकडील राज्यांना लागली नसल्यामुळे तेथे कांग्रेसविरोधी लोकमत संघटित झाले नाही असे गेले वर्षभर सांगण्यात येत होते. काही प्रमाणामध्ये ते खरेही होते; परंतु हरयानाचे काय ? बन्सीलाल, संजय आणि बन्सीपुत्र सुरिंदरसिंग यांच्या जुलमी कारभाराचा आणि पिसाट वर्तनाचा त्रास हरयानामधील जनतेने पुरेपूर भोगला आहे. जनसमूहाची स्मरणशक्ती दुबळी असते हे खरे असले तरीदेखील बन्सीलाल यांच्या कारकीर्दीतील अन्याय आणि अत्याचार इतके क्रूर आणि बीभत्स होते की, त्यांची आठवण सहजासहजी पुसली जाण्यासारखी नाही.

## कर्नालची निवडणूक

कर्नालची पोटनिवडणूक ही उत्तर भारतातील पहिली पोटनिवडणूक होती. तेथे सर्वांत हसे झाले ते अर्थातच स्वर्णसिंग कांग्रेसचे. हा पक्ष मरणोन्मुख अवस्थेपर्यंत पोहोचला आहे हे कर्नालने दाखविले. सांप्रदायिकता विरोधी समितीचे एक आधारस्तंभ शशिभूषण या कांग्रेस उमेदवाराला तीन हजार देखील मते मिळू शकली नाहीत. इंदिरा गांधी यांनी मर्यादित हुकूमशहा व्हावे अशी सूचना प्रथम मांडली ती या शशिभूषण यांनीच. नंतर इंदिरा गांधींच्या हुकुमशाहीने ज्यांचा पार चोळामोळा करून टाकला त्यात शशिभूषण हे एक होते. म्हणून तर १९६९ मध्ये इंदिरा गांधींची आरती गाण्यात आणि त्यांच्या बंगल्याभोवती 'पुरोगामी' समर्थकांचे ताफेच्या ताफे आणण्यात पुढाकार घेणारे शशिभूषण आता स्वर्णसिंग कांग्रेसच्या वंचूत दाखल झाले आहेत. स्वर्णसिंग कांग्रेसची पताका खांद्यावर घेऊन ते कर्नालला गेले. त्यांच्या प्रचारासाठी गेले होते यशवंतराव चव्हाण आणि करणसिंग. त्यामुळे शशिभूषण यांचे काय होणार हे अगोदरच कळलेले होते. तरी देखील अगदी हिंदुसभेच्या उमेदवाराइतकीच मते स्वर्णसिंग–चव्हाणपुरस्कृत शशिभूषणजींना मिळतील असे मात्र कोणालाच वाटले नव्हते.

जनता पक्षाने प्रथम पिलू मोदी यांच्यासारख्या अनुभवी संसदपटूची उमेदवार म्हणून निवड केली होती; परंतु हरयानाचे मुख्यमंत्री देवीलाल यांनी त्या जागेवर आपल्या चुलत–जावयांची वर्णी लावली आणि तेव्हापासून मोहिंदरसिंग लाथेर हे जनता पक्षाचे उमेदवार राहिले नव्हते. ते झाले होते देवीलाल यांचे खास उमेदवार. केवळ जाट समाजाच्या मतांवर आपण आपल्या चुलत–जावयाला निवडून आणू असे देवीलाल सांगत होते. त्यामुळेच त्या मतदारसंघातील इतर समाजांचा पाठिंबा देवीलाल यांनी गमाविला. देवीलाल आणि बन्सीलाल यांच्या राज्यकारभार करण्याच्या पद्धतीमध्ये तसा गुणात्मक फरक नाही. त्यामुळे हरयानातील अनेक जनता पक्षीय आमदार देवीलाल यांना मुख्यमंत्रिपदावरून दूर करावे अशी केंद्रीय नेत्यांकडे मागणी करीत आहेत. जोपर्यंत चरणसिंगांचा वरदहस्त देवीलाल यांच्या माथ्यावर आहे तोपर्यंत हरयानाची जहागीर त्यांच्याकडेच राहील. आपला मुलगाही या निवडणुकीच्या वेळी आपल्याविरुद्ध गेला असे देवीलाल सांगतात. यावरून 'राखावी बहुतांची अंतरे' या राजनीतीमधील प्रमुख सूत्राशी देवीलाल किती अपरिचित आहेत हेच दिसून येते.

इंदिरा गांधी आईमुलाचे राजकारण खेळल्या, चव्हाणांनी कऱ्हाडमध्ये मामाभाचा या नाटकाचा प्रयोग घडवून आणला, तर कर्नालमध्ये देवीलाल यांनी सासराजावई हा खेळ पेश केला.

देवीलाल यांच्या नशिबी पहिल्या दोन खेळांइतकी फटफजिती आली नाही हे खरे असले तरी त्यांच्या राजकारणाची रीत तीच आहे हे काही लपून राहिले नाही.

पण ही गोष्ट मामुली आहे.

जनता पक्षाचे काय हा प्रश्न कर्नालने निर्माण केला आहे. कारण या पक्षाच्या उत्तरेकडील एकछत्री सत्तेला पहिला सुरुंग लावण्याचे कार्य त्या पोटनिवडणुकीने पार पाडले आहे. पक्षामधील दुही, सत्ता मिळालेल्यांची वाढती अधिकारलालसा आणि जातीयवादाचा प्रच्छन्न वापर या त्रिदोषांचा निचरा करण्याइतके धैर्य जनता पक्षाचे केंद्रीय नेतृत्व दाखविणार आहे किंवा नाही हा खरा सवाल आहे.

कारण इंदिरा गांधींच्या झुंडशाहीविरुद्धची लढाई आता कोठे सुरू झालेली आहे. रस्त्यावरचे राजकारण खेळण्याच्या कलेत गेल्या नऊ वर्षांपासून त्या तरबेज झालेल्या आहेत. या राजकारणाला निवडणुकीतील यशाची साथ मिळाली तर 'मीच खरीखुरी विरोधी पक्षनेता आहे' असे म्हणणारी व्यक्ती 'मीच खराखुरा भारत आहे' असे म्हणू आणि मानू लागणार नाही असे थोडेच आहे !

दुसरे रणमैदान जवळ आलेले आहे. ते म्हणजे आझमगड. तेथे जनताच्या रामवचन यादव यांना इंदिरा कांग्रेसच्या मोहसिना किडवाई यांच्याशी लढत द्यावयाची आहे.

ही उत्तरप्रदेशातील म्हणजे इंदिरा गांधींच्या राज्यातील पहिली पोटनिवडणूक आहे आणि ती कर्नालच्या छायेत जनता पक्षाला लढवायची आहे.

( क्रमशः )

---

पुढील अंकी

# जनता पक्ष : एक वर्षाचा ताळेबंद

---

कथा

# जिद्द

प्रभाकर शिंदे

दुपारी बसस्टॉपवर ताटकळत उभा होतो. बसेस येत होत्या, जात होत्या, परंतु मला हवी त्या नंबरची बस काही अजून आली नव्हती. मी आजूबाजूच्या गोष्टी न्याहाळीत होतो. कुठून तरी घोषणांचे आवाज येत होते. आवाज हळूहळू जवळ येत होता.

तो मोर्चा होता. एका कामगारसंघटनेचा मोर्चा होता तो. त्यांची एकजूट स्पष्टच दिसत होती. तळपत्या उन्हातील त्यांच्या त्या घोषणा, तो बुलंद आवाज सर्वांचे लक्ष वेधून घेत होता.

मोर्चाकडे उगाचच मी टक लावून बघत होतो. त्यांच्यातील एक कामगार माझ्याकडे बघून थोडासा हसला. मीही हसून त्यास प्रतिसाद दिला. त्यास हळूच खुणेने जवळ बोलावले.

विचार करू लागलो, याची आपली ओळख कुठली बरे? परंतु लिंक काही लागेना.

तो जवळ आला, म्हणाला, 'काय सर, कसं काय ?'

नंतर ध्यानात आले, हा तर आपल्याच शाळेतील विद्यार्थी, अशोक !

त्यास विचारले, 'कसला मोर्चा आहे रे?'

त्याचा चेहरा थोडासा खुलला.

'अन्यायाविरुद्ध आवाज उठविण्यासाठी, न्याय मागण्यासाठी हा मोर्चा आहे!' त्याच्या बोलण्यात आवेश होता.

'खरं तर याची कहाणी तुम्हांस पहिल्यापासून सांगावी लागेल सर. नंतर तुमच्याकडे येऊन सर्व हकिकत जरूर सांगेन !'

मी त्यास आताच थोडक्यात सांग म्हणून आग्रह धरणार होतो; परंतु त्याची मोर्चात पुन्हा सामील व्हायची इच्छा दिसली व इतका वेळ न येणारी बस सुद्धा आली. मी त्यास जाऊ दिले.

बसमध्ये बसल्यावर माझी विचारचक्रे जोरात फिरू लागली. हा अशोक जात्याच हुषार मुलगा होता. घरची गरिबी, परंतु तरीही न डगमगता वयाच्या बाराव्या वर्षापासून दूध, वर्तमानपत्रे टाकून घरास हातभार लावीत होता. एकदा त्याच्या हुशारीकडे बघून मी त्याची फुकट शिकवणी करण्यासही तयार झालो होतो; परंतु त्याने शेवटपर्यंत ते मान्य केले नव्हते. तो कधीही फुकट वस्तू पदरात पाडून घेत तर नसेच; परंतु कितीही कठीण परिस्थिती आली तरी डगमगत नसे. थोडक्यात म्हणजे माझ्यासारख्या कोत्या मनाच्या सर्वसामान्य माणसाला त्याच्याकडे पाहिले असता स्वतःचीच लाज वाटे.

अशोक मॅट्रिक पास झाल्यानंतर पुन्हा भेटलाच नव्हता.

मोर्चा म्हणजे दंगल, गोंधळ वगैरे समजून दहा हात दूर रहाणारा मी, तो मोर्चा पाहून खरोखर पहिल्यांदाच माझी भीती दूर पळाली. माझ्या मनातील जुनीपुराणी मोर्चाची व्याख्याच मी बदलून टाकली. आपणही कधी तरी अशा मोर्चात सामील व्हावे असे वाटू लागले.

बरेच दिवस उलटले. मोर्चाची आठवण, अशोक या गोष्टी विसरूनही गेलो होतो. अचानक एक दिवस अशोक लायब्ररीत दिसला. तो बराचसा अशक्त झाल्यासारखा दिसत होता. त्याचा चेहरा खिन्न विषण्ण होता. त्यास असे बघून मला गलबलून आले. त्याचा मनात कोठे तरी कोंडमारा झाला आहे हे माझ्या अनुभवाने जाणले. मी त्यास घरी चलण्यास सांगितले. त्यानेही विरोध दर्शविला नाही.

रस्त्याने जाताना तो एक शब्दही बोलत नव्हता, मी एकटाच बोलत होतो. तो नुसता हुंकार देत होता.

घरी आलो. त्यास खुर्चीत बसविले. कपडे बदलता बदलता मी विचार करू लागलो, यास कसे बोलते करावे ? माझ्या पत्नीने सरबताचे ग्लास आणून दिले. तो क्षणिक हसला. त्याच्या चेहऱ्यावरचे हावभाव बदलले गेले. हाच मौका साधून मी त्यास बोलके केले !

का रे अशोक, तू येतो म्हणाला होतास आणि आला नाहीस रे ! मला ती कोणती कहाणी ऐकवणार होतास सांग ना !

सरबताचा ग्लास शांतपणे रिकामा करून तो बोलू लागला. माझ्या घरची परिस्थिती बेताचीच होती, हे तुम्हास तर माहीतच आहे सर. त्यामुळे मी कॉलेजचे शिक्षण घेण्यास निश्चितच नालायक होतो. वर्तमानपत्रात आलेल्या जाहीरातीवरून मी XXX या कंपनीत शिकाऊ कामगार म्हणून अर्ज केला व माझी अपेक्षेप्रमाणे निवडही झाली. आमची आर्थिक परिस्थिती सुधारावी, चांगला पगार मिळावा म्हणून मी अधिकाधिक मेहनत घेऊन काम करीत होतो. त्यामुळे मी माझ्यात व कंपनीच्या कामातच रममाण झालो होतो. कंपनीची वाढ होतच होती. दोन वर्षांनी मला कुशल कारागीर म्हणून कंपनीने मान्यता दिली व पगारही बऱ्यापैकी मिळू लागला होता. माझ्या हुषारीवर साहेब लोक खुष होते.

'मग एवढे सर्व असूनही त्या दिवशी तू कंपनीविरुद्धच्या मोर्चात सामील का झाला होतास?' माझ्या संकुचित मनाने एकदम विचारले.

माझ्या अज्ञानाची कीव येऊन तो बहुतेक हसला असावा. माझी मलाच लाज वाटली. त्याच्या नजरेस नजर देण्याचे धैर्य माझ्यात नव्हते.

'मिळणाऱ्या पगारातून थोडे थोडे पैसे बाजूस टाकून आपला स्वतःचा धंदा उभा करावा असा माझा विचार होता सर; परंतु ते तसे घडणारे नव्हते. एका कामगारामुळे मला एका वेगळ्याच दृष्टीतून हे जग पाहावयास मिळाले. मी ज्या जगाला थोर, उच्च मानतो ते किती क्षुद्र आहे हे त्या दिवसापासूनच समजायला सुरुवात झाली. त्या दिवसाचा प्रसंग आठवला म्हणजे अजूनही रक्त उसळी घेते.

एक कामगार, तुकाराम त्याचे नाव,

कंपनीची वाढ होत असतानाच त्यास कामावर घेण्यात आले होते. साहेबांनी त्यास असलेली नोकरीची गरज हेरून नेहमीप्रमाणे 'जास्त काम कर, तुला कायम करू!' वगैरे पोकळ आश्वासने दिली होती. अनेक दिवस बेकार असल्याने तुकाराम त्याच्या कुटुंबासह पोटाच्या भुकेच्या आगीत होरपळून निघाला होता. तो या या मृगजळामागे इतर सर्वांसारखा धावतच राहिला. धावता धावता अडखळला. मशिनमध्ये हात सापडून उजवा हात गमावून पूर्णपणे कोलमडला! रोज थोडे थोडे रक्त शोषणाऱ्या या धनिकवर्गास त्याने एकदमच रक्ताचा पाट देऊ केला.

हॉस्पिटलमधून हाताची जखम बरी होऊन तो कंपनीत आला होता; परंतु कंपनीने त्यास काढून टाकल्याचे पत्र हाती मिळाले. तुकाराम 'मला दुसरे कोणतेही काम द्या; परंतु माझी बायका-मुले उपाशी मारू नका!' म्हणून विनवीत होता. कंपनीच्या पाषाणहृदयी साहेबांना काही केल्या पाझर फुटत नव्हता. त्यांचे हितसंबंध मालकाच्या पैशाशीच एकरूप झालेले होते, म्हणून की काय तुकारामच्या दुःखावर हळुवार फुंकर घालण्याऐवजी अत्यंत घाणेरड्या शब्दांत त्यास हाकलण्यात येत होते. त्याची ती असहाय दीनवाणी नजर माझ्या नजरेशी मिळून गेली. तुकारामसाठी काही तरी केले पाहिजे. माझे मन तडफडू लागले.

दोन दिवसांनी मी स्वतः साहेबलोकांना भेटून तुकारामसाठी काही तरी व्यवस्था करा म्हणून विनंती केली; परंतु सर्व व्यर्थ ठरले. माझ्या तोंडाकडे बघून, स्वतःच्या खिशातील छोटीशी रक्कम तुकारामला देण्याची शक्ती त्यांनी प्रदर्शित केली. मला ती भीक नको होती. मी मालकाला भेटायचे ठरविले; परंतु मालक फार कामात आहेत अशी उत्तरे दर वेळी मिळू लागली. माझा संयम सुटत चालला होता.

एके दिवशी मी न विचारता तडक मालकाच्या केबिनमध्ये घुसलो. मालक खरोखरच फार मोठ्या कामात गर्क झालेले दिसत होते. माझ्या आगमनाची त्यांना चाहूलदेखील लागली नाही. कशी लागणार? ...मालक मदिरा आणि मदिराक्षीच्या आधीन झाले होते ना.

संताप नसानसांतून उसळी घेत होता. तरी शक्य तेवढा सौम्य आवाज करून मी ओरडलो, 'मालक...'

मालक त्यांच्या स्वर्गातून तत्काळ खाली आपटले. खरे तर आता मला हाकलून लावणार असे वाटले; पण मालकाच्या तोंडातून हळूच शब्द बाहेर पडले,

बसा ना, इथे माझ्या समोर!

ऑर्डर सुटली, यांच्यासाठी एक सरबत आणा!

माझ्या अंगावरचे निळे कपडे, समोरची मखमली खुर्ची, माझी मलाच लाज वाटू लागली. माझी या खोलीत तरी यायची लायकी आहे का? प्रश्न भेडसावू लागला; मन डळमळू लागले. समोरचे वातावरण धूसर झाले. मालकाचा चेहरा नाहीसा झाला. डोळ्यांसमोर तुकारामचा चेहरा उमटला आणि एकदम मला माझ्या अंगात भरपूर शक्ती आल्यासारखे वाटू लागले. त्या मखमली खुर्चीची किळस वाटू लागली. खुर्चीवर बसण्याचे नाकारून, मालकास मी कशासाठी आलो आहे ते सांगितले.

मालक अत्यंत मऊ शब्दात माझी समजूत घालू लागला. तू कशाला या भानगडीत पडतोस? तुला काही पाहिजे असल्यास माग. तुकाराम तर आता काम करण्यास अपात्र ठरला आहे. त्याला आम्ही फुकट कशासाठी म्हणून पोसणार?

ज्यांच्या जिवावर हे श्रीमंत होतात त्या गरीब कामगारांबद्दल यांच्या तोंडातील असले शब्द ऐकून माझी चीड अजूनच वाढली. रागामुळे माझ्या तोंडून एकही शब्द बाहेर पडत नव्हता. मालकाचा आवाज हळूहळू चढतच होता.

असेच अपघात आपल्या कारखान्यात वारंवार घडत आहेत, आम्ही किती लोकांना फुकट म्हणून पोसायचे? तुम्हास माहीत आहे ना परदेशात एखादी वस्तू थोडीही निरुपयोगी झाली तर ती दुरुस्त करायच्या भानगडीत न पडता सरळ नवीन वस्तू घेतात. जुनी फेकून देतात. हे असे का? कारण ते त्यांना फायदेशीर पडते. हे देखील असेच आहे. हे सर्व तुला इथे येण्यापूर्वीच समजायला पाहिजे होते.

हे कामगार दारू पिऊन कामावर येतात; त्यामुळे अपघात घडणार नाहीत तर काय होणार? समोरच दारूची बाटली ग्लासची सोबत करीत उभी होती. पुढेही त्यांचे वक्तव्य चालूच होते. माझे मन तिथून पळण्याबद्दल आक्रंदू लागले. एक वेगळाच निश्चय करून मी तेथून निघालो.

सर्वप्रथम तुकारामला नुकसानभरपाई मिळावी म्हणून कोर्टात अर्ज दाखल केला. सर्व कामगारांकडून तुकारामला दरमहा थोडी रक्कम मिळू लागली. माझ्या मताशी इतर अनेक कामगारांची मते जुळत होती; परंतु आता पुढे नेमके काय करावे हे सुचत नव्हते.

एके दिवशी कोर्टाने कंपनीच्या बाजूने न्याय देऊन तुकारामच्या आशेचा आणखी एक फुगा फोडला. कोर्टात कंपनीने पैशाच्या जोरावर खोटे, बनावट पुरावे उभे करून तुकाराम दारू पिऊन काम करीत होता वगैरे सिद्ध केले होते.

कंपनीत कामगार व मालक यांमधील तणाव वाढतच होता. त्याचा परिणाम उत्पादनावर झाला होता; परंतु कंपनी आपली ताठर भूमिका सोडण्यास तयार नव्हती. प्रत्येक कामगार अन्यायाविरुद्ध लढण्यास तयार झाला होता. कामगारावरील माझ्या प्रभावाची, कंपनी वेळोवेळी दखल घेत होती. प्रतिकार करीत होती.

आणि तो दिवस उजाडला. त्या दिवशी मालकाने मला केबिनमध्ये बोलावून घेतले. मीही आमच्या साहेबास विचारून मालकाकडे गेलो.

'आतापासून तू या भानगडी बंद केल्या नाहीस तर गंभीर परिणाम तुला भोगावे लागतील!' मालक एका दमात बोलून गेला. गेल्या काही दिवसांतील नफ्यातील घट त्याच्या रागीट आवाजात स्पष्ट उमटली होती.

मीही तितक्याच तडफेने उत्तर दिले, 'मी ह्या असल्या धमक्यांना कधीही भीक घालणार नाही! मरेपर्यंत अन्यायाविरुद्ध लढण्यासाठीच मी जन्माला आलो आहे!' गेल्या काही दिवसांतील माझा आत्मविश्वास मला आधार देत होता.

लगेचच दोन तासांनी मला सस्पेंड केल्याची ऑर्डर माझ्या हाती आली. काही क्षणात ही बातमी सर्व कामगारांमध्ये पसरली. कामगार संतप्त झाले होते. मी त्यांना वेळीच आवरले. नाही तर इतके दिवस

झालेला कोंडमारा वेगळीच परिस्थिती घेऊन वर आला असता. कामगारांनी संपावर जाण्याचा आग्रह धरला व कारखाना थंड पडला.

संपातल्या अशाच एका दिवशी तुम्ही मला भेटला होतात. कंपनीला उत्पादनाची तीव्र गरज होती; परंतु त्यांनी माझा काटाच काढायचे ठरविले होते. दररोज निरनिराळ्या अफवा उठवून ते संप फोडण्याचे प्रयत्न करीत होते. कामगारांची आर्थिक स्थिती तर खालावतच होती. जिद्द मात्र कायम होती. मालकांकडून साहेबांवर दडपण येतच होते. कंपनीने अखेर वाटाघाटी करण्याची इच्छा दर्शविली.

सर्व कामगारांसमोर वाटाघाटी सुरू झाल्या. कंपनी संपकाळातील पगार देण्यास व तुकाराम अगर त्याच्या कुटुंबियांपैकी एका व्यक्तीस कामावर घेण्यास तयार होती; परंतु मला कामावर घेण्यास पूर्ण विरोध करीत होती. मी देखील माझा अधिकार न गाजविता, हा सर्व कामगारांचा प्रश्न असून तो निर्णय सर्व कामगारांनी मिळून घ्यावा असे सुचविले. बहुमताने तीच तडजोड मान्य होऊन कामगारांनी संप मागे घेतला. मी कंपनीच्या बाहेर फेकला गेलो.

ज्याप्रमाणे तुकारामला सर्व कामगार मदत देत होते, त्याप्रमाणे आज मलाही त्या सर्वांची मदत चालू आहे. त्या मोबदल्यात मीं त्यांच्या अडीअडचणींना सतत धावून जात असतो. हे सर्व कामगार माझ्यावर फारच जीव लावून प्रेम करीत आहेत. ते मला बाहेर ठेवून कंपनीत कामावर गेले म्हणून कधीही दुःख होत नाही.

अन्यायाची आच जाणून घेणारी माझी इंद्रिये जागृत असल्याने मी इतक्या तीव्रतेने लढत होतो.

परंतु दडपलेल्या अवस्थेत जगायची सवय झालेल्या या कामगारांच्या हृदयाला या अन्यायाची आग पूर्णपणे भिडली नाही. त्यात त्यांचा दोष तरी काय? त्या संवेदनाच सुप्तावस्थेत गेल्या आहेत. मला आशा आहे. या अन्यायाविरुद्ध निर्णायक विजयी लढा त्यांच्या या संवेदना जागृत केल्यानेच यशस्वी होणार आहे.' अशोक बोलायचा थांबला. मी गप्पच होतो.

घड्याळात बाराचे ठोके पडू लागले. आमची तंद्री भंग पावली. आतून जेवण तयार असल्याची बातमी समजली. मी अशोकला जेवून जाण्यासाठी आग्रह करू लागलो.

परंतु एका कामगाराच्या घरचे सर्व लोक जेवणासाठी माझी वाट पहात असतील, मी आता निघतो असे सांगून अशोक निघून गेला.

मी खुर्चीतच बसून होतो. माझ्या डोळ्यांसमोर माझ्या तरुणपणचा प्रसंग उभा राहिला. मी त्या वेळी नुकताच नोकरीस लागलो होतो. तालुक्याच्या गावी माझी बदली झाली होती. लहानपणापासून शहरात राहिल्याने खेडेगावची ओळख अशी नव्हतीच. जेवून सोप्यावर बसलो होतो. समोरून एक मिरवणूक नुकतीच गेली होती. गावठी वाद्ये कर्कश आवाजातून लोकांचा उत्साह दाखवीत होती. मिरवणुकीच्या अग्रभागी एका बोकडास सजविलेले होते.

मी नेहमीच्या कुतूहलाने काय आहे वगैरे माहिती माझ्या एका ओळखीच्या व्यक्तीस विचारली.

त्या गावात गावाबाहेरील देवळात बोकड बळी देण्याची प्रथा होती. जर देवास बोकड बळी मिळाला नाही तर काही तरी वाईट घटना घडते असा गावकऱ्यांमध्ये समज होतो. स्वतःवरील संकट टाळण्यासाठी ते त्या बोकडाचा बळी देणार होते.

मी त्यांच्या अज्ञानास त्या वेळी हसलो होतो खरा. ती अंधश्रद्धा पुसण्याचा अयशस्वी प्रयत्नही मी करून पाहिला होता; परंतु अशोकची जिद्द न्यारी होती. अशोकचा उपयोग हे कामगार स्वतःवरील संकट निवारण्यापुरताच तर करीत नसतील ना? अशी भीतीही मनास चाटून गेली. अशोकला माझ्यासारख्या म्हाताऱ्याचे काही सहाय्य होईल का, याचा मी विचार करू लागलो. □


**तीन राजहंस प्रकाशने**

१०२५ सदाशिव, पुणे ४११ ०३०

**फिडेल, चे आणि क्रांती**
अरुण साधू । सात रुपये

**आणि ड्रॅगन जागा झाला**
अरुण साधू । चवदा रुपये

**पूर्णिया**
अनिल अवचट । सहा रुपये

पुस्तके

# सिंहासन

**सत्ता आणि समाज यांच्या फारकतीचं प्रभावी चित्रण**

अशोक प्रभाकर डांगे

राजकीय कादंबरी प्रथम माडखोलकरांनी महाराष्ट्राला दिली. त्यांच्यानंतरच्या काळात मात्र कादंबरीच्या माध्यमातून राजकीय विषयांना प्रामुख्यानं प्राधान्य मिळालं नाही. त्यामुळेच राजकीय कादंबरी ह्या साहित्यप्रकाराची चांगलीच पीछेहाट झाली. अगदी अलीकडच्या काळात वसंत वरखेडकर यांनी लिहिलेली 'प्रतिनिधी' ही त्या अर्थानं खरी राजकीय कादंबरी होय. राजकीय आणि सामाजिक जीवनातल्या, भिन्न भिन्न जीवनथरांत जन्मलेल्या, वेगळी व्यक्तिमत्त्वं, वेगवेगळ्या विचारधारणा घेऊन जगणाऱ्या काही ठळक व्यक्तींच्या आयुष्याची वाटचाल, त्यांचे यश–अपयशही वरखेडकर यांनी विचारात घेतली आहेत. प्रतिनिधी ही उत्कृष्ट राजकीय कादंबरी असली तरी तिचा पिंड वैचारिक आहे आणि ह्या विचारांनीच ती अधिक समर्थ बनली आहे. त्यानंतर अरुण साधूंची 'मुंबई दिनांक' पुढे आली. राजकीय धकाधकीतला एक दिवस त्यांनी अत्यंत समर्थपणे चित्रित केला आहे. स्मगलिंगसारखा विषय केंद्रस्थानी धरून लिहिलेल्या ह्या कादंबरीचा पिंड पूर्णत: राजकीयच आहे. विषयाचा ताजेपणा, प्रवाही भाषा, आकर्षक मांडणी, जाणते संदर्भ ह्या सर्वच गोष्टींमुळे ती यशस्वी ठरली. 'मुंबई दिनांक'च्याच अरुण साधूंनी 'सिंहासन' ही नवी कादंबरी आता पुढे मांडली आहे.

सिंहासनमध्ये अरुण साधू एका राज्यातील सर्वोच्च स्थानासाठी चाललेला सत्ता-संघर्ष चित्रित करतात. मुख्यमंत्र्याचं हे सर्वोच्च स्थान, साधू ज्याला सीएम म्हणून संबोधतात त्या व्यक्तीनं कबजात ठेवलं आहे. कुठल्याही सत्ताधारी मंत्रिमंडळात असतात तसेच इथेही प्रमुख दोन गट आहेत. त्यात सत्ताधारी मुख्यमंत्र्याचे प्रमुख प्रतिस्पर्धक अर्थमंत्री विश्वासराव दाभाडे दुसऱ्या गटाचे म्होरके आहेत. कुठल्याच गटात नसलेले बुद्धिवादी दत्ताजीराव जाधव एकांडेपणे महसूलमंत्रिपदावरून आपली शिलेदारी चालवीत आहेत. ह्याशिवाय सोय आणि स्वार्थानुसार गट बदलत रहाणारे माणिकराव पाटलांसारखे राज्यातले ज्येष्ठ मंत्रीही आहेत. सत्ता हे ह्या साऱ्यांचंच ध्येयवाक्य आहे आणि म्हणूनच ती मिळविण्याकरिता आणि मिळविल्यावर टिकविण्याकरिता सर्वच भलेबुरे मार्ग ते प्रच्छन्नपणे हाताळीत आहेत. त्यांच्यातले दुर्बल कुढत आहेत, तर सबल फुकटची मिरासदारी गाजवीत आहेत. ह्या साऱ्या विधिनिषेधशून्य संघर्षाच्या पार्श्वभूमीवर अरुण साधूंनी दिलेलं 'सिंहासन' हे नाव अत्यंत समर्पक ठरतं. कारण ह्या साऱ्याच सत्तासंघर्षातून नवी सरंजामशाहीच प्रत्ययाला येत असते आणि सत्तेच्या सरंजामशाही स्वरूपामुळेच सेवेचे हे सर्वोच्च स्थान राजकीय सिंहासनच बनलं आहे.

ह्या साऱ्याच प्रकरणाची सुरुवात राज्याच्या अर्थमंत्र्यांपासून होते. स्वाभाविकच ह्या संघर्षात त्यांची नजर मुख्यमंत्रिपदाकडे सदैव लागलेली आहे. ते बळकावण्यासाठी चालू सीएमला दूर करणं आवश्यक आहे. ते दूर करण्यासाठी वातावरण निर्माण करण्यापूर्वी, आपलं पाठबळही अजमावणं ह्या मुरब्बी अर्थमंत्र्याला भाग पडलं आहे. हे सामर्थ्य अजमाविण्यासाठीच त्यानं आपल्या राजिनाम्याचा डाव खेळला आहे, हा नुस्ता खेळ आहे. राजीनामा देण्याची नुस्ती हवाच दाभाड्यांनी निर्माण केली आहे आणि ह्या हवेनं सारंच वातावरण पालटून गेलयं.

अरुण साधूंनी विश्वासराव दाभाड्यांचं धूर्त, मुत्सद्दी, लबाड, कठोर, ढोंगी व्यक्तिमत्त्व प्रभावीपणे चित्रित केलंय. त्याचबरोबर त्यांची देखणी, हुशार पंजाबी सून आणि सल्लागार कमला, आपल्या दुबळेपणानं हतबल ठरणारे आणि म्हणूनच नेहमी उपेक्षित ठरलेले पक्षाध्यक्ष शिवाजीराव राणे मंत्रिपदावर डोळा ठेवून आपल्या जिल्ह्यातले आमदार संघटित करणारे कोकणचे लांजेकर, मुख्यमंत्र्यांचा नेकीनं पाठपुरावा करून मंत्रिपद टिकवून धरणारे साताऱ्याचे तरुण नेते आनंदराव टोपले, सहकार संघटनांची नियंत्रणं हातात ठेवून पुणे जिल्ह्याच्या ग्रामीण भागात राहून राज्याच्या राजकारणात प्रभावी भूमिका बजावणारे त्यांचे चुलते रावसाहेब टोपले, दलित जमातीतून स्वकर्तृत्वावर मोठे होऊन उपमंत्रिपदाला पोचलेले विदर्भाचे बुधाजी गोडघाटे, त्यांच्या कर्तृत्वावर भाळून त्यांना राजकीय महत्त्व प्राप्त करून देणारे, घटनातज्ज्ञ व राज्याचे सभापती नानासाहेब गुप्ते ही अशी अनेक व्यक्तिमत्त्वं अरुण साधूंनी तपशीलवार व परिणामकारकपणे मांडली आहेत. ह्या साऱ्यांचे गुण, मुख्यत: दोष, त्यांच्या कर्तृत्वाच्या मर्यादा, त्यांचे स्वार्थ, त्यांची जीवनातली एकंदर वाटचाल, त्यांच्या अपेक्षा ह्या साऱ्यांचंच हे चित्रण आहे. त्याबरोबरच सचिवालयातले सचिव, शिपाई, मुख्यमंत्र्यांचे स्वीय सहाय्यक ह्यांचंही ह्यात चित्रण आहे. स्मगलिंगच्या आधारावर त्यांनी मुंबई दिनांकची उभारणी केली होती. इथे मात्र राज्यातल्या बहुतेक भागात पडलेला दुष्काळच त्यांनी पार्श्वभूमी म्हणून वापरला आहे. ह्या दुष्काळानं निर्माण झालेली परिस्थिती, करपणारी पिकं, त्यासाठी सचिवांच्या चाललेल्या बैठकी, दुष्काळनिवारणाच्या योजना, त्यातून साधणारे राजकीय व इतर स्वार्थ त्यांनी कुशलतेनं गुंफले आहेत आणि ह्या साऱ्यांच्याच पार्श्वभूमीवर ठळकपणे उठून दिसत्येय ती राजकारण्यांची बेफिकिरी, स्वार्थलोलुपता, सत्ताकांक्षा आणि उघडी–नागडी लाचारी!

अरुण साधूंनी आपल्या मुंबई दिनांकमध्ये वृत्तपत्रसृष्टीचं, तिच्या गुणदोषांचं, सामर्थ्याचं प्रभावी चित्रण केलं होतं. इथेही ते ह्या साऱ्याच वातावरणाकडे दिगू टिपणीस ह्या वार्ताहराच्या चष्म्यातूनच पाहतात. मुळात अशा व्यक्तींची अरुण साधू यांना ओढ आहे,

आणि त्यांचं हे व्यवसायक्षेत्र असल्यामुळे त्याचं चित्रणही ते प्रभावीपणे करू शकतात. दिगू टिपणीस हा मुंबई दिनांकमधल्या मुख्य वार्ताहर–अय्यरसारखाच ब्रह्मचारी आहे... एके काळच्या ह्या स्वातंत्र्यसैनिकानं पत्रकारितेच्या व्यवसायालाच वाहून घेतलंय. अय्यरसारखं त्याचं व्यक्तिमत्त्व चांगलंच प्रवाही नसलं तरी ते जबरदस्त प्रभावी निश्चितच आहे. एका सामान्य वृत्तपत्राच्या वार्ताहराचा दबदबा म्हणून तर खूपच मोठा आहे. सारेच राजकारणी त्याला जवळचे आहेत आणि त्याला वचकूनही आहेत. मुख्यमंत्र्यापासून कोणाचंही दार ठोठावण्याचा वा कोणाचाही नंबर फिरवून बोलण्याचा त्याला अधिकार आहे. स्वार्थाच्या ह्या गदारोळात ह्या सरळ माणसाची भूमिका मात्र स्वच्छ आहे. त्याचे हात आजवर कुणीच बांधू शकलेला नाही आणि म्हणूनच त्याचं राजकीय वजन मोठं आहे. साधूंनी हे दिगूचं व्यक्तिमत्त्व मनापासनं रंगविलंय. त्याला न्याय दिलाय आणि त्याच्या व्यक्तिमत्त्वाच्या चित्रणानंच या कादंबरीला प्रवाहीपण आलंय.

सत्तासंपादनाच्या संघर्षात अनेक जुनी प्रकरणं उकरली जातायत. त्यातच रावसाहेब टोपलेंच्या मुलाचं प्रकरणही आहे. आपल्या मुलानं दलिताच्या मुलीवर अत्याचार करूनही तिची नंतरची जबाबदारी नाकारणाऱ्या आणि अमानुष मारहाण करून तिच्या बापाच्या मृत्युला कारणीभूत होणाऱ्या आणि नंतर तो भूकबळी ठरविणाऱ्या रावसाहेब टोपल्यांना खरं तर हे प्रकरण जडच गेलं असतं. तसंच तरुणपणात विदर्भातल्या एका दलित स्त्रीच्या मृत्यूला कारण ठरलेल्या आणि नंतर ते प्रकरण दडपणाऱ्या उपमंत्री बुधाजी गोडघाटेच्या प्रकरणानंही गंभीरच वळण घेतलं होतं आणि मुख्यतः रावसाहेब पर्यायानं मंत्री आनंदराव टोपले हे सीएम गटाचे व बुधाजी गोडघाटे दाभाडे गटाचे असल्यानं ह्या सगळ्याच प्रकाराला चांगलाच राजकीय रंग भरला होता. त्याचा चांगलाच उपयोग केला गेला. सत्तास्पर्धेतली मोहरी पुढे-मागे हलविली गेली. नवी माणसं जोडली गेली, जुनी मोडण्यातही आली. ह्या साऱ्यांचंच लक्ष सत्ता आणि केवळ सत्तेकडेच लागून राहिलं होतं.

खरं तर अरुण साधू यांची ही कादंबरी घटनाप्रधान आहे; पण ती उगाचच पसरत गेल्यासारखी वाटते. साधूंनी ह्या वेळी प्रमुख व्यक्ती, प्रमुख घटना यांचं जाणीवपूर्वक विश्लेषण केलंय आणि त्यातूनच विषय कुशलतेनं पुढे नेलाय. असं असलं तरी त्यांचं हे विवेचन कित्येकदा उगाचच लांबताना दिसतं. त्यानं आशयाचा ओघ खंडितही होत जातो. त्यामुळंच ह्या कादंबरीचं स्वरूप अधिक बंदिस्त होण्यातली उणीव आपणाला सतत जाणवत रहाते.

अरुण साधू यांच्या कादंबरीचा विषय तसा नवा नाही. मुंबई दिनांक मध्ये तो इतक्या तपशिलानं नसला तरी बऱ्याच प्रभावीपणे मांडलाय. त्यामुळे इथे जाणवते ती एक विषयाची पुनर्मांडणी आणि त्यातून उद्भवणारी पुनरावृत्ती. साधूंच्या ह्या कादंबरीचा शेवट अपरिहार्य असाच होतो, अर्थमंत्री दाभाड्यांची मुख्यमंत्रिपदासाठीची धडपड निष्फळ ठरते. मुरब्बी सीएमच ह्या संघर्षात उजवे ठरतात म्हणूयच यशस्वी होतात आणि मग सत्तेचाच लगाम पुढेही आपल्याच हाती राखण्यात यशस्वी होतात. मंत्रिमंडळाच्या वाढीचं आमिष ते पुढे करतात दाभाड्यांचे आजवरचे काही सहकारी मग अर्थमंत्र्यांची पाठराखण सोडतातही. सीएमच्या सत्तेशी घरोबा करतात. अपमानित दाभाडे आता "खरोखरीच राजीनामा" देतात आणि सीएम मानभावीपणे तडजोडीचा प्रयत्न केल्यासारखं दाखवून तो स्वीकारतात.

अरुण साधूंच्या सिंहासनमधला सत्तासंघर्ष इथेच संपुष्टात येतो. सत्ताधारी गट जिंकतो. दुसरा हरतो. हे अटळच असतं. खरं तर हा संघर्ष इथेच संपलेला नसतो तर तो संपून पुढचा नवा संघर्ष परिस्थितीची वाट पहात असतो. आणखी एखादा दाभाडे ह्या सत्तेला आव्हान देऊ पहाणार असतो. एक जिंकणार तरी असतो किंवा हरणार तरी. वाचकांची तरी हीच भावना असते. सर्वसामान्यपणे सत्तेच्या समाजकारणात हेच घडत जातं.

सत्ता आणि समाज यांची भयावह फारकत हाच अरुण साधूंच्या ह्या प्रभावी कादंबरीचा आत्मा आहे. सत्ता ह्या समाजातूनच निर्माण होते आणि समाजानं निर्मिलेली ही सत्ता समाजाचं साधन बनवून आपलं सिंहासन टिकवून धरते. आजच्या समाजाची, तिचे घटक म्हणून जगणाऱ्या जनसामान्यांची हीच तर खरी शोकांतिका झाली आहे.

सिंहासन
लेखक : अरुण साधू
प्रकाशक : ग्रंथाली प्रकाशन
पृष्ठे : ३२३, मूल्य : रुपये पंचवीस

**New Titles Receiued**

1. **How To Save Your Own Time –** ( Bestseller – Novel ) Erica Jong — Rs. 16-95
2. **The Tangent Objective –** ( Novel ) – Lawrence Sanders – Author of '*First Deadly Sin.*' — Rs. 18–90
3. **Consider Yourself Dead –** ( Thriller ) James Hadley Chase. — Rs. 10–00
4. **The Honourable Schoolboy –** ( Bestseller–Novel ) John Le Carre — Rs. 16–50
5. **The New India – Ved Mehta** — Rs. 16-00
6. **The Silent Path – ( An introduction to meditation )–** Michal J. Eastcott — Rs. 07–00
7. **Halconer – ( Bestseller – Novel ) – John Cheever** — Rs. 21–80

● आमच्या दीर्घ मुदतीच्या वर्गण्या भरून इतर लायब्रऱ्यांइतक्याच वर्गणीत उत्कृष्ट पुस्तके वाचा.

**THE PHOENIX LIBRARY**
727, Opp. Sadashiv Post, Pune-30

## अवती-भवती : पृष्ठ ८ वरून

नापाक-भेकड भूमिकेचा बागुलबुवा सतत नाचता ठेवण्याचे प्रयोजन नाही. कांग्रेससमोर निवडणुकीच्या रिंगणातील नवीन आव्हान उ. प्रदेशातील आझमगांव पोटनिवडणुकीच्या रूपाने उभे आहे. उत्तर प्रदेशचे विद्यमान मुख्यमंत्री राम नरेश यादव यांनी राजीनामा दिल्याने ही पोटनिवडणूक होत आहे. निवडणुकीला उभे असलेल्या उमेदवारांत लोकप्रियतेच्या हिशेबात डावे-उजवे करायचे झाले तर अधिकृत कांग्रेसचे चंद्रजित यादव पहिल्या क्रमांकावर आहेत. इंदिरा कांग्रेसच्या उत्तर प्रदेश कांग्रेसच्या अध्यक्षा मोहसिन किडवाई याही इंदिरा कांग्रेसतर्फे निवडणूक लढवीत आहेत, तर जनता पक्षातर्फे रामबच्चन यादव हे निवडणूक लढवीत आहेत. या तिहेरी लढतीमध्ये अधिकृत कांग्रेसचा उमेदवार कुठे उभा राहतो याला असाधारण महत्त्व आहे.

एका बाजूने कांग्रेसची घसरगुंडी होत असताना जनता पक्ष अंतर्गत लाथाळ्यांनी पोखरला जात आहे. केंद्रीय पातळीवर साठमारीचे जेवढे हिणकस प्रकार चालू आहेत त्यापेक्षा भयावह अवस्था जनता पक्ष जेथे सत्तेवर आहे अशा बिहार-उत्तर प्रदेश व हरियाना या राज्यात पाहावयास मिळते. स्थिर सरकार असण्यासाठी केवळ पक्षीय बहुमत पुरेसे ठरत नाही हे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. या बाबतीत पक्षीय बहुमतापेक्षा पक्षीय एकोप्याला जास्त महत्त्व आहे आणि जनता पक्षामध्ये नेमकी याचीच वानवा आहे. आता पाच ज्येष्ठ जनता–नेते वारंवार एकत्र येणार असून पक्ष संघटित राहील आणि सरकारचे धोरण एकमुखी असेल यासाठी प्रयत्न करीत आहेत. त्याचे परिणाम केव्हा दिसतील तेव्हा दिसोत; पण आज तरी जनता पक्षाची प्रतिमा फारशी उजळ नाही. जनता पक्षाच्या या अंतर्गत लाथाळ्याचा पुरेपूर फायदा इंदिरा गांधी घेत आहेत. त्यांच्या प्रत्येक सभेत, वार्ताहरपरिषदेमध्ये त्या जनता पक्षावर कडवट टीका करतात. जनता सरकार देशाचे वाटोळे करायला निघाले आहे अशी आवई उठवितात आणि त्याचा परिणाम होतो. बाईंबद्दलचे वाढते प्रेम दुहेरी स्वरूपाचे आहे. पराभूत-हतबल नेतृत्वाबद्दल जनमानसामध्ये कोठे तरी सुप्त सहानुभूती असतेच. बाईंबद्दल अशी सहानुभूती आहे. या सहानुभूतीला फुंकर घालण्याचे काम त्या हुशारीने करतात. परवाच पाटण्याला त्यांनी सांगून टाकले, माझे भवितव्य भुट्टोंप्रमाणेच आहे. आयोगांचे कामकाज चालवून हे सरकार जनतेच्या पैशाचा अपव्यय करते आणि आपला भरपूर छळवाद करते हे सांगायलाही त्या विसरत नाहीत. हरिजनांवरील, दलितांवरील अत्याचारांचे तुणतुणे त्यांनी कायम वाजते ठेवलेच आहे. एका बाजूने सहानुभूती मिळवायची आणि दुसऱ्या बाजूने सरकारवर कठोर टीका करायची असे त्यांचे जे दुहेरी धोरण आहे त्याचा त्यांना भरपूर लाभ मिळत आहे. आज लोकसभेमध्ये विरोधी पक्ष त्यांचा आंध्र-कर्नाटक या दोन्ही प्रांतात त्यांचेच निर्भेळ राज्य. महाराष्ट्र मंत्रिमंडळामध्ये त्यांची वरचढ भागीदारी. हे असेच चालू राहिले तर चार वर्षांनी त्या केंद्रसत्ता हलविल्याखेरीज राहणार नाहीत. जनता पक्षाला मते देणारी किती तरी मंडळी पाच वर्षांनी बाई येणार असे उघड बोलू लागली आहेत. आपल्या निवडणुका लाटेवर तरंगत जातात. इंदिरा लाट वा जनता लाट उसळली की, असंख्य नावं गावं माहीत नसलेली मंडळी बघता बघता आमदार-खासदार होतात. अलीकडेच झालेल्या कर्नाटक निवडणुकीमधील एक किस्सा देण्यासारखा आहे. देवराज अरस उमेदवारांची शोधाशोध करीत असतानाच एक उमदा प्रचारक मोठ्या उत्साहाने प्रचारयंत्रणेबाबत काही विचारण्यासाठी गेला. पाचएक मिनिटे अरस त्याच्या बरोबर बोलले आणि नंतर त्याला शांतपणे म्हणाले, 'इतरांसाठी कशाला प्रचार करतोस? तुला अमुक एक मतदारसंघ दिला. तू स्वतःच उभा राहा आणि प्रचार कर!' तो प्रचारक अवाक् झाला; पण उभा राहिला आणि निवडून आला. कारण तो इंदिरा कांग्रेसचा उमेदवार होता आणि कर्नाटकात तर इंदिरा लाट होती. लाटेची वाट पाहात बसणे जनता पक्षाला परवडण्यासारखे नाही आणि केवळ शब्दांचे भोवरे फिरवून लाट येणारच असली तर ती थांबणार नाही. ती जर थांबवायची असेल तर जनता पक्षाला आर्थिक आघाडीवर मजबूत काम करावे लागणार आहे. असे काम व्हायचे तर प्रथम पक्ष एकजिनसी होणे जरूर आहे. इंदिरा कांग्रेसच्या आक्रमक धोरणाने जनता पक्षही खडबडून जागा झाला आहे. पाच ज्येष्ठ नेते एकत्र आले त्यामागेही इंदिरा कांग्रेसच्या त्या वाढत्या लोकप्रियतेचे दडपण आहेच. चार वर्षांनी इंदिरा कांग्रेस सत्तेवर आलीच तर इंदिराजी पुन्हा लोकशाहीच्या नावाने चांगभले करतील की नाही ते आताच सांगता येणार नाही; पण त्या पुन्हा सत्तेवर येण्याची शक्यताही लोकशाहीप्रेमी नागरिकांना अस्वस्थ करून सोडते. पुन्हा उठून उभे राहणे अशक्य व्हावे असा जबर मार खाल्लेली ही बाई वर्षभरात अर्धीअधिक कांग्रेस खाऊन बसली आहे. देशाच्या चौथ्या हिश्श्यावर तिच्या माणसांचे राज्य आले आहे आणि लोकसभेच्या निवडणुकांचे वेळी तिला या गोष्टींचा फायदाही मिळणार आहे. धुळीतून ती स्वतः उभी राहिली, तिने पक्षही उभा केला. सत्ताधारी जनता पक्षासह इतर साऱ्याच राजकीय पक्षांना सावधान म्हणण्याची वेळ या आक्रमक इंदिरा कांग्रेसने आणली आहे. ◻

## ◻ बँकेवरील एक खासा दरोडा

राजधानी दिल्लीमध्ये गुंडगिरीचे पेव फुटल्याच्या वार्ता चौफेर पसरल्या आहेत. या वार्ता कोरड्या वार्ता किंवा अफवा नाहीत तर अनेकांना त्यांचा अनुभव येऊन चुकला आहे. फुटकळ चोऱ्यांच्या या बातम्या रोज नव्याने उमटत असल्या तरी भरवस्तीत बँकेवर डाका घालण्याचे धाडस होईल असे वाटले नव्हते; पण स्वतःला आनंदमार्गी म्हणविणाऱ्या मंडळींनी असा डाका घालून दिल्ली पोलिसांची झोप उडवून दिली!

व्यवसाय वाढविण्यासाठी आणि ठेवीदारांचे लक्ष वेधून घेण्यासाठी बँका अनेक नवीन उपक्रम करीत असतात. दिल्लीच्या करोलबाग विभागामध्ये नवीन शाखा उघडताना सिंडिकेट बँकेने ' सर्व महिला सेवकांतर्फे चालविली जाणारी शाखा अशी आपल्या बँकेची जाहिरात केली आणि त्याप्रमाणे महिलांच्या नियंत्रणाखाली बँकेचे काम सुरू झाले. बँकेमधील पुरुष कर्मचाऱ्यांची संख्या केवळ तीन आणि हे तिघेही शिपायाचे काम करणारे ! बाकी कारकुनापासून अधिकाऱ्यांपर्यंत सर्वत्र महिलांचे साम्राज्य ! डाका घालायचे ठरविल्यावर डाकूकंपनीने याच बँकेची हीच शाखा निवडावी यात आश्चर्य वाटण्यासारखे काही नाही.

तर डाका घालण्याचा निर्णय घेऊन दोन मंडळी बँकेमध्ये भरदुपारी दाखल झाली. बँकेच्या धोरणाप्रमाणे शस्त्रधारी पहारेकरी नव्हता. त्यामुळे काम आणखी सोपे झाले. बँकेकडे इमारतीचे दोन मजले आहेत. दुसऱ्या मजल्यावर खातेदारांबरोबरील व्यवहार चालतात. याच ठिकाणी दुपारी तीनच्या सुमाराला एक जोडगोळी येऊन दाखल झाली. या दोघांपैकी एक दाढी वाढविलेला व फेटा बांधलेला होता, तर दुसऱ्याने चांगली घोटून दाढी केलेली दिसत होती. बँकेत दाखल होताच दोघांनीही पिस्तुले बाहेर काढली. बायकांचे राज्य असलेल्या त्या बँकेतील कोणीही अधिकारी व्यक्ती त्या वेळी नेमकी तेथे हजर नव्हती. बँकेच्या व्यवस्थापकीणबाई आणि त्यांच्या सहाय्यक बँकेच्या विभागीय कचेरीमध्ये काही कामासाठी गेल्या होत्या. कोणीही अधिकारी व्यक्ती हजर नसल्याने बँकेमध्ये खुशीचे वातावरण होते. बँकेच्या एक कर्मचारी सौ. मीरा जेटली व्यवस्थापकाच्या कचेरीत असलेल्या फोनवरून आपल्या पतिराजांशी गप्पा मारण्यात गर्क झाल्या होत्या. अशा शिथिल वातावरणामध्ये जेव्हा ही जोडगोळी पिस्तुले काढून उभी राहिली त्या वेळी एकच हाहाःकार उडाला ! दोघांपैकी एक जण दरवाज्यात जाऊन उभा राहिला, तर दुसऱ्याने जेटलीबाईंच्या हातातील फोन ओढून घेतला व वायर कापून टाकली ! बाईंना नेमके काय होते आहे हेच समजेना; पण फोन घेणाऱ्या माणसाने फोनची वायर कापल्याचे त्यांनी पाहाताच त्यांची बोबडी वळली. दरम्यान बँकेमधील अन्य मंडळींनी जराही हालचाल करू नये अशी तंबी देण्यात आली. वास्तविक परिस्थिती अशी होती. काही हालचाल करा असे जरी सांगण्यात आले असते तरी असे सांगितले गेल्यापासून प्रत्यक्ष हालचाल होण्यास किमान पाच-सात मिनिटे लागली असती. डाकू कंपनीने ही परिस्थिती जोखली होती—परंतु तरीही आपल्या नेहमीच्या व्यवसायीन खाक्याप्रमाणे त्यांनी दम भरून ठेवला. वातावरण आपल्याला अनुकूल आहे असे पहाताच डाकू रोकड संभाळणाऱ्या प्रेमलीला चौधरी आणि जयलक्ष्मी यांच्याकडे वळले. डाका पडला तो वार सोमवार. सोमवारी या शाखेत आजूबाजूच्या व्यापाऱ्यांकडून मोठ्या प्रमाणावर रोकड जमा होते याची माहिती डाकूंनी आधीच काढून ठेवली होती. अपेक्षेप्रमाणे बँकेच्या गल्ल्यात बऱ्यापैकी रक्कम जमा झालेली दिसत होती. जयलक्ष्मीबाई नोटांचे गठ्ठे बांधण्यात गर्क झाल्या होत्या. त्यांच्या समोर जाऊन डाकूने हातातील पिस्तुलाचा वापर करून कॅश-कौंटरची काच फोडली. उडी मारून तो आत उतरला. प्रतिकार असा झालाच नाही ! शांतपणे ड्रावर उघडून त्यांनी जवळची प्लॅस्टिक-बॅग शिगोशीग भरली. नंतर त्यांना सुरक्षित विभागातील ग्यागांकडे मोर्चा वळवायचा होता; पण त्यांना सांगण्यात आले की, किल्ल्या व्यवस्थापकीणबाईंकडे आहेत. मग त्यांनी तो विचार रहित केला. त्यांना जे अभूतपूर्व सहकार्य मिळाले. त्यामुळे भारावून जाऊन डाकूंपैकी एकाने सगळ्यांचे आभार मानले. उगाच मागून कोणी हालचाल करू नये म्हणून एकदा हग्या दम भरला आणि दोन लाख त्र्याण्णव हजार चारशे रुपयांची ' करमुक्त ' थैली उचलून दोघेही डाकू बाहेर पडले ! डाकू जाऊन पाच–सात मिनिटे झाल्यावर टेबलाखाली दडून बसलेल्या महिला कर्मचारी बाहेर आल्या. पाच–सात मिनिटांत घालण्यात आलेल्या या धाडसी दरोड्याने त्या चांगल्याच चक्रावून गेल्या होत्या.

बँकेचे व्यवस्थापकीय कार्यालय दुसऱ्या मजल्यावर आहे; पण तेथील मंडळींना या गोष्टीचा पत्ता लागल्याचे दिसले नाही. पोलिसांनी त्यांच्याकडे चौकशी केल्यावर त्यांनी सांगितले की, काच फुटल्याचा आवाज त्यांनी ऐकला; पण असेल काही तरी म्हणून त्यांनी तिकडे दुर्लक्ष केले. खाली बँकेत असा दरोडा घातला जात असेल याची त्यांना अजिबात कल्पना आली नाही ! इकडे बँकेतील महिला कर्मचारी बाहेर अजून चोर अथवा त्यांचे साथीदार असतील अशा कल्पनेने बँकेतल्या बँकेतच आपापसात पुटपुटत बसल्या होत्या. बराच वेळ झाल्यावर त्यातल्या त्यात धीट असलेल्या जेटलीबाई खिडकीजवळ गेल्या. बाहेर कोणी नसल्याचे त्यांनी सांगताच साऱ्या कर्मचाऱ्यांनी मदतीसाठी एकच गलका केला.

त्यानंतर अन्य लोक जमा झाले. कोणी तरी पोलिसांना फोन केला आणि पोलीस येऊन दाखल झाले. प्रकरण गंभीर आहे हे लक्षात येताच वरिष्ठांना खबर देण्यात आली. पोलिसमहानिरीक्षक जे. एन. चतुर्वेदी येऊन दाखल झाले. दिल्ली पोलिसांकडे असलेले श्वानपथक आणण्यात आले. व्यवस्थापकांच्या कचेरीमध्ये एक सुरी मिळाली. याच सुरीचा वापर करून चोरांनी टेलिफोनवायर कापली होती. कुत्र्याने सुरीचा वास घेतला आणि ते निघाले...त्याच्याबरोबर पोलिसही मोठ्या आशेने निघाले. कुत्र्याने फर्लांगभर मार्ग काढला आणि ते गोंधळले. कुत्रे गोंधळलेले पाहून पोलिसही गोंधळून गेले. कारण त्यांची सर्वांत जास्त मदार कुत्र्यावरच होती. कुत्र्याकडून काही हाती लागत नाही हे लक्षात आल्यावर पोलिस इतर मार्गांनी गुन्हेगार शोधण्यात कार्यमग्न आहेत. हा मजकूर लिहिला जाईपर्यन्त पोलिसतपास चालूच आहे. पोलिसांनी जी माहिती पुरविली ती लक्षात घेता पोलिसांच्या हाती फारसे काही लागलेले दिसत नाही. पोलिस म्हणतात, चोर कदाचित् आनंदमार्गी असतील, कदाचित नसतीलही. डाकूंनी बँकेमध्ये एक चिठ्ठी ठेवल्याचे आढळले. या चिठ्ठीप्रमाणे आनंदमार्गी पंथाचे प्रमुख बी. एस. सरकार यांची सुटका करण्याची मागणी करण्यात आली आहे. तथापी ही चिठ्ठी डाकू कदाचित् आनंदमार्गी असल्याचे सुचविते इतकेच पोलिस म्हणतात. बॅन्केमध्ये हजर असलेल्या कर्मचाऱ्यांकडून काही माहिती मिळते काय या दृष्टीने पोलिसांनी प्रयत्न केले; परंतु इतकी परस्पर विरोधी माहिती पुढे आली की दरोडेखोरांबाबत काही कळण्यापेक्षा दरोडा पडला त्या वेळी बॅन्केतील कर्मचाऱ्यांची मनस्थिती काय होती याचीच माहिती पोलिसांना या उलटतपासणीतून मिळाली. एकच गोष्ट साक्षीदारांनी

ठासून सांगितली – दोन्ही दरोडेखोर इंग्रजीत बोलत होते आणि त्यांपैकी एकाचा बोलण्याचा ढंग पाश्चिमात्य पद्धतीचा होता. बस्स ! एवढ्या माहितीखेरीज अन्य कोणतीही माहिती निश्चित स्वरूपात पुढे न आल्याने केवळ याच माहितीच्या आधारे पोलिसतपास चालू आहे. या दरोड्याचे राजकीय भांडवलही केले जात आहे. दिल्ली-मधील एका सभेत इंदिरा काँग्रेसच्या एका वक्त्याने या दरोड्याचा उल्लेख करून दिवसाढवळ्या बँका लुटल्या जात आहेत आणि जनता सरकार काही करू शकत नाही याबद्दल खेद नोंदविला, तर तिकडे लुधियानामध्ये स्वतः इंदिराजींनी दिल्लीमध्ये कायदा व सुव्यवस्था पूर्ण मोडकळीस आली असल्याचे सांगून या बँक-दरो-ड्याचा उदाहरण म्हणून उल्लेख केला. ही चोरी सापडण्याबाबत दिल्लीच्या पत्रकारांमध्ये चर्चा चालू होती त्या वेळी एक पत्रकार म्हणाला, ' दिल्लीच्या पोलिसांपेक्षा त्यांच्या श्वानपथकावर माझा जास्त विश्वास आहे. आता श्वानपथक हरले याचा अर्थ इतकाच की या कुत्र्यांपेक्षाही चोर जास्त हुशार आहेत आणि आपण त्यांच्यापेक्षा जास्त हुशार आहोत असे पोलिसांना सिद्ध करून द्यावे लागेल ! ◻

## असे ऐकिवात आहे की . . .

◻ ◻ जनता पक्षाच्या पाच ज्येष्ठ नेत्यांची जी बैठक दिल्लीमध्ये झाली त्या वेळी पक्षाध्यक्ष चंद्रशेखर यांनी आरोग्यमंत्री राजनारायण यांच्यावर नाव घेऊन टीका केली. पक्षाध्यक्षांवर सत्तास्थानी असलेला जनता पक्षाचा जबाबदार नेता जर कडवट शब्दांत वेडीवाकडी टीका करू लागला तर त्यामुळे पक्षाची प्रतिमा खराब होते असेही त्यांनी सांगितले. बाबुजी आणि अटलजी यांनी चंद्रशेखर यांचा पाठपुरावा केला. राजनारायण यांना राजिनामा देण्यास सांगावे असे सूर निघू लागल्यावर पंतप्रधान व गृहमंत्री चौधरी चरणसिंग मध्ये पडले. त्यांना राजिनामा देण्यास सांगितले तर त्याचेही भांडवल केले जाईल, असे चौधरी चरणसिंग म्हणाले, तर मोरारजीभाईंनी आपण याबाबत राजनारायण यांच्याशी चर्चा करू असे सांगितल्यावर हा विषय संपला. पुढे बैठक संपल्यावर चरणसिंग यांच्या विश्वासातील माणसांनी राजनारायण यांना पक्षाध्यक्ष करण्याबाबतचे पिल्लू सोडून प्रतिक्रिया अजमावल्या. अर्थात सर्वच गोटांतून या हालचालीला कठोर विरोध झाला. या हालचालीला काटशह देण्याच्या हेतूने मधू लिमये यांचे नाव दुसऱ्या गटातून चर्चेसाठी पुढे रेटण्यात आले; पण त्यांच्या नावालाही विरोध झाला. सध्याच्या परिस्थितीमध्ये चंद्रशेखर अध्यक्षपदी असणेच आवश्यक आहे असे आग्रहाने सांगण्यात आले आणि राजनारायण आणि मधू लिमये ही दोन्ही नावे आपोआप मागे घेतली गेली. पक्षांतर्गत निवडणुका जेव्हा केव्हा होतील त्या वेळी पक्षयंत्रणेवर ताबा मिळविण्याच्या दृष्टीने सर्व गट जोरदार प्रयत्न करतील. तथापी राजनारायण यांना मंत्रिमंडळातून वगळण्यात आले नाही तर पक्षीय आघाडीवर मोठे बदल होणार नाहीत असे दिसते.

◻

---

## निर्दोष निवडणुका

पृष्ठ ५ वरून

उमेदवाराला करावी लागतेच. त्या अर्थाने तो निवडणूकखर्चाचाच भाग समजायला हवा. ज्यांना रक्कम परत मिळाली त्यांच्या खर्चातून ती वजा करून त्यांच्या निवडणूक-खर्चाचा हिशेब करण्यात यावा.

निवडणूक कमिशन सध्याप्रमाणे एक सदस्याचेच असावे, अशी निवडणूक कमि-शनची शिफारस आहे तर ते तीन सदस्यांचे असावे, शिवाय विभागीय कमिशनर नेमण्यात यावेत असे तारकुंडे समितीने सुचविले आहे. एक सदस्य कमिशन असले आणि त्या एका सदस्याकडून चुकीचे निर्णय घेतले गेले तर ते सुधारण्याला वाव नसतो. त्या दृष्टीने त्रिसदस्य कमिशनची शिफारस योग्य आहे. मतदान सक्तीचे नको या तारकुंडे समितीच्या शिफारशीबाबतही दुमत होण्याचे कारण नाही.

पण दोन्ही अहवालांतील शिफारशी वाच-ल्यानंतर असे जाणवते की, निवडणूकपद्धती सुधारण्याच्या बाबतीत काही महत्त्वाच्या गोष्टी दुर्लक्षितच राहिल्या आहेत. मतदान पन्नास टक्क्यांपेक्षा जास्त व्हायला हवे आणि विजयी उमेदवारास पन्नास टक्क्यांपेक्षा अधिक मते मिळायला हवीत याचे महत्त्व कोणालाच वाटले नाही याचे आश्चर्य वाटते. जागा आणि मते यातील विषमता कमी करण्यासाठी प्रमाणशीर प्रतिनिधित्वाची पद्धती आपण काही प्रमाणात स्वीकारा-यलाच हवी.

◻

एक चित्रपट । दोन परीक्षणे

सदानंद बोरसे

# One Who Flew Over The Cuckoo's Nest

'वन हू फ्ल्यू ओव्हर द ककूज नेस्ट' हा गेल्या वर्षी पाच ॲकेडमी ॲवॉर्डस् मिळविलेला चित्रपट पुण्या-मुंबईत दाखविला गेला. या चित्रपटातील सामाजिक आशयाची नोंद घेणारे अशोक प्रभाकर डांगे यांचे एक परीक्षण मुखपृष्ठावर दिले आहे.

या चित्रपटाची कथा, दिग्दर्शन इ. बाजूंचा विचार करणारे हे दुसरे परीक्षण....

एक वेड्यांचे इस्पितळ. त्यात आपणहून दाखल झालेले वेडे. व्यायाम, खेळ, चर्चा, औषधे यांच्या सांगाड्यात बसविलेले त्यांचे दिवसभराचे शेड्यूल. या सगळ्या चौकटीत एक नवा रंग घेऊन एक वेडा येतो. या वेड्याला बाहेरच्या जगाने अल्पवयीन मुलीवर बलात्कार केल्याच्या गुन्ह्याखाली अटक केलेली असते. हा नवा रंग त्या इस्पितळाच्या चौकटीशी पूर्ण विसंगत असतो—चौकटीबाहेर जाण्याचा, चौकट मोडण्याचा; पण तो जिवंत असतो, त्याला स्वतःचे मन असते, इच्छा असते, त्याप्रमाणे वागण्याची धडपड असते. तो रंग आणणारा माणूस वेडा नाही; पण चौकटीच्या अस्तित्वाला अत्यंत खतरनाक आहे, हे ती चौकट ओळखते आणि त्या माणसाला ठेचून काढण्यात येते; पण त्या माणसाने आणलेला तो नवा रंग त्याच्यापुरताच राहिलेला नसतो, त्याच रंगात भिजून एक वेडा ती चौकट मोडून काढतो आणि स्वतंत्र होतो.

'युनायटेड आर्टिस्ट'च्या बॅनरखाली तयार झालेला अन् 'फँटसी फिल्म'तर्फे सादर केलेला 'One who Flew Over The Cuckoo's Nest' हा चित्रपट. सर्वोत्कृष्ट चित्रपट, सर्वोत्कृष्ट दिग्दर्शन, सर्वोत्कृष्ट अभिनेता, सर्वोत्कृष्ट पटकथा अशी सर्वोत्कृष्टतेची सर्व ॲकॅडमी ॲवॉर्ड्स या चित्रपटाने मिळविली आणि हा चित्रपट त्या योग्यतेचा आहेही. चित्रपटाचे दिग्दर्शक आहेत मिलॉस फोर्मन. चित्रपट पाहत असताना वा पाहिल्यानंतरही तो केवळ त्या वेड्यांपुरता, त्यांच्या त्या इस्पितळापुरता वा मॅक्मॉर्फीपुरता मर्यादित राहात नाही; तर तो प्रेक्षकालाही त्यापलीकडे कुठे तरी त्याच्या स्वतःच्या चौकटीबाहेर घेऊन जातो, निदान त्याच्या चौकटीची जाणीव करून देतो. मला वाटते, हे त्या चित्रपटाचे व दिग्दर्शकाचे सर्वांत मोठे यश आहे.

इस्पितळातील शेड्यूलचे बांधीलपण व त्या बंधनातील फसवे आर्जव, काळजीवाहूपणा अगदी पहिल्या क्षणापासून मनाला जाणवू लागते. प्रत्येक वेड्याला एक औषधाची गोळी दिली जाई, तीही संगीताच्या तालावर; पण ही गोळी घेण्याची प्रत्येकावर सक्ती आणि ती नाकरल्यास देण्यात येणाऱ्या शिक्षेची गर्भित धमकी. सगळ्यांचे व्यायामप्रकार, श्वास घेणे व सोडणेसुद्धा तेथील मेट्रनच्या सांगण्यानुसार. ती शारीरिक कसरतींमध्ये पाळली जाणारी शिस्त नव्हती; तर त्या नावाखाली सगळ्यांच्या अकलेच्या बांधलेल्या मुसक्या होत्या. अशा या बंदिस्त सांगाड्यात एक दिवस मॅक्मॉर्फी हा कैदी प्रवेश करतो. इस्पितळात हातातील बेड्या काढल्यावर तो मोकळेपणाच्या आनंदाने अक्षरशः मोकट हसतो, नाचतो; पण लवकरच इस्पितळाचे सांगाडेपण त्याच्या लक्षात येते. पहिल्यांदा तो थोडा सौम्यपणे स्वतःलाच वळण लावून जमवून घेऊ पाहातो.

चीफ नावाच्या एका ढिम्म, महाकाय वेड्याला तो बास्केट-बॉल शिकविण्याचा प्रयत्न करतो. दम छाटेल एवढी बडबड करूनही चीफवर काहीही परिणाम न झालेला पाहून इस्पितळातील एक नोकर मॅकला म्हणतो, 'तू त्याच्याशी कितीही बोललास तरी काही उपयोग होणार नाही. मग कशाला त्याच्याशी बडबडतोस?' त्यावर 'मी स्वतःशीच बोलतोय.' हे मॅकने दिलेले उत्तर जितके त्या नोकराची टर उडविणारे आहे, तितकेच स्वतःच्या एकटेपणाचे अन् वेगळेपणाचे निदर्शक आहे आणि त्या लोखंडी बंदिस्तपणाचा उपहास करणारे आहे.

हळूहळू मॅक आक्रमक बनू लागतो. एक दिवस औषध घेण्याचे तो नाकरतो; पण होणाऱ्या शिक्षेची भीती घातल्यानंतर तयार होतो. त्या वेळीही त्याने काउंटरच्या काचेवर ठेवलेला हात पाहून मेट्रन म्हणते, "Your hand is straining my window." हे तिचे उद्गार तर बेफिकिरीतून आणि आत्यंतिक थंड्या रक्तातूनच आले आहेत. (अत्यंत शांतपणे आणि वेचून वेचून मॅकला नामोहरम करण्याचे मेट्रनचे पुढचे सर्व उपाय व मेट्रनचा चेहराही याच थंड्या रक्ताचे व शांत पण भयाण थडगेपणाचे दर्शन घडवितात.) मॅकही त्या वेळी निमूटपणे, हसत हसत गोळी तोंडात टाकतो ती थुंकून फेंकून देण्यासाठीच.

त्यानंतर एका सामुदायिक चर्चेत जागतिक बेसबॉल मॅच पाहण्यासाठी टी. व्ही. लावण्याची मॅक सूचना करतो; पण त्याला त्याच्या कोणत्याच साथीदाराकडून (म्हणजे इतर वेड्यांकडून) प्रतिसाद व पाठिंबाही मिळत नाही. हा सगळा राग निघतो एका बेसिनवर—ते उखडून काढण्याची मॅक बाकीच्यांशी पैज लावतो, शीर न् शीर तट्ट फुगेपर्यंत तो जोर लावतो, हताश होऊन स्वस्थ बसतो. कुणी तरी 'Given up?' म्हणून कुत्सितपणे विचारल्यावर झटकन 'No, Just warming up.' म्हणून पुन्हा प्रयत्न करतो अन् सोडून देतो. मात्र त्यामुळे एक होते- पुढच्या चर्चेच्या वेळी बेसबॉलची मॅच

बघण्यावर सान्यांचे एकमत होते. याही वेळी मेट्रनबाई त्यांची मागणी धुडकावतात, ' चर्चेत भाग घेणारे तुम्ही नऊ जण आहात. इस्पितळात एकूण पेशंट अठरा. निर्विवाद बहुमत नाही ' आणि मग निर्विवाद बहुमत मिळविण्यासाठी मॅक एकेका वेडयाची मनधरणी करीत राहतो, 'Just raise your hand.' बहुमताने निर्णय सिद्ध करण्यासाठी एक शहाणा वेडयांना विनवतो आहे. लोकशाहीवर यापेक्षा सूचक व बोलके भाष्य काय असू शकेल? अखेर असा हात वर करणाराही एक वेडा मिळतो, बहुमत सिद्ध होते. त्या वेळी मेट्रनबाईंनी मीटिंग संपविली असल्याने (किंवा तांत्रिक दृष्टया तहकूब केल्याने) त्या हे बहुमत मान्य करीत नाहीत, टी. व्ही. बंदच राहतो. मग मॅक स्वतःच कॉमेंट्रीटर बनतो. त्यांच्याच प्रतिमा प्रतिबिंबित करणाऱ्या टी. व्ही. च्या काचेत स्वतःच कल्पनेतील मॅच पाहून व तिची कॉमेंट्री करून तो त्या वेडयांच्या डोळयांसमोरही एक मॅच उभी करतो–जणू स्वतः त्या चौकटीवर डोके आपटीत असताना त्या वेडयांच्या डोक्यातही तो आपले स्वप्न भरीत असतो.

एक दिवस तर मॅक कमालच करतो. आठ वेडयांना इस्पितळाच्या बसमधून तो बाहेरच्या जगात पळवून नेतो. सगळे एका वैद्यकीय पथकातील डॉक्टर बनतात, मॅकच्या मैत्रिणीबरोबर–कॅंडीबरोबर एका बोटीतून फिशिंगला जातात आणि काही क्षण का होईना इस्पितळाबाहेरच्या खुल्या हवेची चव घेतात. मोकळेपणा, मुक्तता, स्वातंत्र्य यांची बाकीच्या वेडयांना प्रथमच चुणूक मिळते.

त्या वेळीच इस्पितळातील अधिकाऱ्यांना जाणीव होते, 'हा माणूस वेडा नाहीच; पण इतर वेडयांनाही तो भलभलते रस्ते दाखवीत असल्याने आपल्या अस्तित्वाच्या मुळावर घाव घालणारा आणि म्हणूनच धोकादायक आहे.'

वेडयांना चेतविण्याचे मॅकचे काम चालूच असते. बास्केट-बॉलच्या मॅचमध्ये मॅकची (पर्यायाने वेडयांची) पार्टी आडदांड चीफच्या मदतीने इस्पितळातील नोकरांवर गोलावर गोल चढविते. मॅकबद्दलच्या रागात आणखीच भर पडते.

अशाच एका चर्चेच्या वेळी हे सर्व वेडे आपणहून राहात असल्याचे कळल्यानंतर तर मॅक स्वतःच चाट पडतो. प्रत्येकाला तो या बंदिस्तपणातून निघून जाण्याबद्दल सांगत असतो. या सगळया प्रकारात एका क्षुल्लक सिगरेटवरून मारामारी होते. त्याबद्दल मॅकला विजेचे जबरदस्त शॉक उपचार (खरे तर छळ) म्हणून देण्यात येतात.

त्यानंतर एक दिवस मात्र–रात्री सर्वत्र सामसूम झाल्यानंतर रखवालदाराला फितवून मॅक आपल्या दोन मैत्रिणींना इस्पितळात आणतो. त्यांनीच आणलेली दारू रखवालदाराला पाजून आपली सुटका करून घेण्याचा मॅकचा विचार असतो; पण ती दारू स्वतः पिऊन सारेच धुमाकूळ घालतात, बेशुद्ध होतात. बिली नावाचा वेडा तर सारी रात्र कॅंडीबरोबरच झोपतो. दुसऱ्या दिवशी सकाळी हे पाहिल्यानंतर हलकल्लोळ माजतो. मेट्रन बिलीला हे सगळे त्याच्या आईला सांगण्याची धमकी देते आणि घाबरून जाऊन बिली या साऱ्याचे कारण म्हणून मॅककडे बोट दाखवितो; पण त्यामुळे बिलीची शिक्षा काही चुकत नाही आणि त्याला घाबरूनच तो स्वतःची मान कापून घेऊन तडकाफडकी आत्महत्या करतो.

ती आत्महत्या पाहून मात्र इतका वेळ शांत असलेला मॅक बिथरतो, भडकतो आणि ही चौकट उखडण्यासाठी सरळ मेट्रनबाईंचा गळा दाबतो, अगदी तिचा दम घुटेपर्यंत.

पुन्हा शिक्षा, पुन्हा छळ–पूर्वीपेक्षा कडक, पूर्वीपेक्षा जास्त–तोही वेडयावरील उपचाराच्या नावाखाली चाललेला. या वेळचे उपचार मॅकच्या शारीरिक व मानसिक सहनशीलतेपलीकडचे असतात. तो स्वतःच त्यामुळे आपले अस्तित्व, आपल्या प्रेरणा, आपल्या इच्छा हरवून वेडा बनतो, निष्क्रिय बनतो. (त्याच्या मेंदूचा prefrontal lobe काढून टाकल्याने तो त्याचे initiation गमावतो.–मेडिकलच्या एका मित्राने पुरविलेली माहिती.) त्या वेळी बाकीचे वेडेही आपापल्या वेडेपणात पूर्ववत रममाण होतात.

पण मॅकची ही संपूर्ण झुंज उघडया डोळयांनी अन् मुक्या तोंडाने पाहणारा, कधीकधी जिवंतपणे त्यात सामील होणारा अन् बाकीच्या वेळी मात्र मुर्दाडपणाचे नाटक करणारा चीफ स्वतःची अन् मॅकची दोघांची त्या तुरुंगातून सुटका करतो–तेच पाण्याचे बेसीन उचकटून, त्याने खिडकी तोडून चीफ अंधारात मुक्ततेच्या उजेडाकडे धावत असतो. मात्र जाण्यापूर्वी त्याने नाका-तोंडावर उशी दाबून वेडया मॅकला मारलेले असते आणि त्या खिडकीची मोडकी चौकट आणि बाहेरच्या जगात शिरण्याचे त्यातून उघडलेले खुले दार पाहून अखेर आपल्यातील एकजण तरी निसटला या आनंदाने बेहोष होऊन सगळे वेडे खदखदून हसत असतात.

वेडयांचे इस्पितळ म्हटल्यावर वेडयांचे निरनिराळे चाळे अपरिहार्यच आहेत. कायम नाच करीत राहणे, रडणे, डोळे गरगरविणे, शर्टची एकच बाही खांद्यापर्यंत दुमडणे, क्षणात हसणे तर पुढच्याच क्षणी चिडणे वा रडणे, इतरांकडे दुर्लक्ष करून स्वतःच्याच एखाद्या हालचालीत वा बडबडीत मश्गुल असणे इत्यादी गोष्टी वेडेपणा दाखविण्यासाठी घेतल्या आहेत; पण नेहमीनेहमीच्या या गोष्टींमधूनच दिग्दर्शक प्रेक्षकाला त्यांच्या पाठीमागे दडलेल्या जीवनापर्यंत घेऊन जातो. आपल्या आयुष्यात हरघडी भेटणाऱ्या चौकटींमध्ये वावरताना प्रत्येकजण वेगवेगळा वेडेपणाच करीत असतो आणि तोच वेगवेगळा वेडेपणा आपल्याला एकेका वेडयाच्या रूपाने चित्रपटात भेटतो. आपल्याही मनात क्वचित (आणि अगदी क्वचितच) बंड करून उठणारा मॅक पडद्यावर दिसल्यावर त्याच्याशी प्रत्येकजण एकरूप होतो, मॅकला प्रतिसाद मिळत असला, तर प्रेक्षक खुष होतो आणि तो निराश बनत असला, तर प्रेक्षकही खचू लागतो. जणू मॅकच्या रूपाने तो आपल्याभोवतीच्या बंधनांवर तुटून पडत असतो, डोके आपटीत असतो. शेवटीही चीफ मॅकचा खून करून (किंवा मॅकला मुक्त करून) पळून जातो, तेव्हा प्रेक्षकाला काही तरी दिलासादायक फळ मिळाल्याचे समाधान वाटते, त्याचबरोबर हाही विचार सतावत राहतो–

'*तुम्हाला मुक्तता हवी? मग तुम्हाला* भोवतीची भिंत पाडली पाहिजे–शक्ता एकवटून किंवा स्वतःचे अस्तित्व या भिंतीआडून संपविले पाहिजे–पूर्णपणे.'

दोन्ही करण्याचे धाडस फारच थोडयांना असते. बहुतेकांची अवस्था तुटकी चौकट आणि मोकळी खिडकी पाहात मोठमोठयांदा

हसणाऱ्या वेड्यांसारखीच असते.

चित्रपटात वेड्यांपासून मेट्रनपर्यंत साऱ्यांचीच कामे भन्नाट झाली आहेत. शेवटी साऱ्यांनाच सामावून दशांगुळे उरणारे उल्लेखनीय नाव उरते–जॅक निकोल्सनचे. (मॅक्‌-मॉर्फी.)

इस्पितळात आल्यावर बेड्या काढल्याबरोबर त्याने केलेले हास्य, इतरांना मारलेल्या मिठ्या, इतर वेड्यांशी वागताना त्यांच्यात जागेपणा आणण्यासाठी त्याची चाललेली धडपड, बेसिन उचकटताना त्याची उभी राहिलेली नस न् नस् आणि स्नायू न् स्नायू, चीफला 'पळून जा' म्हणून सांगताना त्याला चितिलेले सुयश, फिशिंगला जाताना साऱ्यांची डॉक्टर्स म्हणून करून दिलेली ओळख, इस्पितळातील नोकरांच्या मिष्किलपणे घेतलेल्या फिरक्या, बिलीची आत्महत्या पाहून पेटलेला त्याचा चेहरा आणि सर्वांत शेवटी त्याच्यातील अनोळखी, निष्क्रिय वेडेपणा असे किती प्रसंग सांगायचे? इतकेच लिहितो, जेव्हा जेव्हा तो पडद्यावर असतो, तेव्हा तेव्हा त्याच्या चेहऱ्यावरची रेष न् रेष तुम्हाला काही तरी सांगत असते, भले त्याच्या तोंडून शब्द बाहेर पडत असोत अथवा नसोत.

थोडक्यात संपूर्ण चित्रपट डोळ्यांमधून डोळ्यांच्या पलीकडे कुठे तरी घसत जातो आणि डोळ्यांपलीकडची कवाडे ठोठावत राहतो.

पण शेवटी आपणही कोठे ना कोठे तरी बंद होऊन पडलेले वेडेच ना ? या ठोठावण्याकडे कोण लक्ष देणार ? एखाद्याने लक्ष देऊन ते दार उघडण्याचा, मोडण्याचा प्रयत्न केला, तर खदखदून हसणे एवढेच आपले काम. *

# घर

## उत्तरार्धात पकड घेणारा

गुलजारचा सहभाग असलेला 'घर' हा चित्रपट 'किताब' बरोबरच पुण्यात प्रदर्शित झाला.

विकास चंद्र (विनोद मेहरा) हा श्रीमंत बापाचा आईवेगळा एकुलता एक मुलगा. त्याचे आरती (रेखा) नावाच्या मुलीवर प्रेम असते, अर्थात तिचेही त्याच्यावर असते, पण विकासच्या वडिलांनी आपल्या मित्राला त्याची मुलगीच बहू म्हणून घरात आणण्याचे वचन दिलेले असते. मग विकास ते वचन व वडील दोन्हींना धुडकावून घराबाहेर पडतो आणि आरतीशी लग्न करतो. हे नवविवाहित जोडपे स्वत:ला घर मिळेपर्यंत विकासच्या बॉसच्या– चटर्जींच्या (असित सेन) फ्लॅटमध्ये राहू लागते.

कथेचा येथपर्यंतचा भाग हा अत्यंत फिल्मी आहे. म्हणजे विकास–आरतीचे प्रेम, प्रणय, गाणी वगैरे मालमसाल्याने खच्चून भरलेला. पुढे मात्र कथेला वेगळे वळण मिळते.

एक दिवस विकास व आरती रात्रीच्या सिनेमाला जातात. परत येताना टॅक्सी न मिळाल्याने दोघे पायीच घराकडे निघतात. एका टॅक्सीतून पिऊन तर्रर्र होऊन चाललेले चार गुंड रात्रीच्या सुनाटीत एकटेच चाललेले हे जोडपे पाहतात आणि त्यांच्यावर हल्ला करतात. विकास गुंडांना कसाबसा थोपवून धरून आरतीला पळून जायला सांगतो. आरती पळत सुटते; पण विकासच्या डोक्यावर एका गुंडाने केलेला हँडलचा वार पाहून ती त्याच्या मदतीला परत धावते. चारी गुंड तिला टॅक्सीत कोंबून घेऊन जातात.

जखमी विकास आणि बलात्कारित आरती योगायोगाने एकाच हॉस्पिटलमध्ये येतात. पुढची सारी कथा आहे आरतीच्या उध्वस्त झालेल्या मनाची. त्या उध्वस्ततेतून एकेक चिरा शोधून पुन्हा घर उभारण्यासाठी धडपडणाऱ्या विकासची आणि कधी सहानुभूतीच्या अतिरेकाने तर कधी जाणूनबुजून उपहासाने, कधी स्वार्थासाठी तर 'कधी आपल्यावर असा प्रसंग कोसळलेला नाही' ही सुरक्षिततेची भावना जपण्यासाठी दोघांनाही पुन्हापुन्हा त्या नकोशा वाटणाऱ्या घटनेमध्ये ढकलणाऱ्या आजूबाजूच्या लोकांची जराही पर्वा करीत नाही; पण आरतीही त्याच्या प्रेमाला नाटकच मानते; तेव्हा मात्र तो खवळतो. त्या बलात्काराच्या प्रसंगाचा त्रास एकट्या आरतीनेच भोगलेला नाही; तर त्याचे वार विकासनेही झेलले आहेत, याची तो आरतीला जाणीव देतो, तिला त्या घटनेतून बाहेर काढू पाहतो; पण आरती घर सोडण्याचा निर्णय घेते, घराबाहेर पडते आणि इतका वेळ गप्प असलेला विकास ती गेल्यानंतर मात्र एकटेपणाच्या जाणिवेने अस्वस्थ होतो, तळमळू लागतो. तसाच तो अंगावरच्या कपड्यांनिशी स्टेशनवर धावतो; पण त्याच्या नजरेला पडते सुटलेली, लांब लांब जाणारी गाडी. हताश होऊन परतणाऱ्या विकासला निर्मनुष्य प्लॅटफॉर्मवर एका बाकावर एकाकी बसलेली आरती दिसते. आरतीही विकासला पाहते आणि दुसऱ्याच क्षणी दोघे एकमेकांच्या मिठीत बांधली जातात. पडद्यावर अक्षरे येतात, 'The Beginning of Ghar.' दोघांच्याही एका नव्या, सुंदर घरकुलाच्या बांधणीला वर्तमानातील त्या क्षणापासून सुरुवात झालेली असते.

अशी ही उत्तरार्धात पकड घेणारी कथा-या चित्रपटाद्वारे दिनेश ठाकूर कथा, पटकथा व संवादाच्या क्षेत्रात उतरले आहेत. चित्रपटात त्यांनी डॉक्टरची एक छोटीशी भूमिकाही केली आहे. त्यांच्या कामगिरीचे स्वरूप वर मांडलेले आहेच. पूर्वार्धात कथा जितकी साचेबद्ध ठराविक ठशाची आहे, तितकेच वेगळे वळण तिला उत्तरार्धात मिळते.

चित्रपटाचे दिग्दर्शक आहेत माणिक चटर्जी. चित्रपटाच्या पूर्वार्धात प्रेमाच्या नावाखाली बागसीन्सपासून बेडसीन्सपर्यंत मिठ्या, हॉटेलमध्ये हनीमून, गोंधळ, विनोद इत्यादींची खच्चून गर्दी करून त्यांनी जितकी treatment दिली आहे, तितकीच खोल विचारपूर्ण, संयमी treatment उत्तरार्धाला दिली आहे. या संयमीपणाचा प्रत्यय तर अगदी आरतीला पळवून नेण्याच्या दृश्यापासून येऊ लागतो. रेखासारखी 'नटी' म्हटल्यानंतर खरे तर ते दृश्य अत्यंत बाजारू, गल्लाभरू व धंदेवाईक घेता आले असते; पण तसे अजिबात न करता तिला टॅक्सीतून पळवून नेण्यापर्यंतच तो प्रकार मर्यादित ठेवला आहे.

नंतरही विकासला आरतीची अवस्था कळल्यानंतर बसलेला धक्का, त्याचा शेजारी बनवारीलाल याने कुत्सितपणे 'फार त्रास झाला असेल नाही का हो आरतीबाईंना ?' अशी केलेली विचारपूस, ऑफिसात येताना ऑफिसच्या इमारतीतून सगळे आपल्याकडेच टवकारून पाहात असल्याचा त्याला झालेला भास, ऑफिसमध्येही साऱ्यांच्या सहानुभूतीमुळेच दुखावला जाणारा विकास, निवड-

णुकीसाठी गल्लीतील पुढारी त्या घटनेचा करीत असलेला वापर हे सर्व प्रसंग दिग्दर्शकाने विकासची मनस्थिती ठसवायला सुरेख वापरले आहेत. मुंबईच्या बकाल मोहल्ल्यांमधून गुंडांचा शोध घेत हिंडणारा विकास आणि एका गुत्यात त्याची एका गुंडाशी झालेली मारामारी ( किंवा फक्त मारी–कारण विकासच मार खाऊन परततो. ) हेही खवळलेला पण अगतिक विकास दाखविणारे चांगले प्रसंग.

स्वतःला उष्टावलेली, अपवित्र मानणारी आरती, तिची भग्न आणि भेदरलेली अवस्थाही हॉस्पिटलमध्ये शुद्धीवर आल्यानंतरच्या तिच्या निस्तेज डोळ्यांपासून मनात रुतत जाते. त्यानंतर वारंवार आत्महत्येचा प्रयत्न करणारी, अडविल्यानंतर मनस्तापाने व श्रमाने शुद्ध हरपणारी आरती टप्प्याटप्प्याने सावरत जाते. बाकीच्या जगाबद्दल तर राहू देच; पण खुद्द विकासबद्दलही तिच्या मनात शंका असते; त्यामुळेच ती नाना प्रकारची वेडीवाकडी स्वप्ने पाहते, ( उदा.–घरी गेल्यानंतर विकासकडून अत्यंत थंडी वागणूक मिळाल्याचा तिला झालेला भास ) ती इतकी हळवी बनलेली असते की, विकासच्या छोट्याछोट्या गोष्टींचाही ती विपर्यास करून घेते. ती घरी आल्यानंतर तिलाच आणण्यासाठी निघालेला विकास विचारतो, " तुम क्यों आ गयी ? ' त्याचा उद्देश – ' तू एकटीच कशाला आलीस ? मी येणारच होतो तुला आणायला; ' पण आरती त्यानेही दुखावते. गुंडांबद्दल तर तिला जबरदस्त भीती बसलेली असते. पोलिसांनी दाखविलेल्या फोटोंमध्ये एकाचा फोटो पाहिल्यानंतर त्या घटनेच्या आठवणीने ती बेशुद्ध होते. घरी आल्यावरही रस्त्यावरून जाणारी मोटार पाहून ते गुंड पुन्हा आपल्याच घरी येऊन पोहोचल्याचा तिला भास होतो. आरतीची ही विस्कटलेली मनस्थिती अशा कित्येक प्रसंगांमधून प्रेक्षकांपुढे उभी राहते.

विकास व आरतीच्या या निरनिराळ्या moods ना अत्यंत योग्य न्याय देऊन माणिक चटर्जींनी समर्थपणे पेश केले आहे.

दिग्दर्शकाच्या या कामगिरीला या दोन व्यक्तिरेखा साकार करणाऱ्या कलाकारांनीही विशेषतः रेखाने मनापासून साथ दिली आहे.

गुंडांशी झालेली झटापट, हतबल होऊनही सुटकेसाठी जिवाचा आकांत करणारी आरती, त्या वेळचे तिचे चीत्कार, हॉस्पिटलमध्ये सर्वस्व गमावून बसलेली कळाहीन आरती, क्षणाक्षणाला आत्महत्या अन् बेशुद्धावस्था अशा झुलत्या मनःस्थितीत अन् घडलेल्या घटनेच्या ताणावाखाली वावरणारी आरती, छोट्याशा गोष्टींनीही दुखावली जाणारी आरती, गुंड आल्याचा भास झाल्यानंतर दबक्या आवाजात ते बाहेर उभे असल्याचे सांगून विकासला बिलगणारी, भीतीने थरथरणारी आरती, चौपाटीवर ' ऑरे बॉप रे ' असे वेडावून हवालदाराची खिल्ली उडवणारी आरती असे आरतीचे अनेक पैलू रेखाने अतिशय सुंदर दाखविले आहेत. आलाप, दो अंजानेनंतरची ' घर ' ही रेखाची अभिनेत्री म्हणून वरची आणि बरीच वरची पायरी ठरावी. चित्रपटातील सुरुवातीच्या भागातील म्हणजे प्रणय-प्रसंगांमधील तिच्या मोकळेपणाचा उल्लेख करण्याची आवश्यकता नाहीच. विनोद मेहराने तिला ठीक साथ दिली असली, तरी तो साथीच ठरतो, वरचढ ठरू शकत नाही. प्रेमा नारायणने केलेली सीमाची– विकासच्या समजूतदार मैत्रिणीची भूमिकाही उल्लेखनीय.

गुलजार–आर. डी. बर्मन जोडीने पुन्हा एकदा झकास कामगिरी पार पाडली आहे. चित्रपटातील पाचही गाणी झकास– विशेषतः ' तेरे बिना जिया जाये ना ' पार्श्वसंगीतात मात्र आर. डी. ने अतिशय ढोबळपणा दाखविला आहे, अगदी titles पासून कर्कशपणाला प्रारंभ होतो. आरतीला पळवून नेण्याच्या प्रसंगातही ढीगभर वाद्यांचा खंडीभर कोलाहल ऐकविण्यापेक्षा आरतीचे चीत्कार, गुंडांचा ओरडा व मागे टॅक्सीत वाजविले जाणारे ' मेहबूबा, मेहबूबा ' हे गीत पुरेसे ठरले असते. *

# तुम्हारी कसम

## संकटे, योगायोगांची जत्रा

' तुम्हारी कसम 'च्या निमित्ताने आणखी एका पृथ्वीसारख्या सोशिक, आभाळासारख्या मोठ्या मनाच्या इत्यादी इत्यादी भारतीय अबलेचे पडद्यावर आगमन झाले आहे.

विद्या (मौसमी चटर्जी) हे त्या अबलेचे नाव, ती आपल्या भावाबरोबर–राजाबरोबर (मा. राजू) आणि वडिलांबरोबर (मनमोहन कृष्ण) बऱ्यापैकी आनंदात राहत असते. राजा अतिशय उनाड. एक दिवस तो शाळेत दुसऱ्या मुलाचे फीचे पैसे चोरतो. त्या धक्क्याने वडील मरतात अन् मग विद्या राजाबरोबर मुंबईस जायला निघते.

या वेळचा एक प्रसंग. विद्या अन् राजा वडिलांच्या मृत्यूने घरी रडत बसलेले. एक शेजारी येऊन विचारतो, " विद्या, आता काय करणार पुढं ?" वडिलांच्या नावाने लावलेल्या पणतीकडे ती बोट दाखविते आणि म्हणते, " बापू के नाम से ये दिया जलाया है । ये जब बुझ जायेगा तो–" तिचे वाक्य पुरे होण्याच्या आत इतका वेळ शांतपणे तेवत असलेला दिवा फुंकर मारल्यागत विझतो की लगेच विद्या व राजा बंबईकडे. असला बटबटीत ढोबळपणा तर सिनेमात ठायी ठायी आहे.

बंबईला जात असताना विद्याच्या चहूबाजूंना संकटांचे ढगच्या ढग दाटून येतात आणि त्यातून टपाटप टपाटप संकटेच्या संकटे, संकटेच्या संकटे तिच्या अंगावर कोसळतात; त्यामुळे सिनेमात विद्याने ढाळलेले अश्रू गोळा केले, तर एका गावाला एक पाझर तलाव मिळेल. (खारे पाणी असल्याने गावाने मिठाचा व्यवसाय करावा.) मुंबईला जात असतानाच तिची राजाशी चुकामूक होते. मुंबईला आल्यावर मामा मुंबई सोडून गेलेले, ती ज्या ठिकाणी ' नौकरानी ' म्हणून कामाला लागते त्या घरचे एकुलते एक चिरंजीव आनंद ( जितेंद्र ) बिघडलेले. (त्या निमित्ताने एक स्वीमिंग पूल, काही

अल्पवस्त्रांकित तरुणी, एक सामूहिक नाच, एक कोमिल्ला विर्क इत्यादी धंद्याच्या गोष्टी पटकन दाखवून घेतलेल्या.) ते एवढी चिकणी मोलकरीण म्हटल्यावर तिच्याशी 'इज्जत पर हाथ डालना' वगैरे नेहमीचे फिल्मी खेळ खेळू लागतात. त्या खेळातून सुटताना विद्याला अपघात होतो आणि तिचे डोळे जातात. मग आनंदला पश्चात्ताप होऊन तो एकदम सुधारतोच. मधल्या काळात राजाला सुनील (नवीन निश्चल) आणि त्याची बायको (पद्मजा कपिल) असे आई-बाबा मिळतात. विद्याला सुनीलच्याच गाडी-खाली अपघात होऊन तो तिला बहीण मानतो. (आता विद्या व राजाचे नाते कोणते मानायचे, असा एक गहन सामाजिक प्रश्न यातून दिग्दर्शकाला मांडायचा असावा.) शेवटी राजाला गुंडांनी पळवून नेले असता आनंद 'जान की बाजी लगा कर' त्याला सोडवितो. (या प्रसंगी 'मोटारींचा वेगवान पाठलाग, जितेंद्राची गुंडांशी कडवी झुंज, राजाची रोमहर्षक सुटका' म्हणजे उंच ठिकाणी राजा व आनंदने खाली जाळे धरीपर्यंत लोंबकळत राहणे व ते धरल्यानंतर नीट त्यातच उडी मारणे इत्यादी जाहिरातीचा मजकूर सुज्ञ वाचकांच्या लक्षात आला असेलच.) शेवटी विद्या व आनंद यांचे विद्यानंद होते. आता एवढे संकटांचे ढग हटवून सुखाचे ऊन पसरविल्यानंतर ते आणखी कडक करायला हवेच. त्यासाठी मग शेवटी विद्याचे डोळेही एका विलायती डॉक्टरने ऑपरेशन केल्यानंतर परत येतात.

मौसमी चटर्जी, मा. राजू व नवीन निश्चल यांची कामे ही चित्रपटात जमेची बाजू. (अर्थात जमा आणे-पैत आहे आणि खर्च रुपयांच्या भाषत.) मौसमीने तिचा पहिला चित्रपट 'अनुराग' मध्येही आंधळ्या मुलीची भूमिका केली होती. अतिशय गोड चेहरा आणि चांगला अभिनय या दोन गोष्टी जवळ असूनही Challanging भूमिका व चांगला दिग्दर्शक न लाभल्याने ही गुणी अभिनेत्री आजपर्यंत कधीच फारशी पुढे आली नाही. आंधळ्या मुलीच्या रूपाने तिने आपली रुपेरी पड्यावरील कारकीर्द सुरू केली. 'तुम्हारी कसम'मध्येही ती आंधळीच आहे यानंतर तरी तिला कारकीर्दीतील रुपेरीपणा लाभावा. अर्थात 'तुम्हारी कसम' मध्ये तिच्या वाटचाला रडण्याशिवाय काहीच नाही. मा. राजूने 'राजा' त्याचा आधीचा गुंडपणा, वडिलांच्या मृत्यूनंतर बसलेला धक्का, प्रामाणिकपणे जगण्याची धडपड हे सगळे ठाकठीक उभे केले आहे.

नवीन निश्चल हा इसम पड्यावर आल्यानंतर त्याच्या चित्रपटांच्या संख्येमुळे चित्रसृष्टीला नवीन राहिला नाही; पण त्याच्या चेहऱ्याचा निश्चलपणाही फारसा कमी झाला नव्हता. 'तुम्हारी कसम'मध्ये त्याला नायकाच्या मित्राची भूमिका आहे; पण अशा उपनायकाच्या भूमिका त्याला चांगल्याच मानवतील, असे दिसते. रुपेशकुमारने अमजदच्या गब्बरसिंगचे विडंबन करण्याचा एक किरकोळ आणि फुटकळ प्रयत्न केला आहे, त्याच्यापेक्षा अधिक चांगली नक्कल गल्लीतील साडेतीन वर्षांचे पोरगे सुद्धा करील. रुपेशकुमार आणि पेंटल यांच्या विनोदापेक्षा जितेंद्रचे पश्चात्तापदग्धतेचे रडणे सुद्धा अधिक विनोदी वाटते जितेंद्रने गंभीर भूमिका फक्त गुलजारच्या दिग्दर्शनाखालीच कराव्यात, हे पुन्हा एकदा पटले. जितेंद्रला या चित्रपटात एक गाणे आहे, 'इस शहर की हर गली में ये नाम बदनाम है।' आपल्या कामाने त्याने या ओळी अगदी सार्थ केल्या आहेत.

दिग्ददर्शक रवी चोप्रांनी चित्रपटाच्या निमित्ताने संकटे आणि त्यातून सुटण्यासाठी योगायोग यांची एक मोठी थोरली जत्राच भरविली आहे. कथेची निवड, प्रसंगांची मांडणी इत्यादी किरकोळ चुका सोडल्या; तर त्यांची कामगिरी ठीक. (कारण बाकी फारशी कामगिरी त्यांनी केलीच नाही.)

संगीतकार राजेश रोशनने 'हम दोनों मिल के' 'ऐ मस्त हवा, तू बतला' आणि 'है लडकी, प्यार करेगी' ही तीन गाणी आपल्या पूर्वलौकिकाला साजेशी दिली आहेत. बाकी चित्रपटात पार्श्वसंगीत म्हणून फक्त दर्दभरी व्हायोलिन्स वाजत राहतात. गीतकार आनंद बक्षी म्हटल्यानंतर जास्त काही बोलण्याची आवश्यकताच नाही. संवादलेखक आहेत कमलेश्वर, पण त्यांनीही अत्यंत निराश केले. भाग्य व नशीब (खरे तर दुर्भाग्य व कमनशीब) हे व या अर्थाचे शब्द काढून टाकले तर संवादांची संख्या निम्म्यावर येईल.

थोडक्यात 'तुम्हारी कसम'च्या निमित्ताने 'स्त्रियांची तोबा गर्दी' हा ब्लॉक जाहिरातीत पुन्हा वापरता येईल. ❊

मोफत ! मोफत !! मोफत !!!

**पांढरे डाग**

नीलकमल बुटीने ३० वर्षांपासून पांढऱ्या डागाच्या रोग्यांना पूर्णपणे लाभ देऊन जगात प्रसिद्धी मिळविली आहे. आपणही एक लावायचे पॅकिट मोफत मागवून लाभ प्राप्त करा. केवळ १ महिन्यातच पूर्णपणे फायदा.

जवाहर चिकित्सा केंद्र

पो. कतरीसराय (गया)

# एक बाप छे बेटे

## एक चित्रपट, साडेतेराशे मीटर पोळ

'एक बाप छे बेटे' हा केवळ दिग्दर्शक व प्रमुख भूमिका एवढ्यापुरताच मेहमूदचा चित्रपट नव्हे; तर ती त्याची आत्मकथा आहे म्हणे. (म्हणजे असे मेहमूदनेच चित्रपटाच्या जाहिराती अन् रेडिओ प्रोग्रॅममधून सांगितले आहे.) म्हणूनच की काय, त्याने आपल्या तीन बायकांपैकी एक (म्हणजे सौ. ट्रेसी मेहमूद) आणि त्याची सहा पोरे असा मोठा थोरला स्वतःचा गोतावळा चित्रपटात आपल्याभोवती जमा केला आहे.

ही आत्मकथा म्हणजे काय तर मेहमूद आणि त्याच्या आयुष्यात आलेल्या बायका.

आतापर्यन्तच्या मेहमूदच्या विनोदी भूमिका आणि त्याने दिलेले बॉंबे टू गोवा, कुँवारा बाप, दो फूल, जिनी और जॉनी इत्यादि चित्रपट पाहून याही चित्रपटाबद्दल थोड्याफार आशा बाळगल्या; पण प्रेक्षकांना हमखास अपेक्षाभंगाचे दुःख व धक्का देण्याची आपल्याकडे एकेकाची हातोटीच आहे. मेहमूदला तर ही हातोटी या चित्रपटात अत्यंत वाखाणण्याजोगी साधली आहे.

महेश (मेहमूद) ऊर्फ मेहमूद हा चित्रसृष्टीतील नामवंत विनोदी नट. हा गृहस्थ

मुलींच्या बाबतीत मात्र विलक्षण ढिला. या ढिलेपणामुळे त्याची पहिली बायको ( मौसमी चटर्जी ) आत्महत्या करते आणि दुसरी बायको ( ट्रेसी मेहमूद ) अपघातात मरते. मरण्यापूर्वी दोघीजणी मिळून मेहमूदमागे छे बेटे ( चार + दो ) लावून देतात. उरलेल्या चित्रपटभर हे सहा जण बापाची राखण करीत बसतात. सरतेशेवटी मेहमूद एका स्त्री–पशुवैद्याच्या ( नूतन ) लफड्यात अडकतो; पण पोरांच्या करामतींमुळे त्यांचे लफडे न जमता मेहमूदचा मुलगा व डॉक्टरीणबाईंची मुलगी यांचे शुभमंगल होऊन चित्रपटाचा हा सुमारे साडेतेराशे मीटर लांबीचा पीळ संपतो.

चित्रपटाची सुरुवात महेशच्या मुलाखतीने होते. मुलाखतकार आहेत श्री. चरंजिया ( आय्. एस्. जोहर ). सर्व फिल्मी नियतकालिकांची रेवडी उडविण्याचा एक केविलवाणा प्रयत्न या प्रसंगात केला आहे. तरी चित्रपट बऱ्यापैकी विनोदी असेल, असा माझा गैरसमज त्या प्रसंगावरून झाला; पण चित्रपट केवळ विनोदीच नाही, करुणरसही त्यात भरपूर भरलाय. फक्त थोडीशी गल्लत अशी झाली की, विनोदी प्रसंगांत हसू न येता रडू येईल आणि कारुण्याच्या वेळी उलटी परिस्थिती ओढवेल, अशी खास treatment दिग्दर्शक मेहमूदसाहेबांनी चित्रपटाला दिली आहे. एक खेळण्यातील कोंबडी–तिने अंडे दिले की, मेहमूदला मुलगा होणार. हा प्रकार सहा वेळा सहन करणे म्हणजे अक्षरश: रडू येते. तीच गोष्ट प्रत्येक पोरगी पटविताना "तुम्हें नहीं मालूम, मेरी जिंदगी में कितनी ट्रॅजेडीज हैं ....... " इत्यादी मेहमूदच्या डायलॉगबद्दल. विनोद म्हणून मेहमूदचे सुटलेले उघडे, केसाळ पोट, डोक्यापासून पायापर्यंत निरनिराळ्या अवयवांच्या अतिविचित्र हालचाली पाहणे तर विलक्षण त्रासदायक आहे. विशेषत: 'बुढ्ढे, तेरी चाल है बुढ्ढी' या गाण्याला नूतनच्या आत्यंतिक grace पुढे मेहमूद म्हणजे एखादा नाजूक, स्वच्छंद हरिणीपुढे म्हातारे तट्टू. अशा सगळ्या ओंगळ प्रकारांमुळे कित्येक सुरेख विनोदी प्रसंगांचा मेहमूदने चुथडा केला आहे. उदाहरणार्थ मेहमूद व नूतन आणि त्यांचा मुलगा व तिची मुलगी या दोन चोरून उटीला गेलेल्या जोडप्यांची गाठ पडते, तो प्रसंग; नूतन सर्व प्रथम मेहमूदच्या घरी येते, तो प्रसंग. योगिताबाली व मुक्रीने एकमेकांना सावत्र व लाँड्री म्हणणे ही तर विनोदाची घसरगुंडीच आहे. विनोदी प्रसंगांची ही 'इनोदी' दशा; तर करुण प्रसंग म्हणजे हास्याचे मोठमोठे धबधबेच आहेत. बायकोचा मृत्यू कळल्यानंतर मेहमूदचे पिसाट हसणे, 'Walking all alone' या गाण्याची situation मेहमूदचे आपल्या भूमिकांशी झालेले संवाद हे सगळे प्रकार चित्रपटातील विनोदी प्रसंगांचे दोष मागे सारण्याइतके हास्यस्फोटक आहेत. थोडक्यात दिग्दर्शक म्हणून मेहमूदच्या कामगिरीत काहीच अर्थ नाही किंवा सगळाच अनर्थ आहे.

सगळ्यांच्या कामांबद्दल तर काही लिहायलाच नको. मेहमूदने चेहऱ्यासकट सर्व अंग शक्य तितके घुसळून घुसळून वेडेवाकडे करणे एवढाच चित्रपटभर उद्योग केला आहे. जया भादुरी, मौसमी चटर्जी आणि नूतन तिघींना केवळ कुजवले आहे. मेहमूदची सहा मुले म्हणजे तर केवळ बापसे बेटे सवाई असाच प्रकार आहे. त्यातल्या त्यात धाकट्या दोन पिल्ल्यांनी कामे बरी केली आहेत.

संगीतकार राजेश रोशनने 'घडी मीलन की आयी' आणि 'Walking all alone' ही दोन गाणी सुरेख दिली आहेत. ट्रेसी मेहमूदने 'walking all alone' हे गाणे लिहिलेही सुरेख.

एकूण संपूर्ण चित्रपट म्हणजे प्रेक्षकांची घोर फसवणूक आहे. □


प्रकाशित झाले

कालच्या
बायसिकल थीव्हजपासून
आजच्या
चोमाना डुडीपर्यंतच्या
पंधरा
देशी–विदेशी
चित्रपटांची ओळख

टच

अशोक
प्रभाकर
डांगे

राजहंस प्रकाशन, पुणे ३०
मूल्य : १० रुपये